
# बुद्धी-बळ

- विवेक रघुनाथ वाटवे



# बुद्धीबळ : लेखक – विवेक वाटवे

एका सामाजिक भावनेने लिहिलेले हे नाटक. याचे जास्तीत जास्त प्रयोग व्हावेत ही इच्छा आहे.

या नाटकाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण, नाटकाचे प्रयोग किंवा चित्रपट, टिव्ही किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

विवेक वाटवे

आसगांव, गोवा राज्य

vrvatve@rediffmail.com

दूरध्वनी :  9822488386

ई प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

ph : 9869674820

©esahity Pratishthan®2015

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

ई प्रकाशन : १८ डिसेंबर २०१५ : मार्गशीष शुद्ध सप्तमी : अफ़झुलखान वध दिवस

।। श्री ।।

श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील
अफझलखान वधाच्या महत्त्वाच्या प्रसंगावर आधारित
दोन अंकी नाट्यकृती

# 'बुद्धी-बळ'

**लेखक : विवेक रघुनाथ वाटवे**

**संकल्प प्रकाशन**

।। श्री ।।

# ‘बुद्धी-बळ’

## ✻ पात्रें ✻

| | |
|---|---|
| शिवाजी महाराज | अफझलखान |
| मोरोपंत पिंगळे | फाझलखान |
| गोपीनाथपंत बोकील | याकूतखान |
| जिजाबाई | मुसाखान |
| कान्होजी जेधे | सय्यदबंडा |
| नेताजी पालकर | कृष्णाजी भास्कर |
| बहिर्जी नाईक | ३/४ संन्यासी |
| जिवा महाला | ३-४ गांवकरी / शेतकरी |
| संभाजी कावजी | २ मुसलमान पहारेकरी |
| भिवा लोहार | २ मराठा पहारेकरी |

✻ ✻ ✻

बुद्धी-बळ
(मराठी नाटक)

**BUDDHEE-BAL**
(Marathi Drama)

| | |
|---|---|
| लेखक | : विवेक रघुनाथ वाटवे |

*by Vivek R. Vatve*

| | |
|---|---|
| प्रथमावृत्ती | : नोव्हेंबर २०१४ |
| प्रकाशक | : संकल्प प्रकाशन<br>द्वारा - सौ. संध्या वि. वाटवे<br>मुणांगवाडा, आसगांव,<br>बार्देश - गोवा ४०३ ५०७.<br>मो.: ७०८३८८२५२८ |
| अक्षर जुळवणी<br>व मुद्रक | : कल्पक आर्टस्,<br>युजी-६, सज्जनगड संकुल,<br>दत्तवाडी, म्हापसा - गोवा.<br>दूरध्वनी : ०८३२-२२६५००० |
| मुखपृष्ठ | : हेरंब र. वाटवे |
| मूल्य | : रु. १००/- |

**संपर्क किंवा पत्रव्यवहारासाठी लेखकाचा पूर्ण पत्ता :**
विवेक रघुनाथ वाटवे
३४७, मुणांगवाडा, आसगांव, बार्देश-गोवा.
मो.: ९८२२४८८३८६
-✻-
इ.एल्. रेसिडेन्सी, विद्यानगर, खोर्ली, म्हापसा-गोवा ४०३५०७
दूरध्वनी : ९८२२४८८३८६
E-mail : vrvatve@rediffmail.com

---

✻ या पुस्तकाचे सर्व हक्क लेखकाधीन आहेत. नाट्यप्रयोग, भाषांतर, चित्रपट, मालिका आदी निर्मितीसाठी लेखकाची पूर्व परवानगी घेणे कायद्यानुसार बंधनकारक आहे.

# ✻ अर्पणपत्र ✻

माझे वडील

**स्व. रघुनाथ बाळकृष्ण वाटवे**

व

माझी आई

**श्रीमती वसुधा रघुनाथ वाटवे**

यांस

माझे हे पहिलेच पुस्तक

कृतज्ञतापूर्वक अर्पण!

# ...मनोगत

सप्रेम नमस्कार!

नाट्य रसिकहो, श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील अफझलखान वधाच्या महत्त्वाच्या प्रसंगावर आधारीत 'बुद्धी-बळ' हे नाट्यपुष्प आपल्यासमोर सादर करताना मला आनंद होत आहे.

पुस्तक रुपात प्रसिद्ध होणारी ही माझी पहिलीच शब्दकृती. यापूर्वी अधूनमधून काही ठिकाणी लेख, कविता प्रसिद्ध झालेल्या असल्या तरी पुस्तक स्वरुपातील लिखाण हे आता पहिल्यांदाच, त्यामुळे हा आनंद अपूर्वच!

'आदिलशहाचा सरदार अफझलखान याने स्वराज्यावर केलेले आक्रमण व प्रतापगडाच्या पायथ्याशी शिवाजी महाराजांनी त्याचा केलेला वध' ही सर्वमान्य ऐतिहासिक घटना आणि त्यावरच आधारीत हे नाट्य!

सदर घटनेच्या अनुषंगाने नाटक लिहीत असताना तत्कालीन पात्रे रेखाटण्याचा जो प्रयत्न मी केलेला आहे त्यात त्या पात्रांचे जे स्वभाव विशेष किंवा संवाद मी चित्रीत केलेले आहेत ते सर्व माझ्या कल्पनाविलासातून मी रंगविलेले आहेत. मूळ ऐतिहासिक पात्रांच्या स्वभाव विशेषांशी ते मिळते जुळते असतीलच असे नाही. शिवाय जे प्रसंग किंवा जीं घटनास्थळें मी मांडली आहेत त्यांचा मूळ ऐतिहासिक वास्तवाशी संबंध असेलच असे नाही. त्यामुळे प्रस्तुत नाटकातील या बाबींकडे इतिहासाचा दाखला म्हणून पाहिले जाऊ नये ही नम्र सूचना.

एक दिवस सहजपणे गप्पा मारतेवेळी शिवाजी महाराजांवर एक नाटक लिहायचा विचार मी बोलून दाखवला. काही दिवसांनी हे नाटक लिहायला घेतले. कथानक माझ्या डोक्यात नक्की होते पण लिहायला मात्र काही केल्या सुचत नव्हते. शेवटी उगाच काहीतरी लिहायला म्हणून सुरवात केली आणि मग हळूहळू दिशा सापडली. रात्रीच्यावेळी अधून मधून लिहायचो. पण मध्येच कधी खंड पडला तर पत्नी आठवण करुन द्यायची. हळूहळू नाटक लिहून पूर्ण झाले.

मग एक दिवस आम्ही घरातील सर्वांनी एकत्र बसून नाट्य वाचन केले. प्रत्येकाने काही उपयुक्त सूचना केल्या त्या नोंद करुन घेतल्या. त्यानंतर हे लिखाण माझे मामा श्री. चिंतामणी केळकर तसेच माझे मित्र व गोमंतकातींल प्रसिद्ध नाट्यकर्मी श्री. अविनाश पुर्खे यांना वाचायला दिले. त्यांनीही काही सूचना केल्या. त्या सर्व सूचनांप्रमाणे आवश्यक ते बदल करुन मग पक्की प्रत तयार केली.

मी ज्या शाळेत माझे माध्यमिक शिक्षण घेतले त्या माझ्या मांद्रे हायस्कूल, मांद्रे, ता पेडणे, गोवा या शाळेतील आमचे अत्यंत आवडते इतिहासाचे शिक्षक व शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री. शरद मांद्रेकर सरांना मी माझ्या या पहिल्याच पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली आणि अत्यंत अल्पवेळेत त्यांनी ती लिहूनही दिली व माझे कौतुकही केले. त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

हे नाटक लिहायला घेतले त्याचवेळी हे नाटक लिहून पूर्ण झाल्यास त्याची प्रस्तावना मांद्रेकर सरांकडूनच घ्यायची हे मी पक्के ठरवले होते. इतिहास विषयाचे शिक्षक, अभ्यासक असल्याने मला त्यांच्याकडूनच प्रस्तावना हवी होती. माझा विश्वास त्यांनी सार्थ ठरविला. या पुढेही त्यांचा प्रेमाचा हात माझ्या पाठीवर सदोदित राहील याची मला खात्री आहे.

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी माझे भाऊ नीतिन व हेरंब, बहीण पूर्वा, मित्र श्री. संजय हडफडकर, हेमंत रेडकर, वैभव ओटावणेकर, प्रसाद काकतकर या सर्वांनी खूप मदत केली. या शिवाय इतर मित्रांनीही हस्ते परहस्ते खूप सहकार्य केले. मला पाठिंबा देणारे हे सर्वजण माझेच तर आहेत! त्यामुळे मी त्यांचे आभार न मानता उलट त्यांच्याकडूनच वाढत्या प्रेमाची अपेक्षा करतो.

हे नाटक वाचून मला आपले अभिप्राय माझ्या संपर्क स्थानांवर जरुर कळवा. मी प्रतीक्षेत राहीन.

दि. २४. १०. २०१४ आपला स्नेहाभिलाषी,<br>
कार्तिक शु. प्रतिपदा **विवेक रघुनाथ वाटवे**

-❖❖❖-

# प्रस्तावना

'बुध्दी-बळ' या ऐतिहासिक नाटकाची प्रस्तावना लिहिण्याचे सद्‌भाग्य मिळाले याचा मला अभिमान वाटतो.

नाट्यलेखक श्री. विवेक रघुनाथ वाटवे यांच्या नाटकाचे पहिले वहिले ऐतिहासिक नाट्यपुष्प वाचून इतिहासाचा एक अभ्यासक व शिक्षक म्हणून खूप आनंद व समाधान वाटले.

प्रस्तुत नाटकामध्ये शिवाजी महाराजांच्या अनेक गुणांचे विश्लेषण व्यवस्थित केल्याबद्दल नाट्यलेखकाचा हा पहिला प्रयत्न स्तुत्य म्हणावा लागेल.

शिवाजी महाराजांच्या जीवनावर अनेक नाट्यकृती निर्मिल्या गेल्या. अफझलखानची हिंदवी स्वराज्यावर झालेली ही स्वारी, आणि हे मोठे संकट हातावेगळे करतानाचे महाराजांच्या अनेक गुणांचे पैलू या नाटककारांनी व्यवस्थित हाताळलेले आहेत. शिवाजी महाराजांची आपल्या रयतेबद्दल आस्था, अफझलखानकडून प्रजेवर झालेले अनन्वीत अत्याचार ऐकून त्यांची झालेली घालमेल, बुध्दिचातुर्य, मुत्सद्दीपणाचे राजकारण, हिंदूधर्माबद्दलची भूमिका, तसेच धर्मसहिष्णुतेचे दर्शन प्रस्तुत नाटकामध्ये उचितरीत्या मांडलेले आहे. अफझलखानच्या वधानंतर प्रतापगडच्या पायथ्याशी त्याची कबर बांधण्याविषयीचे शिवाजी महाराजांचे विचार हे धर्मसहिष्णु, तसेच आपल्या धर्मावर आघात करणाऱ्या धर्ममार्तंडाना शिकवलेला धडा म्हणजे ही 'कबर' हे सांगण्यास लेखक विसरले नाहीत.

युद्धप्रसंग प्रत्यक्ष रंगमंचावर सादर न करता चित्रफितीद्वारे पडद्यावर दाखवण्याचा लेखकाचा प्रयत्न कौतुकास्पद वाटतो.

अफझलखान, फाझलखान, याकूतखान, मुसाखान, सय्यदबंडा यांच्या तोंडी हिंदी संवाद घातले ते यथोचित वाटतात. पूर्वीच्या ऐतिहासिक नाटकांमध्ये हे मुसलमान योद्धे महाराष्ट्रात येऊन अस्खलीत मराठी बोलतात, पण अशा गोष्टी लेखकांनी टाळून वास्तवतेशी नाते जोडल्याचे समाधान वाटते.

भिवा लोहाराकडून खानाच्या भेटीसाठी लागणारी शस्त्रास्त्रे तयार करण्याचा प्रसंग हा जरी तार्कीक असला तरी यथोचित वाटतो व त्यातून शिवाजीमहाराजांची कल्पकता व सावधगिरीचे दर्शन लेखकाने दाखवून दिलेले आहे.

नाटकाच्या नावात अर्धेअधिक इप्सित ध्येय साध्य झालेले दिसून येते. 'अफझलखानचा वध' किंवा 'अफझलखानची स्वराज्यावर स्वारी' अथवा 'शिवाजी अफझलखान भेट' अशा प्रकारचे नाटकाला नाव न देता सामाजिक आशयाचे नाव देऊन शिवाजीराजांचे 'बुद्धी-बळ' समर्पकरीत्या मांडण्यात लेखक कमालीचे यशस्वी ठरलेले आहेत.

माझ्या एका माजी विद्यार्थ्याने हे ऐतिहासिक रेखीव नाट्यपुष्प निर्माण केल्याबद्दल त्यांचे (श्री. विवेक रघुनाथ वाटवे) अभिनंदन करावेसे वाटते. भविष्यात अशा प्रकारच्या नाट्यकलाकृती त्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून निर्माण व्हाव्यात अशी अपेक्षा व्यक्त करुन ही लांबलेली प्रस्तावना इथेच संपवतो.

**- शरद सखाराम मांद्रेकर**
देऊळवाडा, मांद्रे, गोवा

-❖❖❖-

# ✻ अंक पहिला ✻
## (प्रवेश पहिला)

(राजगडावरील एक दालन.)
(शिवाजी महाराज व मोरोपंत पिंगळे बोलत बोलत प्रवेशतात.)

**शिवाजी** : नाही नाही पंत, तसे होणे नाही!

**मोरोपंत** : पण महाराज . . . !

**शिवाजी** : पण नाही आणि परंतु नाही. वतनदारी बाबतचे आमचे विचार स्पष्ट आहेत. यापुढे कोणासही वतनदारी देण्यात येणार नाही हा आमचा पक्का निश्चय आहे.

**मोरोपंत** : क्षमा असावी महाराज. नव्याने वतनदारी देण्यात येणार नाही हे ठीक आहे. पण जुन्या वतनदारांचे काय? त्यांचं काय करायचं?

**शिवाजी** : पंत, यापूर्वी वतने दिली होती. काही वेळा बक्षिसे म्हणून, काही वेळा मान म्हणून अशी वतने दिली गेली होती; पण त्यामुळे त्यांचा उत्साह वाढावा, त्यांनी त्या वतनांचा वापर स्थानिक जनतेच्या तक्रारी दूर करण्यासाठी करावा हा त्या मागचा हेतू होता. परंतु काही निवडक वतनदार सोडले तर इतरांनी त्याचा उपयोग रयतेच्या सोयीसाठी, सुखासाठी, त्यांच्या कल्याणासाठी न करता केवळ स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीच केला हे पण तेवढंच खरं आहे ना? अशा स्वार्थी वतनदारांची वतने काढून घेतली जातील. लवकरच या संबंधाने आम्ही कारवाई करणार आहोत.
(एवढ्यात आतील दिवाणखान्यातून जिजाबाई प्रवेश करतात. राजे व पंत आदराने मुजरा करतात.)

**जिजाबाई** : (काळजीच्या स्वरात) शिवबा, कधी आलास? आणि आल्या आल्या परत तेच सुरु ? अरे, थोडी तरी विश्रांती घेत जारे बाबा.

**शिवाजी** : हो आऊसाहेब.

**जिजाबाई** : पंत, तुम्ही तरी सांगत चला राजांना अधून-मधून. सतत डोक्यात राजकारणच सुरु असतं त्यांच्या.

**मोरोपंत** : जी माँसाहेब!

**शिवाजी** : पंत, या तुम्ही आता. पुन्हा बोलू आपण त्या विषयावर. (पंत जातात) (जिजाबाईंना उद्देशून) आऊसाहेब किती काळजी घेता आमची? आम्ही आता लहान राहीलो नाहीत.

**जिजाबाई** : हं, माहीत आहे आम्हाला. पण कितीही मोठे झालात तरी आम्हाला तुम्ही लहानच. एकमात्र तुम्हीच आहात आता आमच्यासाठी. आमचे थोरले पुत्र आज हयात असते तर .... (जुन्या आठवणीने व्याकुळ होतात.)

**शिवाजी** : माँसाहेब...!

**जिजाबाई** : शिवबा, आमचे थोरले पुत्र संभाजी यांना अफझलखानाने कपटाने ठार केले हे तुम्ही जाणताच. अजूनही त्याच्या आठवणी सतावत असतात आम्हाला. त्याच्या पश्चात केवळ तुमच्यावर नजर लावून बसलो आहोत आम्ही. तुम्ही तरी आमच्यापासून दूर जाऊ नयेत म्हणूनच खूप काळची करतो आम्ही. आता केवळ तुमच्यावर भिस्त आहे आमची. स्वराज्याच्या वाढीची, धर्माच्या रक्षणाची, रयतेला हाल-अपेष्टांतून मुक्त करण्याची पूर्ण जबाबदारी केवळ आपल्यालाच पेलायची आहे. म्हणून सांगते, स्वतःची काळजी घ्या. जीवास जपून रहा.

**शिवाजी** : हो माँसाहेब, घेऊ आम्ही काळजी. पण आपण सांभाळा स्वतःला. जास्त त्रास करुन घेऊ नका. विश्रांती घ्या. आतमध्ये जाऊन मंचकावर बसून बोलू आपण.

(महाराज जिजाबाईंना हलकासा आधार देत आंतील महालात जातात. आणि ... पडदा पडतो.)

## अंक पहिला
## प्रवेश पहिला समाप्त

-❖❖❖-

# अंक पहिला
# (प्रवेश दुसरा)

(अफझलखानाचा शामियाना)
(खान उच्चासनावर हुक्का ओढत बसला आहे. फाजलखान, सय्यद बंडा, मुसाखान खानासमोर उभे आहेत.)

**अफझलखान :** मुसाखान, कौनसे इरादेसे आप सबको इधर बुलाया है मालूम है ना ?
**मुसाखान :** जी हुजूर।
**अफझलखान :** और सय्यद, फाजल तुम्हें भी पता है ?
**फाजलखान :** जी हुजूर। सिवाजी पर आक्रमण करने के बारे में विचार करने के लिए हमें बुलाया है।
**सय्यदबंडा :** उस पागल सिवाजी को गिरफ्तार करने का बीडा आपने दरबार में उठाया है। आगे की रणनीती के बारेमें सोचनेके लिए ही बुलाया होगा।
**अफझलखान :** हुं। ठीक ठीक। सही मालूम है आपको। उस पागल सिवाजीने हमें हैरान कर रखा है। इतने प्रयासोंके बावजूद कोई भी उसे गिरफ्तार करने में कामयाब नहीं हुआ। खाविंद की परेशानी हमसे देखी नहीं गई इसलिए उस सिवाजी को जिंदा या मुर्दा पकडने की सौगंध हमने खायी है।
**मुसाखान :** (शंकेखोर स्वरात, घाबरत) लेकीन हुजूर . . क्या ये मुमकिन है ?
**अफझलखान :** (चिडून) खामोश! बकवास बंद करो. हमपर कोई शक करें ये हमें बिलकुल पसंद नही समझे ? क्या आप हमें नहीं जानते ? असंभव नामकी कोई चीज होती नही है हमारे लिए। आइंदा हमे कम समझने की जुर्रत मत करो। हमें ये बिलकूल नामंजूर होगा।
**मुसाखान :** (अपराधीपणे) माफ करें हुजूर. माफ करें. गुस्ताखी माफ हो।
**अफझलखान :** हां, ठीक है. आज हम आप को माफ करते है। लेकीन याद रहे फिर कभी ......
**मुसाखान :** (घाबरत) नहीं नहीं. हुजूर . . नहीं नहीं।
**अफझलखान :** सय्यद, फाजल आपका क्या खयाल है ? अभी क्या करना चाहिये हमें ?
**सय्यदबंडा :** किस बारे में हुजूर ?
**अफझलखान :** किस बारे में का मतलब ? इस मुहिम की बात कर रहे है हम।
**फाजलखान :** पिताजी, हमें कोई भी वक्त गुजारना नहीं चाहिये। जितना हो सके जल्दी से जल्दी हमें सिवा को पाबन्द करना चाहिये।

**अफझलखान :** बहोत खूब। बहोत खूब शहजादे। लेकिन आप को भी पधारना है हमारे साथ ये मालूम है ना? अपने उपर पूरा भरोसा है ना आपको? कहीं, ऐन मौके पर डर के मारे जान संभालकर भाग तो नहीं जाओगे?

**फाजलखान :** जी नहीं। हम तैयार हैं। चाहे कुछ भी हो जाए।

**अफझलखान :** हुं। बातें तो बहोत करते हैं आप, मगर आज तक कोई अच्छी खासी जंग लढनेकी खबर सुनी नहीं।

**फाजलखान :** सच है। मगर आज तक हमें ऐसा मौका भी तो नहीं मिला।

**अफझलखान :** फाजल, मौके आते नहीं। हमें वो खुद ढूँढने पडते है. अपनी वकूब से, अपनी ताकत से। अगर ऐसे मौके हम ने खुद नहीं ढूँढे होते तो आज हमारा नाम इतना मकबूल ना होता।(जोराने हसतो) किसी भी तरीके से, भले या बुरे हमने मौका ए वारदात का लाभ उठाया है। हमें केवल एक मालूम है, कुछ भी करो, कैसे भी करो मगर जीत अपनी होनी चाहीये। और हमारे जीत के बीच जो कोई आता है, उसे हम खत्म कर देते हैं। किसी भी तरह की इल्तिफात बरतरना हमें मंजूर नहीं। जंग छेडी तो बस जीत होनी चाहिये।.....जीत। चाहे वो सीधी तरह से हो या फिर छल-कपट से, नारास्तीसे। हा..... हा..... हा ..... ! (इतक्यात बाहेरुन एक मुसलमान पहारेकरी आंत येतो. अफझलखानाला वाकून कुर्निसात करतो.)

**पहारेकरी :** हूजूर, बाहर याकूतखान आए है। अंदर आने की इजाजत माँग रहे हैं।

**अफझलखान :** ठीक है। आने दो उसे। (पहारेकरी बाहेर जातो)

**याकूतखान :** (प्रवेशून खानाकडे पाहून कुर्निसात करतो) हुजूर।

**अफझलखान :** आइये, आइये, याकूतखान। कैसे हो?

**याकूतखान :** सब ठीक है। आपने फर्माया इसलिए हाजीर हुआ हूँ।

**अफझलखान :** क्यूँ बुलाया है आपको मालूम है?

**याकूतखान :** जी नही।

**अफझलखान :** हमने सिवाजी को गिरफ्तार करने का बीडा उठाया है मालूम होगा आपको?

**याकूतखान :** जी, मालूम है। और अभी हमको पूरा विश्वास है की आप जरूर कामयाब होंगें।

**अफझलखान :** ये कैसे कह सकते हो?

**याकूतखान :** हुजूर, आपके शौर्य और कामयाबीके इतने दाखिले हैं की और किसी गवाही की जरुरत ही नहीं है।

**अफझलखान :** बहोत खूब! बहोत खूब!! (स्तुतीने खुश होऊन दाढीवरुन हात फिरवतो)

हम चाहते है की आप भी हमारे साथ आएँ।

**याकूतखान** : जी हुजूर। अगर आपने फर्माया तो जरुर आऊँगा। आपके साथ जुडनेका मौका मैं गँवाना नहीं चाहता।

**अफझलखान** : तो फिर आने की तैयारी करो। मगर उसके पहले हमारी एक खास बात आपको करनी होगी।

**याकूतखान** : जी हुजूर। मैं आपके लिए जान भी देने के लिए तैयार हूँ।

**अफझलखान** : जान देने की नहीं जान लेने की तैयारी करो।

**याकूतखान** : (गडबडतो) क्या . . . ? क्या हुजूर . . . ?

**अफझलखान** : ठीक सुना है आपने। जान देने की नहीं जान लेने की तैयारी करो। और वो भी दुष्मनोंकी नहीं। अपनोंकी। (सर्वजण अवाक् होतात. काही समजेनासे होऊन एकमेकांकडे पहातात.)

**याकूतखान** : (गोंधळून, घाबरुन) हुजूर . . . ! अपनोंकी याने . . ?

**अफझलखान** : (थंड डोक्याने पण खुनशीपणे) इतना डरने की कोई जरुरत नहीं है। अपनोंकी मतलब अपनोंकी। (काही वेळ थांबून मग) आपको जान लेनीं है हमारी सब बेगमोंकी। (सर्वजण चक्रावतात, अर्थबोध न होऊन पुन्हा एकमेकांकडे पहातात.)

**सर्वजण** : (सर्वजण एकदम ओरडतात) क्या...... ?

**अफझलखान** : हूँ। हमारी सब की सब तीरसठ बेगमोंको मौत के घाट उतारने का जीम्मा हम आपके उपर छोड रहे है। और याद रहे, ये सब जल्द से जल्द होना जरुरी है।

**याकूतखान** : जी हुजूर ...!

**मुसाखान** : गुस्ताखी माफ हो हुजूर, लेकिन हमारी समझ में कुछ नहीं आ रहा है।

**सय्यदबंडा** : हुजूर, हम जानते हैं की हमें आपको पूछने का कोई अधिकार नहीं है। फिर भी हम ये जानना चाहते हैं की ऐसा क्यूँ ?

**अफझलखान** : (चिडून) खामोश। चूप। आप लोगोंको ये जानने का ना कोई हक है, और ना ही हमें आपको कुछ बताने की जरुरत। आईंदा ऐसी गुस्ताखी कभी मत करना, नहीं तो जान से हाथ धोने पडेंगे। (सर्वजण शरमेने खाली मान घालून उभे रहातात)

**अफझलखान** : अगले हफ्ते हमें मुहिम पर निकलना है। हमारे जाने की तैयारी करो। और आप सब लोग भी तैयार रहो। चलो, निकलो सब।

**सर्वजण** : (सर्वजण) जी हुजूर ...! (कुर्निसात करतात व सर्वजण बाहेर जातात.)

**अफझलखान** : (स्वगत) सिवाजी को मारने के इरादे से निकल रहे हैं। मगर कौन जाने क्या

हो जाए। अगर सिवाजी को मारने के बजाय उसने ही हमें मार डाला तो? ..... नहीं, नहीं। ऐसा नही हो सकता। .... मगर हुवा तो? हमारी ना मौजूदगी में अगर हमारी बेगमोंने किसी और को अपनाया, या किसी गैरमर्द के साथ नाजायज संबंध रखे तो? ..... नहीं, नहीं। हमे ये कतई मंजूर नही होगा. .... इन लौंडीयोंपर विश्वास रखना ठीक नही। और हमारी औरतें किसी और की हो जाएँ इससे बेहतर ये होगा की हम उन्हें ही जाने से पहले खल्लास कर दें। (जोरजोराने निर्दयीपणे, क्रूरपणे हसतो .. आणि पडदा पडतो.)

**अंक पहिला**
**प्रवेश दुसरा समाप्त**

-❖❖❖-

# अंक पहिला
## (प्रवेश तिसरा)

(राजगडावरील दरबार)
(शिवाजी महाराज उच्चासनावर बसले आहेत. मोरोपंत, नेताजी पालकर, बहिर्जी नाईक, जिवा महाला, संभाजी कावजी, कान्होजी जेधे सर्वजण उपस्थित आहेत.)

**शिवाजी** : पंत, कसं काय चाललंय सर्व? काही समस्या तर नाही ना दैनंदिन कामकाजा बाबतीत?

**मोरोपंत** : नाही महाराज, प्रत्येक अधिकारी आपलं काम चोख करताहेत, त्यामुळे ठीक आहे सर्व.

**शिवाजी** : छान! (थोडावेळ थांबून) पंत, आमच्या मनात एक कल्पना आहे. सततच्या लढाया हा सध्या आपला जीवनक्रमच बनला आहे. त्यामुळे बहुतांश सैनिकांना सतत मोहिमेवरच रहावे लागते. सैनिकांचे मनोधैर्य वाढविण्याकरीता, तसेच त्यांना शिस्तीचे महत्व कळण्याकरीता युद्धशास्त्रातील जाणत्या, तज्ज्ञ व्यक्तिंमार्फत त्यांना प्रशिक्षित केले जावे असा आमचा विचार आहे. मोहिमेवरुन परतलेल्या सैनिकांना काही दिवसांच्या विश्रांतीकरीतां घरी पाठवून ताजेतवाने होऊ द्यावे व परतल्यावर प्रशिक्षित केले जावे. आपल्या आप्त-स्वकियांना भेटून आल्यावर ते पुन्हा नव्या उत्साहाने प्रशिक्षणार्थ रुजू होऊन, नव्या दमाने कामगिरीवर जाऊ शकतील. सैन्यात शिस्त आली की सेनापतीलाही निर्णय घेणे सोपे होते.

**मोरोपंत** : जशी आज्ञा महाराज.

**शिवाजी** : नेताजीराव, आपल्याला काय वाटते?

**नेताजी** : होय महाराज. आपण म्हणता ते बरोबर आहे. अधूनमधून असे केल्यास शिपाईगडीपण त्याला चांगला प्रतिसाद देतील.

**कान्होजी** : महाराज, सैनिकांप्रती असलेल्या आपल्या या तळमळीमुळेच आपला प्रत्येक मावळा आपल्यावरुन जीव ओवाळून टाकण्याची इच्छा बाळगतो. स्वराज्याच्या निर्मितीकरीतां म्हणूनच ते जीवावर उदार होऊन परसैन्यावर तुटून पडतात.

**शिवाजी** : बरोबर आहे तुमचं. म्हणूनच तर केवळ या सैनिकांच्या आणि

आपल्यासारख्या मातब्बर साथिदारांच्या सहकार्याने एक ना एक दिवस आपणासर्वांचे स्वराज्याचे स्वप्न साकार होईल हा आत्यंतिक विश्वास आम्हांस आहे. हे स्वप्न साकार होण्याकरितां आमचा स्वतःचा जीव ही पणास लावण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.

**कावजी** : महाराज, आपला बहुमूल्य जीव पणास लावण्याची वेळ कधीही येऊ नये. त्याकरीतां आम्ही शिपाईगडी आहोत. आपण निर्धास्त असावे.

**जीवा महाला** : महाराज, कधी वेळ आलीच आपल्यावर तर आमच्या प्राणांची कुर्वंडी करुन टाकू आम्ही. येणारा प्रत्येक घाव आम्ही सोसू. आपल्याला किंचीतही इजा होऊ देणार नाही.

**शिवाजी** : हो. खात्री आहे त्याची आम्हाला. आपल्यासारखे शूरवीर हीच तर आमची खरी दौलत. या थोर दौलतीचेच तर आम्ही राजे आहोत. (एवढ्यात बाहेरुन बहिर्जी नाईक प्रवेश करतो)

**बहिर्जी** : मुजरा महाराज. (महाराजांकडे पाहून मुजरा करतो.)

**शिवाजी** : बहिर्जी काय खबर आहे? आज अचानक राजगडावर कसे काय? सर्व ठीक तर आहे ना?

**बहिर्जी** : क्षमा असावी महाराज, पण सर्व काही ठीक आहे असं नाही म्हणता येणार. किंबहुना पुढे येणाऱ्या वादळाची चाहूल लागावी अशी लक्षणे मात्र दिसताहेत.

**शिवाजी** : म्हणजे? असं कोड्यात का बोलताहात आपण? काही विपरीत खबर आहे का?

**बहिर्जी** : होय महाराज! स्वराज्यावर एक फार मोठं संकट येऊ पहात आहे. आदिलशाही दरबारातील एका सरदारानं आपणाला पकडून विजापूरात नेण्याचा विडा उचलला आहे.
(महाराज शांत रहातात. केवळ एक भुवई उंचावून आश्चर्य व्यक्त करतात. तर इतर सर्वजण मात्र धक्का बसून एकमेकांकडे पहातात. आणि एका स्वरात ओरडतात)

**सर्वजण** : काय? . . . .

**मोरोपंत** : (स्वतःला धक्क्यातून सावरत) बहिर्जी, आपण हे काय सांगत आहात? महाराजांना पकडण्याचा विडा? . . .

**नेताजी** : असंभव! कोणीही असला वेडा विचार मनात देखील आणू शकणार नाही. आपली काही तरी चूक होत असावी.

**शिवाजी** : पंताजी, नेताजी, जरा सावकाशीने घ्या. त्यांना बोलू दे तरी अगोदर

पूर्णपणे. बहिर्जी, काय ते आम्हांस सविस्तर सांगाल का ?

**बहिर्जी** : महाराज, आदिलशहाच्या दरबारातून एक खंदा सरदार स्वराज्यावर चाल करुन येण्यास निघाल्याची पक्की खबर आहे. ही महत्वाची खबर देण्यासाठीच मी स्वतः इकडे आलो आहे.

**शिवाजी** : बहिर्जी, पण अजून नांव नाही सांगितलंत आपण त्या सरदाराचं ? कोण आहे तो सरदार ?

**बहिर्जी** : अफझलखान ! (अफझलखानाचे नांव ऐकताच सर्वजण दचकतात)

**शिवाजी** : (आश्चर्याने ) कोण ? अफझलखान ?

(महाराजांच्या चेहऱ्यावरील आश्चर्याचा आविर्भाव हळूहळू बदलतो. काही वेळ डोळे बंद करुन घेऊन ते मनोमन काही विचार करतात. आणि मग निग्रहीपणे बोलतात.) छान ! चांगली खबर आहे.

(महाराजांच्या बोलण्याने काहीच अर्थबोध न होऊन सर्वजण एकमेकांकडे पहातात. आपापसात काहीतरी कुजबुजतात, मधेच महाराजांकडे बघतात. महाराज मात्र शांत आहेत.)

**मोरोपंत** : बहिर्जी, आपण जे सांगताहात ते सर्व खरं आहे ना ? आमचा विश्वासच नाही बसत यावर. (महाराजांकडे वळून पहात) आणि महाराज आपल्याला हे ऐकून धक्का नाही बसला ? आपण तर शांत आहात; आम्हाला तर काही समजेनासंच झालं आहे.

**शिवाजी** : धक्का ? आणि तो का म्हणून पंत ? असले कितीसेच धक्के पचवले आहेत आम्ही यापूर्वी. स्वराज्याचे कंकण हाती बांधले त्यावेळीच असे खूपसे धक्के खावे लागणार याची खात्री होती आम्हाला. जातीने युद्धावर जाण्याची सवय आहे आमची. रणांगणावर जाणाऱ्या प्रत्येकाचे मन खंबीर असायलाच हवे अन् सावधही. आणि सावध असल्यास धक्का बसण्याची शक्यता कमी होते. म्हणूनच फारसा धक्का बसलेला नाही आम्हाला. ..... मन शांत असेल तर प्रत्येक घटनेतील एक वेगळाच अर्थ उमगतो कधीकधी !

**मोरोपंत** : महाराज आपल्या मनाचा थांगपत्ताच लागत नाही. आपल्या प्रत्येक निर्णयाचा आम्हांस जरी काहीच अर्थ उमगला नाही तरी आपली प्रत्येक गोष्ट अर्थगर्भ असते एवढे मात्र नक्की.

**शिवाजी** : पंत, पुरे पुरे ! अहो, आम्हीही तुमच्यासारखेच एक शिपाईगडी. हां, मात्र प्रत्येक गोष्ट आम्ही चिंतनपूर्वक केलेली असते एवढे मात्र खरे. बहिर्जी, आणखी काय माहिती आहे आपल्याकडे ?

**बहिर्जी** : महाराज, अफझलखानासोबत अनेक मातब्बर सरदार आहेत. शिवाय दहा हजारांचे पायदळ, तीनशे उंट, पाचशे हत्ती, शिवाय घोडदळ इत्यादी खूप फौज आहे.

**शिवाजी** : वा! म्हणजे खान भरपूर तयारीनिशी येतो आहे म्हणायचे. पंत आम्हास आता खूपच तयारी करावी लागणार आहे. अफझलखानाशी टक्कर हा साधासुधा मामला नाही. नेताजी, कान्होजी आपण सर्वजण तयार आहात ना खानासंगे लढायला?

**नेताजी** : महाराज, आपण फक्त हुकूम करा, आम्ही तयार आहोत खानाशी दोन हात करायला.

**शिवाजी** : जिवाजी, संभाजी कावजी आपणही तयारीत रहावे. अर्थात, आम्हांस या विषयावर अजून पुरता विचारविमर्ष करायचा आहे. एकंदर परिस्थितीचा अंदाज घेऊन त्याप्रमाणे रणनिती आखावी लागेल. त्याकरितां आम्हांस वक्त हवा आहे. आपण सर्वजण निघा आता. मात्र सतत आमच्या संपर्कात रहा म्हणजे सोयीचे होईल. पंत आपण थांबा थोडावेळ. आपल्याशी काही चर्चा करायची आहे.

**मोरोपंत** : जी महाराज.

**सर्वजण** : जी महाराज. (मोरोपंत सोडून बाकी सर्वजण राजांस मुजरा करुन निघून जातात. मोरोपंतांशी राजे काही बोलताहेत. रंगमंचावर हळूहळू अंधार होतो. ... पडदा पडतो.)

## अंक पहिला
## प्रवेश तिसरा समाप्त

-❖❖❖-

# अंक पहिला
## (प्रवेश चवथा)

(राजगडावरील एक दालन.)
(जिजाबाई महालात आराम करताहेत. एवढ्यात शिवाजी महाराज प्रवेश करतात. आऊसाहेबांना मुजरा करतात.)

**शिवाजी** : मुजरा आऊसाहेब!

**जिजाबाई** : ये शिवबा, काय खबर आहे? काही खास कारण?

**शिवाजी** : (मनातील विचार आऊसाहेबांना सांगावे की न सांगावे या संभ्रमात) तसं काही नाही आऊसाहेब. सहज आलो होतो.

**जिजाबाई** : सहज! वा!! छान. म्हणजे सर्व काही सुरळीत चालू आहे म्हणायचे?

**शिवाजी** : हो.... नाही..... जवळ जवळ तसंच!

**जिजाबाई** : शिवबा, काय झालंय आज? नाही, म्हणजे तुम्ही जरी काही लपविण्याचा प्रयत्न करीत असलात तरी तुम्हाला नाही जमत ते. तुमच्या चेहऱ्यावरील चिंता इतर कोणालाही नसली तरी आम्हाला मात्र लगेच कळते. तुम्ही नका लपवित जाऊ काही, चिंतेचे कारण कोणते ते सांगा आम्हाला.

**शिवाजी** : आऊसाहेब, खरंच काही चिंता नाही. चिंता कशाची असणार?

**जिजाबाई** : हो? मग ठीक आहे. फक्त बहिर्जी कशाकरीतां आले होते तेवढे तरी आम्हांस समजेल का?

**शिवाजी** : म्हणजे आऊसाहेब . . . !

**जिजाबाई** : हो. आमच्यापर्यंत खबर पोचली सारी. शिवबा, तुम्ही नाही सांगितलेत तरी आमचे हेरही असतात जागोजागी. आम्हीही एका थोर राजांच्या आऊसाहेब आहोत. तेव्हा राजांनी काहीही नाही सांगितले तरी काही हरकत नाही. नाही का?

**शिवाजी** : तसं नाही आऊसाहेब. आम्ही सांगणारच होतो आपल्याला.

**जिजाबाई** : केव्हां? खान येऊन गेल्यावर?

**शिवाजी** : (आश्चर्याने ) काय.......? म्हणजे ......?

**जिजाबाई** : राजे, लपवाछपवी पुरे झाली आतां. सांगा खरंखरं काय ते. अफझलखान स्वराज्यावर चाल करुन यायच्या तयारीत आहे. खरं आहे ना हे?

**शिवाजी** : हो आऊसाहेब.

**जिजाबाई** : मग आता काय करणार आहात आपण? खानाची फौज भारी. शिवाय

हत्ती, उंट, तोफखाना साथीला. राजे आता तुम्हाला नाही पण आम्हाला मात्र चिंता सतावू लागली आहे. काल रात्रीपासून डोळ्याला डोळा लागला नाही आमचा. आमच्या मनात सतत या खानाचेच विचार येतात. (अचानक स्वर कंपीत होतो.) शिवबा, काही विपरीत तर घडणार नाही ना? तुमच्या थोरल्या बंधूंची मूर्ती नजरेसमोर येते. याच अफझलखानाने त्याला ........ (आऊसाहेबांना पुढे बोलवत नाही. त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे रहातात. किंचित सावरुन) शिवबा, आता पुन्हा तसं काही नाही ना होणार? (डोळ्यांत येणारे अश्रू अनावर होतात. पदराने पुसण्याचा प्रयत्न करतात.)

**शिवाजी** : आऊसाहेब! आऊसाहेब!! (महाराजांचा स्वरही कंपीत होतो. पण लगेच स्वतःला सावरतात) आऊसाहेब. नाही होणार तसे काही. आपण आवरा स्वतःला.(आऊसाहेबांना धीर देण्यासाठी तडफदारपणे बोलतात.) आऊसाहेब, आम्ही वचन देतो आपल्याला; या खानाला आम्ही याच जमिनीत गाडू. आपण पूर्ण निश्चिंत असावे.

**जिजाबाई** : (स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करीत थोड्याशा उमेदीने विचारतात.) राजे, खरंच होईल तसं? शक्य आहे खानाला परास्त करणं?

**शिवाजी** : (आत्मविश्वासाने) कां नाही? शक्य आहे. निदान आम्हाला तरी तसं वाटतं आऊसाहेब. आम्ही क्षत्रिय आहोत आणि क्षत्रियांनी स्वतःला कधीच कमी लेखायचे नसते. आपल्याकडील सर्व शक्तिनिशी शत्रूवर तुटून पडणे हाच त्याचा धर्म असतो. आणि आम्ही, आमच्या संपूर्ण सामर्थ्यानिशी, आमची सर्व युद्धनिती पणास लावून खानाशी मुकाबला करणार आहोत. आमचा आमच्यावर पूर्ण विश्वास आहे. अर्थात, युद्धांत ऐनवेळी काहीही होऊ शकते हे आम्ही अजिबात नाकारणार नाही. किंबहुना, आपणासही याची पुरती जाणीव आहे. युद्धांत जय-पराजय ठरलेलाच असतो पण पराभूत मानसिकता ठेवून युद्धांत उतरायचे नसते तर शत्रूला ठेचण्याच्याच इराद्याने यात झोकून द्यायचे असते. आम्ही सर्व ते प्रयत्न करुं. आई भवानीचा वरदहस्त मात्र आमच्या पाठीशी असावा हेच तिच्याशी मागणे!

**जिजाबाई** : (स्वतःला त्यांनी आता सावरलं आहे) राजे, तुम्ही असे तडफेने बोलू लागलात की मनातील भिती कुठच्याकुठे पळून जाते. आपलं बोलणं ऐकत रहावसं वाटतं. आपल्या या अशा धीरोदात्त स्वभावाच्या प्रेमात पडून आणि त्यावर विश्वासूनच आपले सवंगडी आपल्यासोबत या

स्वराज्य लढ्यात सामील झाले आहेत.

**शिवाजी** : होय आऊसाहेब, आम्हांसही ते ठाऊक आहे. आणि त्यांच्यासारखे सोबती आहेत म्हणूनच केवढाही बिकट प्रसंग आला तरी आम्ही खंबीर राहू शकतो. आमच्यासाठी प्रसंगी स्वतःचा जीव धोक्यात घालणारे साथीदार मिळणे हेच तर आमचे वैभव! असे साथीदार, असे सैनिक पाठीशी असतील तर अखंड हिंदुस्तान पादाक्रांत करणे आम्हांस अजिबात कठीण नाही.

**जिजाबाई** : राजे, क्षणमात्र आम्ही चिंतेने ग्रासलो होतो. पण आता नाही. या स्वराज्याच्या स्थापनेसाठी प्रसंगी तुमचा जीव धोक्यात घालावा लागला तरी मागे हटू नका. येईल त्या प्रसंगास आम्ही सामोरे जाऊ; आपण निश्चिंत व्हावे.

**शिवाजी** : आऊसाहेब, आपल्या या बोलण्याने आम्हीं आता पुरते निर्धास्त झालो आहोत. आता येऊ दे त्या खानांस. त्याच्याशी संपूर्ण ताकदीनिशी लढायला आतां आम्ही तयार आहोत. आम्हांस आता आज्ञा द्या. आम्ही पुढच्या योजनेला लागतो.

(शिवाजी महाराज मुजरा करतात. एवढ्यात पडदा पडतो..)

## अंक पहिला
## प्रवेश चवथा समाप्त

-❖❖❖-

# अंक पहिला
# (प्रवेश पाचवा)

(अफझलखानाची छावणी)
(अफझलखान हुक्का ओढतो आहे. सय्यदबंडा, फाजलखान, मुसाखान हे सरदार समोर उभे आहेत.)

**अफझलखान :** सय्यद, विजापूरसे निकले हुए एक हप्ता हो गया है। हमने आप सब लोगोंको आगे की रणनीतिके बारेमें अपना अपना प्रस्ताव तैयार करने को कहा था। आज हमें इस बारेमेंही सोचना है। बोलो सय्यद, तुम्हारा मनसुबा क्या है?

**सय्यदबंडा :** हुजूर, मेरी सोचसे बीना वक्त गुजारे जितनी हो सके जल्द से जल्द हमें सिवाजी को गिरफ्तार करना चाहिये।

**फाजलखान :** जी पिताजी, मुझे तो लगता है की, सिवाजी कहाँ है उसका पता लगाकर झटसे जाकर उसे गिरफ्तार करना चाहिये।

**अफझलखान :** बहोत अच्छे! आपको क्या लगता है, हमारे आक्रमण की खबर सुनकर भी वो हाथ पे हाथ रखकर बैठा रहेगा और हमारे वहाँ पहुँचतेही सामने आकर हमारे आधीन होगा? बेवकुफों जैसी बातें मत करो।

**मुसाखान :** वो सिवाजी तो बस एक चूहा है। उसे पकडने में कितना वक्त लगेगा?

**अफझलखान :** (संतापून) अगर वो चूहा है, तो क्या हम ये इतनी सारी फौज लेके निकले हैं, तो हम पागल है?

**मुसाखान :** माफ कीजिए हुजूर, माफ कीजिए।

**अफझलखान :** (पुन्हा एकदा संतापून रागाने) कैसी माफी? आप लोगोंसे हम मशवरा ले रहें हैं इसका मतलब समझते हो? कुछ अक्लमंदी की बातें करो। मूँह से बोलना और कर दिखाना इसमें बहोत फर्क होता है। क्या आपमेंसे कोई सिवाजी को पकडके ला सकता है? नहीं तो ये फिजूल की बातें बंद कर दो। आप सब लोगोंसे हम अच्छे खासे तरकीब की उम्मीद कर रहे हैं और आप सब ये बेवकूफों जैसी बातें कर रहे हो। हम खुदही सोचेंगे की क्या करना है। चले जाव सब लोग, चले जाव। कोई जरुरत नहीं है तुम्हारी।

**सर्वजण :** (घाबरे घुबरे होऊन) माफ कीजिए हुजूर, माफ कीजिए।

**अफझलखान :** (रागाने) चले जाओ इधरसे। चलो।

**सर्वजण :** जी हुजूर, जी हुजूर। (सर्वजण घाबरुन कुर्निसात करुन निघून जातात.

अफझलखान एकटाच येरझारा घालत विचार करतो. कांही वेळाने पहारेकऱ्याला आवाज देतो)

**अफझलखान :** कौन है उधर? जल्दी आओ।

**पहारेकरी :** (प्रवेशून कुर्निसात करतो.) जी हुजूर।

**अफझलखान :** अभी के अभी हमारे वकिलसाब कृष्णाजी को हाजिर किया जाए।

**पहारेकरी :** जी हुजूर। (कुर्निसात करतो आणि बाहेर जातो) अफझलखान पुन्हा येरझारा घालत विचार करतो. कांही वेळाने कृष्णाजी भास्कर प्रवेश करतो.)

**कृष्णाजी :** (प्रवेशून कुर्निसात करतो.) जी हुजूर।

**अफझलखान :** आइये आइये कृष्णाजी। हम आपकाही इंतजार कर रहे थे।

**कृष्णाजी :** हुजूर, क्या बात है? इतनी जल्दीसे बुलाया हमको?

**अफझलखान :** वकिलसाब, हम सिवाजी को पकडने के इरादे से विजापूरसे निकले हैं। और आपकी होशियारी और आपका राजनीतीका ज्ञान ध्यानमें रखकर हमारी मदद के लिए आपको साथ लेके आये हैं ये आपको भी मालूम है।

**कृष्णाजी :** जी हुजूर। हम आपकी मदद के लिए हरवक्त तैयार हैं। बोलिये क्या हुक्म है?

**अफझलखान :** हुक्म नहीं, बल्कि हम चाहते हैं की आप हमें थोडी सलाह दे।

**कृष्णाजी :** जी हुजूर।

**अफझलखान :** वकिलसाब, आपका क्या खयाल है, हमें कैसे आगे बढना होगा? सिवाजी हमारी मुट्ठीमें कैसा आएगा?

**कृष्णाजी :** माफ करना हुजूर। हमें गलत मत समझना। जो सही लगती है वही बात हम आपके सामने रखेंगे।

**अफझलखान :** हां, ठीक है वकिलसाब, बोलिये।

**कृष्णाजी :** हुजूर, अभी जिस प्रदेशसे हम गुजर रहे हैं वो मैदानी इलाका है। शिवाजी बहोत चालाख हैं। वे कभी भी हमारे सामने इस मुल्कमें नहीं आयेंगे। क्योंकी उन्हें मालूम है की इस इलाकेमें वे हमारी फौज से टक्कर नहीं दे सकते। इसलिये सहजतासे वे हमारे हाथ कभी नहीं आ सकते।

**अफझलखान :** याने आप ये कहना चाहते हैं की हम कुछ भी करे बीना हाथ पे हाथ रखकर बैठ जायें?

**कृष्णाजी :** जी नही हुजूर। मेरी बात अभी खतम नहीं हुई। हमें कोई ऐसी तरकीब निकालनी होगी जिससे वे खुद इस इलाकेमें आने के लिये मजबूर हो जाए।

**अफझलखान :** हां, ये तो बिल्कुल सही फरमाया आपने। लेकिन ये कैसा मुमकिन होगा?

कैसे आयेगा वो हमारे पास ?

**कृष्णाजी** : हुजूर, शिवाजी अपनी लोगोंकी रक्षा के लिये कुछ भी कर सकते हैं, कुछ भी। क्योंकी वो अपनी प्रजासे बहोत प्यार करते हैं।

**अफझलखान** : वकिलसाब, आप हमारे वकील है, या उस काफर सिवाजी के ? आप हमें सिवाजी को पकडने की तरकीब बता रहें है, या उसकी तारीफ कर रहे हैं ?

**कृष्णाजी** : माफ कीजिये हुजूर। हम उसकी तारीफ नहीं कर रहे हैं। हम आपको मसलत सूझा रहे हैं। हमें चाहिये की हम इस इलाके के लोगोंको इतना तंग करें, इतना तंग करें की वे उनकी रक्षा के लिये स्वयं इस इलाकेमें आने के लिये मजबूर हो जाये। अगर किसी भी तरह शिवाजी इधर आते हैं तो इस मैदानी इलाके में हम उन्हें बडी सहजता से मात दे सकते हैं। हमारी सेना ऐसे प्रदेश में लढाई में माहिर है। हमारे हाथी, उंट ये इन मैदानी इलाकोंमेंही फायदेमंद साबीत होंगे। इसलिये मेरा मशोहरा है की, किसी भी तरकीबसे शिवाजी को इस इलाकेमें आने के लिये हमें मजबूर करना चाहिये।

**अफझलखान** : वाह, वकिलसाब, वाह। आपने तो बहोत अक्लमंदीकी सलाह दी है। हम खुष हैं।

**कृष्णाजी** : हुजूर, मैं तो बस आपका नौकर हूँ। जो कुछ कहूँगा आपकी भलाई का ही कहूँगा।

**अफझलखान** : कृष्णाजी, हम आपको नौकर की तरह नहीं, बल्कि हमारे नजदिकी दोस्त मानते हैं। हमारे इस मुहिम के अंत तक आप हमारे पास ही रहेंगे। आजसे आप रोज दरबारमें बाकी लोगोंके साथ हाजीर रहा करो। हम हर वक्त आपकी राय लेना चाहेंगे।

**कृष्णाजी** : जी हुजूर। जैसी आपकी मर्जी। (कुर्निसात करतो.)

**अफझलखान** : आप अभी जा सकते हैं। (कृष्णाजी भास्कर बाहेर जातात.)

**अफझलखान** : कौन है उधर ?

**पहारेकरी** : (प्रवेशून कुर्निसात करतो.) जी हुजूर।

**अफझलखान** : हमारे सभी सरदारोंको फौरन पेश होने की इर्शाद दे दी जाए।

(अफझलखान येरझारा घालत विचार करतो. मधेच जाऊन उच्चासनावर बसतो. पुन्हा खाली उतरून येरझाऱ्या घालतो. थोड्यावेळाने सय्यदबंडा, फाजलखान, मुसाखान, याकूतखान प्रवेशतात.)

**सर्वजण** : जी हुजूर। (कुर्निसात करतात. कांही वेळापूर्वी खानाने घालवून दिलेले असल्याने भीत भीत उभे रहातात. मध्येच एकमेकांकडे प्रश्नार्थक पहातात.)

**अफझलखान :** (उपहासाने) आइये, आइये। तशरीफ रखिये। बहोत खूब मसलतें जो दी है आपने। (सर्वजण एकमेकांकडे गोंधळून पहातात. खान जरबयुक्त स्वरांत पुढे बोलतो) इसके आगे जैसा हम बोलेंगे वैसा हीआप करेंगे। समझे? (आसुरी स्वरांत) अपने सब सैनिकोंको कह दो की अब हम जिस मुल्क में जायेंगे उधर के लोगोंको जितना हो सके तंग कर दो। घरोंकी, खेतोंकी तबाही कर दो। लूट लो, आग लगा दो सारे मुल्क में। आपका जैसा मन चाहे वैसा करो। लोग इतने तंग हो, की सिवाजी को खुद उन लोगोंकी रक्षा के लिये आना पडे। चलो, निकलो इधरसे। कल से मुल्क में तबाही का आलम शुरु होना चाहिये! तबाही का आलम!! (सर्वजण जातात.) हा..... हा...... हा....... हा .....! (क्रूरतेने भेसूर हसतो) तबाही का आलम ..! तबाही का आलम ..!! हा..... हा...... हा..... हा ......!!! (रंगमंचावर हळू हळू अंधार पसरतो. थोड्याच वेळांत रंगमंचाच्या मागच्या पडद्यामागे मुसलमान सैनिक निष्पाप नागरीकांच्या करत असलेल्या छळाच्या पडछाया दिसतात. ठिकठिकाणी लागलेल्या आगीचे लोळ दिसतात. मुस्लिम शिपायांच्या धरो, पकडो, मारो अशा क्रूर, निर्दयी आरोळ्या व नागरीकांच्या रडण्याओरडण्याचे, किंचाळण्याचे भीतीग्रस्त आवाज ऐकू येतात. ........ पडदा पडतो)

**अंक पहिला**

**प्रवेश पाचवा समाप्त**

-❖❖❖-

# अंक पहिला
## (प्रवेश सहावा)

(राजगडावरील एक दालन. शिवाजी महाराज गवाक्षांत उभे राहून कसलातरी विचार करत सभोवतालचा परीसर न्याहाळत आहेत. एवढ्यात मोरोपंत प्रवेश करतात.)

**मोरोपंत** : (प्रवेशून) मुजरा महाराज.

**शिवाजी** : कोण ? पंत...!

**मोरोपंत** : जी महाराज.

**शिवाजी** : बोला काय खबर आहे. खानाबद्दलची आणखीन काही माहिती हाती आली आहे का ?

**मोरोपंत** : अजून तरी नवीन काही नाही. (थोडं थांबून) पण महाराज, आपण कसल्या विचारात आहात का ? काळजीत दिसता.

**शिवाजी** : अर्थातच. पंत, हा खान आमच्या हद्दीत घुसल्यापासून सतत काळजीतच आहोत आम्ही. आपणांस हे ठाऊक नाही का ?

**मोरोपंत** : ठाऊक आहे महाराज. पण आम्हांस वाटले याक्षणी आपल्याला दुसरी कोणती तरी काळजी वाटत असावी आणि आपण त्या विचारांत असावेत.

**शिवाजी** : दुसरी कोणती तरी काळजी ? म्हणजे ? आम्ही समजलो नाही.

**मोरोपंत** : महाराज, क्षमा असावी. पण आम्हांस वाटले आपण काही कौटुंबीक काळजीत आहात.

**शिवाजी** : अहो पंत, काय ते स्पष्ट बोला. आज असे कोड्यात कां बोलू लागलाहात आपण ?

**मोरोपंत** : महाराज, स्पष्ट बोलतो. राग नसावा. आम्हांस वाटले आपण राणी सरकारांच्या काळजीत आहात.

**शिवाजी** : हुं. बरोबर आहे तुमचं. राणी सरकारांची काळजी तर आहेच. पण त्या पेक्षाही खानाच्या आक्रमणाची काळजी आम्हांस जास्त वाटते.

**मोरोपंत** : महाराज. काल रात्रीपासून राणी साहेबांची प्रकृती जरा जास्तच बिघडल्याचे कानावर आले, म्हणून आपल्या भेटीस आलो होतो. पण आपण तर त्यांच्या प्रकृतीच्या काळजीऐवजी, खानाचीच काळजी करत आहात.

**शिवाजी** : पंत, आपण म्हणता ते बरोबर आहे. (एक खोल निःश्वास टाकतात. दूरवर दृष्टी लावून) काल पासून राणी साहेबांचा आजार आणखिनच बळावला आहे. ........ वैद्यांचे उपचार सुरुच आहेत. बघूया कधी उतारा पडतो ते. ...... कीं पडणारच नाही ...... कोण जाणे!

**मोरोपंत** : महाराज, असं कां म्हणता आपण? राणी सरकार ठीक होतील, आराम पडेल त्यांना.

**शिवाजी** : पंत, खोट्या आशेवर किती दिवस म्हणून विसंबून रहायचे? राणी सरकारांचा आजार हा काही काल परवाचा नाही. शंभूराजे जन्माला आले त्या वेळच्या बाळंतपणापासूनच हा आजार जडला आहे त्यांना. मागची दोन वर्षे अंगावर पेलताहेत त्या. वैद्य झाले, हकीम झाले पण अजून काही गुण पडत नाही. कालपासून तर त्यांची तब्येत जास्तच बिघडली आहे. .... आम्हांस आता भ्रमांत राहून चालणार नाही. मनाची पुरती तयारी केली आहे आम्ही. कधीही काहीही होऊ शकेल.आजारपणामुळे होणारे त्यांचे हाल आतां पाहवत नाहीत आम्हाला. छोटे शंभूराजे तर बिचारे जन्मास आल्यापासूनच आईच्या सुखास पारखे झालेत. एकदांही कधी आपल्या आईच्या दुग्धपानाचा लाभ त्यांना झालेला नाही. धाराईच्या दुधावरच पोसले जाताहेत ते. मातृत्वाचे सुख बाळराजांना देऊ न शकल्यामुळे राणी साहेबांची नुसती तगमग तगमग होते. धडपणे बाळराजांना खेळवण्याचे सुखही नाही त्यांच्या नशीबी. एखाद्या आईची त्यामुळे होणारी ती तडफड आम्ही रोज पहातो आहोत. बिचारी सई.....! आम्ही राजे असूनही काहीच करु शकत नाही. यामुळे आम्हांस किती यातना होतात कशा कळणार कुणाला? ... (राजांचे डोळे पाण्याने भरुन येतात. पण हळू हळू ते स्वतःला सावरतात.)

**मोरोपंत** : महाराज.... (राजांचे बोलणे ऐकता ऐकता पंतांचे डोळेही पाणावतात. तेही उपरण्याने आपले डोळे पुसतात)

**शिवाजी** : पंत, आम्हाला कधीकधी सारखे भय वाटते की, या अशा आई असूनही न लाभत असलेल्या मातृत्वामुळे बाळराजांच्या मनात कायमची काही अढी तर निर्माण होणार नाही ना? वय वाढतां वाढतां त्यांचा स्वभाव एककल्ली तर होणार नाही ना? आम्ही तर राजकारणात कायमच व्यस्त असतो. या सततच्या लढाया, आज एका ठिकाणी तर उद्यां दुसऱ्या ठिकाणी. आम्ही त्यांना पुरता वेळही देऊ शकत नाही; आणि आमच्या गैरहजेरीत ज्यांनी त्यांचे आई-बाप व्हायचे त्या आमच्या राणीसाहेब, त्या या अशा सतत

आजारी. आम्हांस तर भिती वाटते की मोठे होता होता बाळराजे आमच्या पासूनही दुरावणार तर नाहीत ना? .... काही समजत नाही. विचारांचा नुसता कल्लोळ माजतो डोक्यात. (महाराजांचे डोळे पुन्हा पाणावतात. पण पुन्हा एकदां ते डोळ्यांतले अश्रू निग्रहाने परतवतात. थोडावेळ दोघेही गप्प होतात. हळू हळू राजे स्वतःला सावरतात)

**शिवाजी** : पंत, राहू द्या आंता तो विषय. कामकाजाचे काही पाहूया. बहिर्जींना खानासंबंधी आणखीन माहिती काढायला सांगितली होती. अजून कांही कळले नाही. कांही निरोप आला का त्यांचा?

**मोरोपंत** : नाही महाराज. अजून काही समजले नाही. (एवढयांत बहिर्जी नाईक प्रवेश करतो)

**बहिर्जी** : मुजरा महाराज.

**शिवाजी** : या बहिर्जी या. आम्ही आता तुमचीच याद काढत होतो. बोला काय खबर आहे?

**बहिर्जी** : महाराज, अफझलखान विजापूराहून निघाला आहे. त्याच्यासोबत बारा हजार घोडदळ, दहा हजार पायदळ, पांच हजार राखीव सैन्य, बाराशे उंट, पंच्याऐशीं हत्ती, सुमारे ऐशी ते नव्वद तोफा इत्यादी भरपूर सरंजाम आहे. विजापूराहून निघताना आपल्या त्रेसष्ट बेगमांना कंठस्नान घालून तो आम्हांवर चाल करुन येतो आहे. खबर आहे की त्याने आपल्या प्रदेशांत पाय ठेवल्यापासून लोकांवर अत्याचार करण्यास सुरुवात केली आहे.... (बहिर्जीचे बोलणे सुरु असतानांच बाहेर कोलाहल ऐकू येतो. बाहेर दूरवरुन शेतकरी, गांवकरी आले आहेत. त्यांचा आवाज येतो. आम्हाला राजांना भेटायचं आहे. .....आम्हाला राजांना भेटायचं आहे. पहारेकरी त्यांना सांगताहेत, राजे आता या वेळेला भेटू शकणार नाहीत पण ते ऐकत नाहीत त्यांचे मागणे चालूच आहे.... )

**शिवाजी** : पंत, बाहेर कसली गडबड सुरु आहे? हा गोंधळ कसला? कोणास आमची भेट हवी आहे? चला जरा पाहून या. (पंत बाहेर जातात, लगेचच परत येतात.)

**मोरोपंत** : महाराज, बाहेर दूरवरून कांही गांवकरी, शेतकरी आले आहेत, आपली भेट मागताहेत. ऐकायला तयार नाहीत. आपल्यालाच भेटायचं आहे म्हणतात.

**शिवाजी** : ठीक आहे. पंत घेऊन या त्यांना आंत. ऐकूया तरी काय गाऱ्हाणं आहे त्यांचं ते.

**मोरोपंत** : जी महाराज (बाहेर जातात, कांही क्षणांत पुन्हा आंत येतात. त्यांच्यासोबत ३-४ गांवकरी शेतकरी प्रवेशतात. महाराजांकडे पाहून त्यांना मुजरा करतात.)

**सर्व गांवकरी** : मुजरा महाराज! मुजरा महाराज!

**शिवाजी** : काय झालं? एवढी गडबड कशासाठी? कुणी काही सांगेल का? (एका जाणत्या शेतकऱ्याला उद्देशून विचारतात) आबा, काय झालं? कोठून आलात आपण?

**एक शेतकरी** : महाराज, महाराज आम्हाला वाचवा हो, खूप लांबून आलो आहोत आम्ही. आमची मुलं-बाळं, घरं-दारं सर्वांवर संक्रांत आली आहे. तो खान आमची घरदारं, शेतं जाळत सुटला आहे. आमचं काही खरं नाही आता. आता आम्ही गरीबांनी काय करायचं. कुणीकडे जायचं?

**इतर गांवकरी** : होय महाराज, वाचवा आम्हांला. आतां तुमच्याशिवाय कुणी आधार नाही आमचा. सांभाळा आम्हाला.

**शिवाजी** : हो. धीर धरा. धीर धरा. आम्ही आहोत तुमच्या सोबत. खान फारच उन्मत्त झाला आहे. आम्ही काबूत करु त्याला. थोडा वेळ द्या आम्हांला.

**एक गांवकरी** : थोडा वेळ? महाराज खानानं आमचं जीणं नकोसं करुन टाकलंय. आमच्या बायका, मुली कोणाचीच अब्रू शाबूत रहायची नाही आता. फरफटत, फरफटत ओढून नेताहेत आमच्या बायकांना. कित्येकींची अब्रू कधीच गेली आहे. डोळ्यांदेखत शील लूटताहेत आणि किती वेळ थांबायचं आम्ही? नाही महाराज, नाही. आणखी थांबायला सांगू नका. नाहीतर पुन्हा आपल्या पायांशी तक्रार द्यायला देखील आमच्यातलं कुणी जिवंत उरणार नाही.

**शिवाजी** : आपणां सर्वांचं दुःख जाणतो आम्ही, पण खानाला टक्कर द्यायला आम्हाला पण काही वेळ हवाच ना? आम्ही लौकरच तोडगा काढू काहीतरी. आमच्यावर विश्वास ठेवा. आज मुक्काम करा वाड्यावर आणि उद्या सकाळी मग निघा आपल्या गांवी. घरी आपल्या माणसांना तुमची गरज आहे. या अशा वेळेला त्याना धीर द्यायला तुम्ही त्यांच्याजवळच असायला हवं. (मोरोपंतांना उद्देशून) पंत, या सर्वांची व्यवस्था करा वाड्यावर.

**मोरोपंत** : जी महाराज.

**एक गांवकरी** : महाराज, करा काहीतरी लौकर. नाहीतर आमचं काही खरं नाही. खानानं विजापूराहून निघताना आपल्या बायकांना जितं मारलं असल्याची खबर

सगळ्याला झाली आहे. खरं खोटं कुणास ठाऊक, पण ही खबर खरी असेल तर मग आमच्या बायका पोरांची तो काही पण गय करणार नाही. आम्ही काय करावं आता? महाराज, महाराज सांभाळा आम्हाला. आपल्यावाचून आता कोणीही वाली नाही. आपल्यावरच विश्वासून रहातो. येतो आम्ही. मुजरा महाराज. (सर्वजण मुजरा करतात, निघून जातात.)

**शिवाजी** : जगदंब! जगदंब!! काय हा उच्छाद मांडलाय खानाने. बायका मुलींना भ्रष्ट करीत सुटलाय. शिव! शिव!! (थोडावेळ थांबतात. कांही विचार करतात आणि निश्चयपूर्वक म्हणतात) नाही, आता वेळ घालवून उपयोग नाही. आमच्या रयतेच्या जीवावर उठलेल्या या खानाला आता ठेचलाच पाहिजे. (किंचित थांबून) मोरोपंत, कांही वेळापूर्वी आपण आम्हाला विचारत होता, की राणीसरकारांची प्रकृति ढासळलेली असतांनाही त्याची काळजी करण्याऐवजी आम्ही खानाच्या आक्रमणाची काळजी कां करतो आहोत? आतां समजले ना आपणांस? पंत, या खानाने आमच्या प्रजेचे जीणें हराम करुन टाकले आहे. प्रजा असाहाय्य झाली आहे अशावेळी आम्ही प्रजेची काळजी करावयाची की आमचेच दुःख कुरवाळत बसायचे? राजानं असं स्वार्थी होऊन नाही चालत! त्याची प्रजा हेच त्यांचं खरं कुटुंब. हे कुटुंब जो पर्यंत सुखरुप असत नाही तो पर्यंत राजाच्या वैयक्तिक सुख-दुःखाचा विचार हा त्याच्या दृष्टीने नेहमी दुय्यमच असायला हवा. राणी सरकारांची प्रकृति ढासळते आहे हे खरेच, पण आता याक्षणीं तरी स्वराज्याच्या ढासळत्या परिस्थितीचा आपणांस प्राधान्यतेने विचार करावयास हवा. स्वराज्यातील सर्वच स्त्रियांच्या अब्रूचा, जीवाचा असा हैदोस मांडला गेलेला असतांना बाकी सर्व विचार आतां फिजूल आहेत. (बहिर्जींकडे पाहून) बहिर्जी, विजापूराहून निघताना खानानं आपल्या बेगमांना जीवे मारल्याचा उल्लेख मघाशी आपण केला, आता आलेले ते गांवकरी, ते पण हेच सांगत होते, खरं आहे का हे सगळं?

**बहिर्जी** : होय महाराज. दुर्दैवाने ते खरे आहे. माझ्या सहकाऱ्यांकडून पण अशीच खबर मला मिळाली आहे. तेव्हां ही गोष्ट खरी असणारच. माझे सहकारी खात्री करुन घेतल्याशिवाय मला तसं कळवणारंच नाहीत.

**शिवाजी** : अरे, अरे! काय हे! बायकांवर हात उचलायला यांचे हात धजतातच कसे? बायकांचा आदर करायचा ही आमची संस्कृति, आणि हे

यवन......! पंत, आम्हाला आता त्वरेने काही तरी करावंच लागणार. खानाच्या या असल्या उपद्रवांमुळे आपल्या या मुलूखाची सगळी घडीच विस्कटून जाईल. सगळीकडे अराजक माजेल. नाही ...... आतां फार काळ वाट पाहून चालणार नाही. (निर्णायकी स्वरांत) पंत, येत्या दोन-तीन दिवसांत महत्वाची बैठक बोलावून त्यात सहभागी होण्यासाठी नेताजी पालकर, कान्होजी जेधे, संभाजी कावजी, जिवा महाला इत्यादी सर्वांना खलिता रवाना करा. चला निघा आतां, कामाला लागा.

**मोरोपंत** : जशी आज्ञा महाराज. (मुजरा करतात व निघून जातात)

**शिवाजी** : बहिर्जी, आपण थांबा थोडावेळ. आम्हांस आपल्याशी काही महत्वाच्या विषयावर बोलायचे आहे. या बसा इकडे.

(दोघेही बसतात. राजे काही बोलताहेत. रंगमंचावर हळूहळू अंधार होतो. पडदा पडतो.)

**अंक पहिला**

**प्रवेश सहावा समाप्त**

-❖❖❖-

# अंक पहिला
# (प्रवेश सातवा)

(राजगडावरील दरबार. शिवाजी महाराज उच्चासनावर बसले आहेत. मोरोपंत, नेताजी पालकर, जिवा महाला, संभाजी कावजी, कान्होजी जेधे, बहिर्जी नाईक उपस्थित आहेत व आसनांवर बसले आहेत.)

**मोरोपंत** : महाराज. सर्वजण हजर झालेत. आता सुरुवात करण्यास हरकत नाही.

**शिवाजी** : हं. आज आपणा सर्वांस येथे कां बोलाविण्यात आले आहे हे ठाऊक आहे ना ?

**सर्वजण** : जी महाराज.

**शिवाजी** : ठीक. अफझलखानाने आपल्या या स्वराज्यात उच्छाद मांडलेला आहे, हे आपणा सर्वांस ठाऊकच आहे. खानाच्या या उपद्रवांस वेळीच बंदोबस्त करणे आवश्यक आहे. आणि त्यासाठीची रणनीती ठरवितांना आपल्याही सूचना विचारांत घ्याव्यात असे आम्हांस वाटते. तेव्हां आपल्या मनात काय आहे ते स्पष्ट केल्यास बरें होईल. पंत, आपणांस यासंबंधी काय वाटते?

**मोरोपंत** : महाराज, अफझलखानाच्या करण्यांमुळे सर्व प्रजा हतबल झाली आहे तेव्हां शक्य तेवढ्या लवकर त्याला अटकाव करणे आवश्यक आहे.

**नेताजी** : महाराज, खानासंगे भरपूर कुमक, सैन्यबळ आहे. त्यामुळे त्याच्यावर चाल करुन जाण्यापूर्वी आपल्या सैन्याची पुरती जमवाजमव करायला हवी. त्यासाठी अजून काही अवधी मिळायला हवा.

**कान्होजी :** महाराज, आम्हांस नेताजींचे म्हणणे पटते. सैन्याची लगेच जमवाजमव करणे हे वाटते तेवढे सोपे नाही. कारण आपले सैन्य इतरही लहानसहान कामगिरीत गुंतले आहे. खानाच्या प्रचंड फौजेस टक्कर द्यायची तर हातीं भरपूर फौजफाटा असणे आवश्यक आहे.

**कावजी** : महाराज, खानांस प्रदेशांत येऊन एक महिन्यावर कालावधी लोटला आहे, अशावेळी आणखी जादा वेळ दिला तर तो लोकांचे किती हाल करील कोण जाणे. मला तर वाटते कारवाई लगेच सुरु करायला हवी.

**जिवा महाला** : महाराज, आपण आज्ञा देत असाल तर लगेचच खानावर तुटून पडण्याचा माझा विचार आहे. उगाच वेळ कां वाया घालवायचा?

**बहिर्जी** : महाराज, खानाच्या हालचालींचा, आजूबाजूचे कोणी त्याला साहाय्य

करण्यांचा विचार करताहेत का ते जाणून घेण्याचा प्रयत्न मी आणि माझे साथीदार अजून करतो आहोत. लौकरच यासंबंधी कांही गोष्टी आपणांस समजू शकतील. तसे झाले तर खानावर तुटून पडण्याच्या दृष्टीने योजना तयार करण्यांस ते जास्त उपयुक्त होईल.

**शिवाजी** : हं. आपणा सर्वांच्या बोलण्यात तथ्य आहे. अफझलखानाच्या कारवायांस आतां त्वरीत आळा घालणे आवश्यक आहे. मात्र काही शिपाई इतर कामगिरींवर असल्याने फौजफाटा तयार करण्यासाठी सैन्यदल प्रमुखांना वेळ आवश्यक आहे. खानांस कोण कोण मदत करताहेत किंवा करणाराहेत हे जाणून घेण्यासाठी हेरखात्यास थोडासा वेळ हवा आहे. या सर्व गोष्टी जमून आल्या की आपण कारवाई करु शकतो. बरोबर ना?

**सर्वजण** : होय महाराज!

**शिवाजी** : ठीक! आपण तूर्त असे करायचे, खानाच्या कारवाया कमी होण्यासाठी थोडीफार हालचाल करायची, त्याचवेळी त्याच्याशी बोलणी सुरु करुन त्याला गुंतवून ठेवायचे म्हणजे त्याच्या आक्रमक कारवायांना थोडासा पायबंद बसेल आणि शक्य तेवढ्या लौकर सैन्याची जमवाजमव करुन मग खानाला अद्दल घडवायची.

**सर्वजण** : होय महाराज!

**शिवाजी** : ठीक आहे. (निर्णायक स्वरात नेताजी पालकरांना उद्देशून) सेनापती, लष्कराची जमवा-जमव करण्याच्या मार्गास लागा. सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही कमतरता न ठेवता इतरत्र असलेल्या आपल्या सैन्यदलात थोडीफार कपात करुन आपण या मोहीमेसाठी सैन्याची जुळवाजुळव करा. कान्होजीराव, बाजी पासलकरांना सोबत घेऊन मुलूखातील वतनदार, देशमुख इत्यादींशी संपर्क साधून जास्तीतजास्त वतनदार आम्हाला सहकार्य करतील याची निश्चिती करा. या सर्व प्रदेशांत आपल्या शब्दाला फार वजन आहे. तेव्हां ही जबाबदारी आपण सहजतेने पार पाडाल याची आम्हांस खात्री आहे. बहिर्जी, फार मोठी फौज घेऊन अफझलखान आला असला तरी देखील खानांस साहाय्य करु इच्छिणारे काही वतनदारही असू शकतील. तेव्हां आपले सर्व हेरखाते कामास लावा आणि खानाच्या मागावर राहा. खानाच्या भेटीस कोण कोण येतात, कोणते खलिते कुठे रवाना होतात, खानाच्या पुढील हालचाली कोणत्या इत्यादी सर्व माहिती गोळा करत राहा आणि आम्हांला कळवत राहा. शिवाय त्याच्या सैन्यदलांत कुणी फितुरी करणारे निघणार असतील तर

त्यांच्याशी संधान बांधून राहा. शिवाय वेळोवेळी आम्ही आपणांस सूचना देऊ तसे वागा. कार्यनिपुण हेरखाते म्हणजेच राज्यकर्त्याचे डोळे व कान. आपल्या कुशल नेतृत्वाखाली आजवर हेरखात्याने आपलं कार्य अत्यंत सुयोग्य पद्धतीने हाताळले आहे आणि आजवरच्या आमच्या प्रत्येक मोहिमेचे यश हे प्रामुख्याने आपल्या या कुशल, धाडसी, प्रसंगी जीव धोक्यात घालणाऱ्या हेरखात्यामुळेच आहे. केवळ हेरखाते देत असलेल्या खबरींवरच बहुतेकवेळा जोखमीचे निर्णय घ्यावे लागतात, आणि त्यावरच सैन्याचे यश किंवा अपयश ठरत असते म्हणूनच यावेळीसुध्दां आम्हांस आपणाकडून अशाच प्रकारच्या कामगिरीची अपेक्षा आहे.

**बहिर्जी** : जशी आज्ञा महाराज. माझ्या हेरखात्यातील प्रत्येकजण मी पारखून घेतलेला आहे. आमच्या हेर खात्याच्या लौकिकास साजेशी कामगिरी आम्ही करु. आपण निर्धास्त राहावे.

**शिवाजी** : शाब्बास बहिर्जी. आम्हांस आपला अभिमान वाटतो. संभाजी कावजी, जीवा, रयतेवर खानाकडून होत असलेल्या अत्याचारांमुळे तुमच्या मनांत चीड निर्माण होणे साहजिकच आहे, परंतु काही निर्णय हे घाईघाईने नाही घेता येत; आणि युद्धाच्या बाबतीत तर नाहीच नाही. त्यामुळे आपल्याला अजून थोडा काळ वाट पहावी लागेल, त्यानंतरच कृती करता येईल. मात्र या वेळच्या खानाशी घ्यावयाच्या टक्करीत तुम्हाला फार मोठी जबाबदारी तोलायची आहे हे विसरु नका. आपण या वेळी आमच्यासोबत राहाणार आहात.

**कावजी** : ठीक आहे महाराज. आपण द्याल ती जबाबदारी आम्ही मोठ्या आनंदाने पार पाडू.

**जीवा महाला** : होय महाराज. काम कितीही जोखमीचे असले तरी आम्ही शिकस्त करु. त्यासाठी प्रसंगी स्वतःचे जीव धोक्यात घालावे लागले तरी आम्ही मागे हटणार नाही.

**शिवाजी** : शाब्बास. आपल्यासारखे शूर शिपाई आमच्यासोबत असताना आम्हाला कशाचीच भिती नाही. (किंचित थांबून ) आपण सर्वजण आता येऊ शकता. पंत, तुम्ही मात्र थांबा. (पंत सोडून इतर सर्वजण मुजरा करुन निघून जातात) पंत, त्वरीत एक पत्र पाठवून गोपिनाथपंत बोकील यांस बोलावून घ्या. आम्हांस त्यांच्याशी या विषयावर बोलायचे आहे.

**मोरोपंत** : महाराज, क्षमा असावी. खरेतर गोपिनाथपंत कांही कामानिमित्त कालच राजधानीत आले आहेत. आज सकाळीच गडावर येऊन आपणांस

भेटण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. मात्र अगोदरच बैठक ठरलेली असल्याने आम्ही त्यांना थोडावेळ थांबण्याची विनंती केली. त्यानुसार ते विश्रामगृहातच उतरले आहेत. बैठक संपताच हे आपणांस सांगावयाचे असे आमच्या मनांत होते आणि आतां आम्ही हे सांगणारच होतो. आपली आज्ञा असेल तर ते आतां देखील हजर होऊ शकतील.

**शिवाजी** : अरे वा! छान योगोयोग आहे म्हणायचा. मात्र मगाशींच ते आल्याचे कळते, तर त्यांनाही बैठकीत सामावून घेता आले असते.

**मोरोपंत** : महाराज, क्षमा असावी. आमच्या ते ध्यानांत नाही आले !

**शिवाजी** : ठीक आहे. त्यांना आंत पाठवून द्या. आम्ही वाट पहातो आहोत.

(पंत जातात, महाराज एकूण परिस्थितीचा मनातल्या मनात विचार करत येरझाऱ्या घालतात. नंतर गवाक्षांत जाऊन बाहेर दूरवर पहात असतात, एवढ्यात गोपिनाथपंत बोकील प्रवेश करतात)

**गोपिनाथपंत** : मुजरा महाराज.

**शिवाजी** : या, या गोपिनाथपंत. आम्ही आपलीच याद काढत होतो. आपण सकाळीच इथे आल्याचे आतांच पंतांनी सांगितले. कांही महत्त्वाचे काम होते का ?

**गोपिनाथपंत** : महत्त्वाचे असे काही नाही. कामानिमित्त राजधानीत आलो होतो, आपण गडावरच असल्याचे कळले म्हणून सहज भेट घ्यावीशी वाटली.

**शिवाजी** : छान! आपण सहज आलात हे खरे, पण आम्ही मात्र पंतांना पत्र लिहायला सांगून आपल्याला बोलावणे पाठवायचे ठरविले होते. पण तेच म्हणाले की आपण गडावर आला आहात.

**गोपिनाथपंत** : महाराज, कांही महत्त्वाचे काम आहे का ? आपण आज्ञा करावी.

**शिवाजी** : पंत, काम महत्वाचे आहे आणि जोखमीचेही. म्हणूनच आपल्या सारख्या मुरब्बी मुत्सद्दयाची याद केली आम्ही.

**गोपिनाथपंत** : महाराज, आपण आम्हाला याद करणे हा आम्ही आमचा गौरव समजतो. पण काम काय ते मात्र अजून कळले नाही.

**शिवाजी** : हो हो पंत. सांगतो आम्ही. (किंचित थांबून) विजापूरच्या सरदार अफझलखानाने आपल्या या स्वराज्यावर आक्रमण केल्याचे आपणांस ठाऊक असेलच ?

**गोपिनाथपंत** : होय महाराज. आम्ही ऐकून आहोत हे. पण यास तर आता खूप दिवस झाले आहेत. महिन्यावर काळ लोटला आहे. (विचारावं की नाही या संभ्रमात थोडं थांबून) महाराज, क्षमा असावी पण एक शंका आहे. राहवत

नाही म्हणून विचारावेसे वाटते....

**शिवाजी** : हां हां पंत. विचारा काय विचारायचे ते.

**गोपिनाथपंत** : महाराज, खानास येऊन एवढे दिवस झाले तरी आपण अजून शांत कसे याचंच आश्चर्य वाटते.

**शिवाजी** : हु, हु. (किंचित हसतात) आम्हांस ठाऊक होतेच की आपण हे विचारणार म्हणून. ...... मग आपणांस काय वाटते? आम्ही कशासाठी गप्प आहोत?

**गोपिनाथपंत** : महाराज, आम्हांस कसे कळायचे ते? राजांचे डावपेच आम्ही कसे जाणणार? आम्ही तर फक्त प्रशासनिक अधिकारी. हुकूमाप्रमाणे कर्तव्य करायचे एवढेच आम्हांस माहित. पण खानाचा स्वराज्यात प्रवेश होऊनही आपण शांत आहात त्यामागे काहीतरी खास कारण असणार एवढे मात्र नक्की. नाहीतर आपल्या प्रजेचा असा छळ होत असताना राजे निवांत रहाणे शक्यच नाही.

**शिवाजी** : (हळवे होत) गोपिनाथपंत, आमच्या प्रजेचे खानाने असे हाल-हाल मांडलेले असतांना पाहून आमचा जीव किती तीळ-तीळ तुटतो याची आपण कल्पनाही करु शकणार नाही. येणारा प्रत्येक दिवस हा फक्त आमच्या जीवाची घालमेल वाढविणाराच असतो. आमच्या मनाला किती यातना होतात ते आम्हालाच ठाऊक. पण हे सर्व आम्ही सोसतो तेही केवळ आमच्या प्रजेच्या काळजी पोटीच. (बोलता बोलता महाराजांचे डोळे पाणावतात. किंचित सावरुन) खानाला पायबंद घालावा असे आम्हालाही वाटते पण सध्या परिस्थिती प्रतिकूल आहे. म्हणूनच आम्ही योग्य संधीच्या शोधात आहोत; आणि तशी संधी निर्माण करण्यासाठीच तर आम्ही आपणांस बोलावले आहे.

**गोपिनाथपंत** : म्हणजे? महाराज, आपण काय म्हणता आहात ते आमच्या ध्यानीं नाही येत. आपले हे असले कोड्यातले बोलणे आमच्या डोक्यावरुन जाते. आपण स्पष्टपणे सांगण्याची कृपा करावी.

**शिवाजी** : (किंचित थट्टेच्या स्वरांत) पंत, आपण राजकारणात पारंगत म्हणून आम्ही आपल्या मुत्सद्देगिरीचा लाभ घेऊ इच्छितो तर आपण म्हणता आपणांसच काही उमगत नाही. कसे व्हायचे मग?

**गोपिनाथपंत** : तसे नव्हे महाराज. आम्ही कितीही हुशार असलो तरी आपल्या बुध्दीचा आवाका अफाट आहे, आम्हांस तो कधीही उलगडणार नाही. तेव्हां.........

| | | |
|---|---|---|
| **शिवाजी** | **:** | बस, बस पंत. पुरे आतां (किंचित हंसतात, थोडेसे थांबतात) ठीक आहे. आम्हीच सांगतो काय ते सविस्तर. पंत, अफझलखानाच्या संदर्भात आपणांस बरीचशी माहिती आहे, त्याचा पूर्वेतिहास ठाऊक आहे. सुमारे वीस वर्षांपूर्वी याच अफझलखानाने राजा कस्तुरीरंग याला भेटीसाठी बोलावून ठार मारले होते. आमच्या मोठ्या बंधुराजांसही यानेच कपटाने ठार केले होते. आता हाच खान आमच्या प्रजेच्या जीवावर उठलेला आहे. स्वराज्यात ठिकठिकाणी त्याने हैदोस मांडला आहे..., शेतांची, घरादारांची जाळपोळ सुरु आहे..... गाई, गुरांच्या कत्तली होताहेत..... बायकांवर अत्याचार होताहेत. काय सांगणार आणि किती सांगणार? या खानाचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. पण या क्षणाला तरी त्याला आम्ही आवर घालू शकत नाही हे सत्य आहे. अफझलखानासंगे बहुत कुमक आहे, हत्ती, उंट, तोफा आहेत. याचा अर्थ आम्ही कमी आहोत असे नव्हे, तर खान सध्या ज्या प्रांतात आहे तो सर्व भूभाग सपाट, मैदानी इलाख्याचा असल्यामुळे आमची गनिमी काव्याची रणनीती तेथे फ़ारशी कामाची नाही. अशा प्रदेशांत खानाशी मुकाबला करायचा झाला तर कित्येक सैनिकांच्या जीवाला आम्हाला मुकावे लागेल, अपरिमित हानी होईल. आदिलशहाचे सैन्य या अशा मैदानी भागात युद्ध करण्यात तरबेज आहे. शिवाय त्यांचे हत्ती, उंटाचे साहाय्य त्यांना तिथे खूप उपयोगाचे ठरेल आणि त्यामुळे आपली भयंकर हानी होईल. हे सर्व टाळायचे असेल तर आम्हांस तो आपल्या या सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यांत आलेला हवा आहे. तसा जर तो आपल्या या दुर्गम प्रदेशांत आला तर मग कमीत कमी नुकसानीत त्याच्या सैन्याचा आपण खात्मा करु शकतो. मग खानाला संपविणे कठीण नाही.(थोडावेळ थांबून) आमच्या शांत रहाण्यामागचे खरे कारण हे आहे. पण खानाच्या सैन्यावर आतांच हल्ला करण्याचा वेडेपणा करुन आम्ही आमच्या शेकडो सैनिकांना त्याच्या जबड्यात नाही देऊ शकत. प्रजेच्या होणाऱ्या हाल-अपेष्टांची माहिती असूनही, सर्व काही समजून, उमगून देखील आम्ही नाईलाजाने संधीची वाट पहात बसलो आहोत; पण पंत, आतां त्या संधीच्या निर्मितीसाठी तुमचे योगदान आम्हांला हवे आहे. |
| **गोपिनाथपंत** | **:** | महाराज, या बाबतीत आम्ही काय करु शकतो ते आम्हांस ठाऊक नाही. पण आपण द्याल ती जबाबदारी कोणतीही कसूर न ठेवतां आम्ही पूर्ण करु याची खात्री असावी. |

**शिवाजी** : पंत, आमचे वकिल या नात्याने आम्ही आपणांस अफझलखानाकडे पाठवू इच्छितो. आपल्या बुद्धीचे कौशल्य वापरुन त्या खानांस आमच्या या दुर्गम इलाख्यात खेचून आणावयाची कामगिरी आपणास करावयाची आहे.

**गोपिनाथपंत** : पण महाराज, हे कसे शक्य आहे? खान कसा येईल इथपर्यंत? नेमके काय करायचे म्हणजे खान येऊ शकेल?

**शिवाजी** : पंत, सांगतो आम्ही आमची रणनीति. आमचे वकिल म्हणून तहाची बोलणी करण्यासाठी आपण अफझलखानाकडे जायचे. प्रजेचे होणारे हाल आम्हांला पाहवत नाहीत म्हणून आम्ही त्याच्याशी तह करु इच्छितो असे सांगायचे. आम्ही खानांस घाबरत असल्याने तिकडे येऊ शकत नाही अशीही बतावणी करायची. मात्र तहाची बोलणी आम्ही त्याच्याशी प्रत्यक्ष भेटूनच करु इच्छितो असे सांगून त्यासाठी त्यास इथे येण्यास भाग पाडायचे. एकदां खान इकडे आला की मग ........!

**गोपिनाथपंत** : महाराज, माफी असावी. तहाचे बोलणे वगैरे ठीक आहे पण आपण घाबरता आहात असे आम्ही कसे सांगणार. आम्हांस तसे बोलवेल तरी कसे? आपला अपमान होईल असे शब्दोच्चार आम्ही नाही करु शकणार.

**शिवाजी** : पंत, आपण मनापासून ते थोडेच बोलणार आहात? हे बोलायचे ते केवळ डावपेचाचा एक भाग म्हणून. राजकारणात असे अधे-मध्ये खोटे बोलावेच लागते. पण एखाद्या चांगल्या इराद्याने आपण तसे ते बोलत असू तर ते क्षम्यच आहे. शिवाय आमच्या डावपेचाचा तोच तर खरा भाग आहे. अफझलखान हुशार आहे, पराक्रमी आहे. आजपर्यंत कधीही त्याने पराजय चाखलेला नाही पण फक्त त्यामुळेच तो अहंकारी झालेला आहे. या त्याच्या अहंकारावर फुंकर घालायचे काम आपणांस करावयाचे आहे. आम्ही त्यास घाबरतो हे कळल्यावर त्याचा अहंकार जागा होईल आणि तो इथे येण्यास तयार होईल. शिवाय या पूर्वी तो वाईचा सुभेदार होता. या भागाची त्याला पूर्ण माहिती आहे. त्यामुळे येथे येऊनही आपल्याला काही धोका असणार नाही, आपण सुरक्षितच राहू अशा समजुतीने तो येथे येण्याचे मान्य करु शकतो. केवळ आम्ही त्यास घाबरतो आहोत या एकाच कारणासाठी तो इथे येऊ शकतो; नाहीतर ते कदापी शक्य होणार नाही.

**गोपिनाथपंत** : ठीक आहे महाराज, आम्ही ही जबाबदारी स्वीकारतो. आमचे सर्व कौशल्य आम्ही त्यासाठी पणास लावू. ...पण महाराज, खानास

बोलवायचे कुठे ? या इथे, राजगडावर ?

**शिवाजी** : नाही पंत. राजगडावर नाही. प्रतापगडावर!

**गोपिनाथपंत** : काय ? प्रतापगडावर ?

**शिवाजी** : होय, प्रतापगडावर! जावळीच्या खोऱ्यांत!! आम्हांस या कामी उपयुक्त असाच तो दुर्गम भाग आहे. अवघ्याच दिवसांत आम्ही आमचा मुक्काम प्रतापगडावर हलविणार आहोत. तेथेच खानाची भेट घेणार आहोत आम्ही. .... अर्थात् सर्वकाही मनासारखे घडून आले तरच...!

**गोपिनाथपंत** : ठीक आहे. तसेच होईल. .... म्हणजे .. आम्ही पुरते प्रयत्न करु यासाठी.

**शिवाजी** : पंत, आम्ही ही फार मोठी जोखीम आपल्यावर देत आहोत. आपण ती निश्चित पार पाडाल यात आमच्या मनात तीळमात्र शंका नाही. प्रजेला खानाच्या तावडीतून सोडविण्यासाठी ही संधी निर्माण व्हायलाच हवी.

**गोपिनाथपंत** : महाराज, आपण निश्चिंत असावे. उद्यांच निघतो आम्ही कामगिरीवर.

**शिवाजी** : ठीक आहे. या आता तुम्ही. आई भवानी आपल्याला सुयश देवो. जय जगदंब!

**गोपिनाथपंत** : येतो आम्ही. (मुजरा करतात व बाहेर जातात. महाराज सज्जात जाऊन उभे रहातात, ते विचारात मग्न आहेत. .......... पडदा पडतो)

**अंक पहिला**

**प्रवेश सातवा समाप्त**

-❖❖❖-

# अंक पहिला
# (प्रवेश आठवा)

(राजगडावरील एक दालन)
(जिजाबाई महालात आराम करताहेत. एवढ्यात शिवाजी महाराज प्रवेश करतात. आऊसाहेबांना मुजरा करतात.)

**शिवाजी** : मुजरा आऊसाहेब!
**जिजाबाई** : कोण शिवबा? ये बैस इथे. काही विशेष काम होतं का?
**शिवाजी** : हो.
**जिजाबाई** : काय झालं? सर्व काही ठीक आहे ना?
**शिवाजी** : हो आऊसाहेब. सर्व काही ठीक आहे.
**जिजाबाई** : इथे राजगडावर सर्व काही ठीक आहे, पण तिकडे त्या तुळजापुरात मात्र परिस्थिती एकदम कठीण आहे. खानाने सर्वत्र उच्छाद मांडलेला आहे. लोकांचं जीणं हराम करुन टाकलं आहे. सर्वत्र लुटालूट चालू आहे. जाळपोळ सुरु आहे. काय करायचं ठरवलं आहे तुम्ही राजे? आम्हाला काही सांगाल का? आमच्याने आता हे ऐकवत नाही. एवढे दिवस होऊनही ....... (एवढ्यात बाहेरुन एक पहारेकरी प्रवेश करतो.)
**पहारेकरी** : मुजरा माँसाहेब! मुजरा महाराज!
**जिजाबाई** : काय आहे? कुणी आलं आहे का ?
**पहारेकरी** : महाराज, बाहेर मोरोपंतजी आले आहेत. त्यांच्या सोबत काही संन्यासी आले आहेत. आपली भेट मागताहेत. खूप महत्वाचं काम आहे म्हणतात.
**शिवाजी** : महत्वाचे काम? आणि संन्याशांचे? ..... ठीक आहे. दे त्यांना आत पाठवून.
**पहारेकरी** : जी महाराज. (बाहेर जातो. थोड्याच वेळात मोरोपंत आणि ४-५ संन्यासी प्रवेश करतात)
**मोरोपंत** : मुजरा महाराज! मुजरा माँसाहेब!
**साधु-संन्यासी** : (हाळी देतात) जय जय रघुवीर समर्थ!
**शिवाजी** : (संन्याशांपुढे लीन होत) नमस्कार!
**जिजाबाई** : (मंचकावरुन खाली उतरुन, लीन होत) नमस्कार. आज आपण सर्व इकडे कुठे?

**मोरोपंत** : महाराज, माँसाहेब, ही सर्व संन्यासी मंडळी आपल्या भेटीसाठी आली आहेत.

**जिजाबाई** : राजांकडे काही विशेष काम आहे का?

**एक संन्यासी** : विशेष काम? माई, आपल्या कानावर अजून काहीच खबर पोचलेली दिसत नाही.

**जिजाबाई / शिवाजी** : (एकाच वेळी) खबर? कसली खबर?

**दुसरा संन्यासी**: महाराज. खानाने मांडलेला उच्छाद आपण जाणतच असाल. सर्व प्रजा भयकंपीत झालेली आहे. आणि आता तर ......

**शिवाजी** : (त्यांचे बोलणे तोडत) ....आता तर काय?

**दुसरा संन्यासी**: महाराज, कुठल्या शब्दांनी सांगावे ते आता समजत नाही, पण सांगतो ... तुळजापूरच्या आई भवानीच्या मंदिराची खानाच्या सेनेने तोडफोड केली आहे. आणि..... आणि ....

**शिवाजी** : आणि काय .....?

**एक संन्यासी** : आणि त्या खानाने आपल्या कुलदेवतेच्या, आई भवानीच्या मूर्तीला पण भंग केले आहे.

**मोरोपंत** : (धक्का बसून) काय?

**शिवाजी** : (राजे क्रोधित होतात, त्यांच्या श्वासाचा वेग वाढतो. ते रागाने मुठी आवळतात, तलवारीच्या म्यानाला हात घालतात) काय? खानाची ही मजाल? (पण लगेच राजे स्वतःला सावरतात. श्वास नियंत्रित करतात. हळू हळू शांत होतात)

**संन्यासी** : होय महाराज. हे खरे आहे. गाई-गुरांच्या कत्तली तर कधीच सुरु झाल्या आहेत आणि आता तर खानाने आमच्या दैवतांनाही न सोडण्याचे ठरविले असावे. महाराज, आम्ही आता काय करावे? कोणापाशी जावे? आपल्या हिंदुधर्माची अशी ही परवड आता आम्हाला पाहवत नाही. राजे, आता काहीतरी करा. आपला हिंदुधर्म वाचवा. खानाला प्रतिकार करा.

**जिजाबाई** : (रागाने) काय ऐकत आहोत आम्ही हे. आमच्याच राज्यात आमच्या दैवतांची ही स्थिती असेल, तर मग प्रजाजनांचे काय होत असेल तिकडे कोण जाणे! राजे, आपण हे थोपवू शकत नाही का? यापेक्षां आणखीन काय काय झालेले आपणांस पहावयाचे आहे. आपल्याच्याने होत नसेल, तर आम्हांस सांगा. आम्ही स्वतः जाऊ खानाच्या समाचारास.

**शिवाजी** : (समजावणीच्या सुरात) आऊसाहेब. आऊसाहेब. आम्हांसही ही खबर

वेदनादायीच आहे. आमच्याही मनाला यामुळे खोलवर जखम झालेली आहे. आमच्याच राज्यात, आमच्याच प्रजेची होणारी ही हालत अंतःकरणाला विदीर्ण करुन टाकते आहे. आमच्याही मनात लगोलग जाऊन खानाच्या सेनेवर तुटून पडण्याचा विचार येतो, पण ..... पण याक्षणीं तरीं आम्ही तसे नाही करु शकत. आम्हांस जरा समजून तर घ्या.

**जिजाबाई** : (संतापून) समजून घ्या ? राजे आता काय आणि किती समजून घ्यायचे ? खानांस आमच्या राज्यात येऊन एक महिन्यावर काळ लोटला तरी आपण अजून गप्प कसे तेच आम्हांला कळेनासे झाले आहे.

**शिवाजी** : आऊसाहेब, जरा शांत व्हा ! आमच्याकडून होणाऱ्या दिरंगाईबद्दल आम्ही आपली क्षमा मागतो. आम्ही बोलू आपल्याशी या बाबत. पण अगोदर आपण या सर्वांची व्यवस्था करुया. (संन्याशांना वाकून नमस्कार करीत) क्षमा असावी महाराज. आम्ही खानाच्या सेनेशी मुकाबला करण्याचीच तयारी करतो आहोत. लवकरच आम्ही यांतून मार्ग काढू. तूर्तास आपण संयमीत असावे. आपण यावे आतां. (मोरोपंताना उद्देशून) पंत, या सर्वांच्या भोजनाची, विश्रामाची व्यवस्था करा.

**मोरोपंत** : जी महाराज.

**संन्यासी** : महाराज, आम्ही आपल्यावर विश्वासून राहतो. आपला हिंदुधर्म वाचवा आता. (जय जय रघुवीर समर्थ अशी हाळी देतात बाहेर जातात. त्यांच्या मागोमाग पंतही जातात)

**जिजाबाई** : (अजूनही संतापलेल्याच आहेत) राजे, काय चाललं आहे हे ? आपल्या राज्यात ही अशी अवस्था ? यापेक्षां यवन पत्करला असं जर उद्या लोकांना वाटू लागलं तर चूक कोणाची ? ज्यासाठी हा स्वराज्याचा खटाटोप आम्ही आपल्याला करण्यास सांगितला ती परिस्थिती जर बदलणारच नसेल तर मग राजे, काय उपयोग ती स्वराज्याची स्वप्ने पहाण्याचा ?

**शिवाजी** : आऊसाहेब, आपल्या भावना कळतात आम्हांला. या सध्याच्या एकंदर परिस्थितीमुळे आम्हीही शरमिंदे आहोत, पण आऊसाहेब, आपण जाणता आम्हांला. कोणताही प्रसंग गुदरला तर त्यांतून वाट काढण्याची ताकद आहे आमची. कसबही आहे. आम्ही लवकरच तोडगा काढू यावर.

**जिजाबाई** : हो, माहित आहे ते आम्हाला. आमचे राजे शूर आहेत, लढवय्ये आहेत. ... पण मग नेमकं याच वेळेला ते कसब, ती ताकद, ते शौर्य कुठे गायब झालं हे कळेल आम्हाला ?

**शिवाजी** : आऊसाहेब, मघाशी आम्ही याच विषयावर बोलण्यासाठी आपल्यापाशी

आलो होतो. आमच्या मनीचे विचार आपणांस सांगावे, आमची रणनिती सांगावी म्हणूनच वेळ काढून आलो होतो आम्ही. पण मधेच हे सर्व झाले ...

**जिजाबाई** : ठीक आहे. आता सांगा मग. ऐकतो आम्ही.

**शिवाजी** : आऊसाहेब, आम्ही प्रतापगडावर जायचा निर्णय घेतला आहे. लौकरच निघू आम्ही.

**जिजाबाई** : काय ? प्रतापगडावर ? आणि ते कशासाठी ?

**शिवाजी** : अफझलखानाला मात देण्यासाठी.

**जिजाबाई** : राजे, आपण काय बोलता आहात आम्हांस काहीच कळत नाही. जरा स्पष्ट सांगाल ? खान राहिला एकीकडे आणि आपण जाताय दुसरीकडे. आणि तरीही सांगताय खानाला मात देण्यासाठी चाललो आहोत म्हणून ? राजे, आतां आम्हाला वेगळीच शंका येऊ लागली आहे.

**शिवाजी** : ....शंका ? आणि ती कसली आऊसाहेब ?

**जिजाबाई** : राजे, आपण घाबरलात तर नाही ना अफझलखानाला ?

**शिवाजी** : (राजे संतापाने लाल होतात. पण केवळ आपल्या आवाजाने राजे आपला राग व्यक्त करतात) आऊसाहेब ! (पण लगेच भानावर येतात, स्वतःला संयमित करतात) क्षमा असावी आऊसाहेब. पण आम्हांला कोणी घाबरट म्हटले तर आम्हांस ते सहन नाही होत.

**जिजाबाई** : हो, ठाऊक आहे ते आम्हांला ; पण तरी देखील आम्ही तसे म्हटले कारण आपणच तो संशय निर्माण करत आहात.

**शिवाजी** : आऊसाहेब, आम्ही प्रतापगडावर जाण्याचा निर्णय घेतल्यामुळे आपणांस जर आम्ही घाबरट वाटत असू तर आमचा नाईलाज आहे. पण एक सांगतो, आम्ही हा निर्णय घेतला आहे तो केवळ खानाशी मुकाबला करण्यासाठीच्या राजकारणाचा एक डावपेच म्हणून.

**जिजाबाई** : राजकारणाचा डावपेच ? खान तिकडे पंढरपूरच्या वाटेवर असताना आपण प्रतापगडावर जाण्याचा निर्णय घेताहात. हा कसला डावपेच ?

**शिवाजी** : आऊसाहेब, राजकारण असंच असतं. त्यातले डावपेच असे सहजासहजी नाही कळून येत कोणाला.

**जिजाबाई** : हं ! म्हणजे आता आम्हाला पण आपणच शिकविणार हे सारे !

**शिवाजी** : आऊसाहेब ! आम्हांस तसे म्हणायचे नव्हते. आपल्याला वाईट वाटले असेल तर आम्ही क्षमा मागतो. पण मग आमच्या एका प्रश्नाचे उत्तर द्याल आपण ?

**जिजाबाई** : ...प्रश्न? कसला प्रश्न?

**शिवाजी** : आऊसाहेब, अफझलखानाशी मुकाबला करतांना, आमच्या सैनिकांची हानी जास्त व्हायला हवी, की खानाच्या?

**जिजाबाई** : अर्थातच खानाच्या. पण या प्रश्नामागचा रोख ध्यानी नाही आला आमच्या.

**शिवाजी** : (किंचित हसतात) आपली कमीत कमी हानी होऊन खानाच्या सैन्याची पुरती वाट लागावी असे मनसुबे आहेत आमचे. राजकारण आहे हे. आऊसाहेब, आम्ही सर्व काही हे करतो आहोत ते आपल्या प्रजेच्या, लोकांच्या हितासाठीच. अफझलखानाच्या तावडीतून लोकांना लवकरात लवकर सोडविण्यासाठीच आम्ही प्रतापगडावर जात आहोत. आमच्यावर विश्वास ठेवा.

**जिजाबाई** : राजे, तुमचे राजकारण तुमच्याकडे ठेवा. आम्हाला फक्त सर्व काय ते नीट, स्पष्टपणे सांगा.

**शिवाजी** : आऊसाहेब, सांगतो आम्ही सर्वकाही. ऐका, अफझलखान भरपूर सैन्य घेऊन आपल्यावर चालून येतो आहे. तो आता ज्या प्रदेशांतून येत आहे तो सर्व मैदानी भाग आहे. आमची लढण्याची पद्धत गनिमीकाव्याची, डोंगराळ भागांत युध्द खेळून शत्रूला नामोहरम करण्याची आहे. मैदानी इलाख्यात युद्ध करण्यात खानाचे सैन्य तरबेज आहे. अशा स्थितीत खानाच्या सध्या असलेल्या सपाट भागातील सैन्याशी आपण दोन हात करायचे ठरविले तर आपलीच हानी जास्त होईल आणि ते आपल्याला परवडणारे नाही. (महाराजांचे बोलणे ऐकतानांच ते पटत असल्याने जिजाबाईंची मुद्रा बदलत जाते.) त्यामुळे कसेही करुन खानाला आपल्या या दुर्गम भागात खेचून आणता आले तर आपल्याला त्याच्याशी टक्कर देणे सोपे होईल. खान सहजासहजी आपल्या या भागात येणार नाही म्हणून कसेही करुन त्याला उकसावून येथे यायला भाग पाडणे अत्यावश्यक आहे. त्यामुळेच आम्ही प्रतापगडावर जात आहोत. तो भाग अति दुर्गम असल्याने आपलीच सरशी होईल यावर आमचा विश्वास आहे.

**जिजाबाई** : राजे, आपले बोलणे पटते आम्हाला. मघाशी आम्ही उगाच आपल्याला रागे भरलो, आपल्याला घाबरट म्हणालो, पण त्याचे वाईट वाटून घेऊ नका. प्रजेवरच्या काळजीपोटीच आम्ही तसे बोललो.

**शिवाजी** : आऊसाहेब, आम्हाला जाणवले ते. म्हणूनच तर लगेच शांत झालो

आम्ही. आणि आऊसाहेब, आम्ही आपल्यावर फार काळ नाही रागावू शकत. आम्हाला जमतच नाही ते. आऊसाहेब, आम्ही प्रतापगडावरुन येथे येईस्तोवर इथला सर्व कारभार आपणच सांभाळावा. आणि.. आणि ...

**जिजाबाई** : ..... आणि काय शिवबा ?

**शिवाजी** : आऊसाहेब, खानाशी युद्ध होणे आता अटळ आहे. ते कसे होईल ते सांगणे अवघड आहे. मात्र या युद्धांत आम्हाला वीरगती प्राप्त झाली तर आपण बाळ शंभूराजांना गादीवर बसवून राज्यकारभार आपल्या हाती घ्यावा.

**जिजाबाई** : शिवबा, शिवबा तुला बोलावते तरी कसे रे असे ? (गहिवरतात, त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे रहातात. पदर डोळ्यांना लावतात)

**शिवाजी** : आऊसाहेब. युद्धावर जायची ही आमची पहिली खेप नव्हे. आणि युद्ध म्हटले की त्यात येऊ शकणारे मरण हे गृहीतच धरावे लागते. आणि आम्ही तर ती तयारी कधीचीच ठेवली आहे. तेव्हां........

**जिजाबाई** : शिवबा, पुरे! नाही ऐकवत हे आता. तसे बोलण्यापेक्षां तू जा आता इथून. येईल त्या प्रसंगास धैर्याने सामोरे जाऊ आम्ही.

**शिवाजी** : आऊसाहेब. आतां आम्ही पूर्ण निश्‍चिंत झालो आहोत. उद्यांच आम्ही प्रतापगडावर जायला निघणार आहोत. आम्हांला आशीर्वाद द्या. (राजे वाकून, गुडघ्यावर बसून नमस्कार करतात)

**जिजाबाई** : आमचे आशीर्वाद आहेत आपल्या पाठीशी. मात्र एक लक्षांत ठेवा, आपल्या प्रजेचे जीवन-मरण आता सर्वस्वी तुमच्या हातात आहे. तेव्हां आपल्या प्राणांची आहुती देण्याची वेळ आली तरी मागे हटू नका. देवी भवानी आपल्याला सुयश देवो!

**शिवाजी** : हो आऊसाहेब, प्रसंगी आम्ही आमचे प्राण देऊ पण मागे हटणार नाही. जय भवानी! (हळूहळू अंधार होतो. पडदा पडतो.)

## प्रवेश आठवा समाप्त

## ❊ अंक पहिला समाप्त ❊

-❖❖❖-

## ✻ अंक दुसरा ✻

### (प्रवेश पहिला)

(अफझलखानाची पंढरपूर येथील छावणी)
(अफझलखान हुक्का ओढतो आहे. सय्यदबंडा, फाजलखान, मुसाखान हे सरदार समोर उभे आहेत.)

**अफझलखान :** सय्यद, याकूतखान किधर गये हैं?

**सय्यदबंडा :** हुजूर, वो अभी तक तुळजापूर से लौटे नहीं। लेकिन आ जायेंगे।

**अफझलखान :** और, कृष्णाजी भास्कर? वो कहाँ है?

**सय्यदबंडा :** वो भी उनके साथ है।

**अफझलखान :** ठीक है. (थोडावेळ थांबून हुक्का ओढतो मग) मुसाखान बाहर का आलम कैसा है?

**मुसाखान :** हुजूर, आपके हुक्मनुसार सभी जगह हमारी फौजने दहशत फैला रक्खी है। घ़रदार उजाडे जा रहे हैं, पशुओंकी खुले आम कत्ल की जा रही है। खेतोंकी लूट की जा रही है.

**अफझलखान :** बहोत खूब! बहोत खूब!! अब आयेगा मजा। ऐसे ही तंग किया जाये सब काफरोंको हर जगहोंपर। सालोंको जितना हो सके परेशान करो। (इतक्यात एक मुसलमान पहारेकरी प्रवेश करतो, अफझलखानास कुर्निसात करतो)

**पहारेकरी :** हुजूर, बाहर याकूतखान और कृष्णाजी भास्कर आये हैं. अंदर आने की इजाजत चाहते हैं।

**अफझलखान :** इजाजत है। आने दो उन्हें। (पहारेकरी जातो. याकूतखान और कृष्णाजी प्रवेश करतात)

**याकूतखान :** मुजरा हुजूर। (कुर्निसात करतो)

**कृष्णाजी :** मुजरा हुजूर। (कुर्निसात करतो)

**अफझलखान :** आइये याकूतजी, आइये कृष्णाजी। क्या खबर लाये हो?

**याकूतखान** : हुजूर, तुळजापूर में हमारी फौज ने सब जगह आपके हुक्मनुसार तबाही मचा दी है। सब लोग भयभीत है। किसी को किसी का पता नहीं। हमने तो तुळजापूर के भवानी देवी का मंदिर भी तोड डाला है, और अंदर की मूरत उखाड कर बाहर फेंक दी है।

**अफझलखान** : वाह, वाह। बहोत खूब। शाब्बास!

**याकूतखान** : लेकीन हुजूर, जब हमने मंदिरों की तोडफोड शुरु की तो कृष्णाजी ने हमें रोकने की कोशीश की, मगर हमनें उनका कुछ सुना नहीं। हमने देवी की मूरत भी भंग कर दी। कृष्णाजी ने हमें क्यूँ रोका हमें मालूम नहीं।

**अफझलखान** : (संतापून) कृष्णाजी क्या ये सच है? आपने ऐसी गुस्ताखी क्यूँ की? क्या आपको मालूम नहीं की हम हर तरफ से काफरोंको तंग करने की कोशीश कर रहे हैं? आपने याकूतखान को मना करने की जूर्रत कैसे की?

**कृष्णाजी** : हुजूर, गुस्ताखी माफ हो। लेकिन मूर्तीयोंको भंग करना, मंदिरोंकी तोडफोड करना हमें अच्छा नहीं लगा इसलिये हमने उन्हें रोकने की कोशीश की थी।

**अफझलखान** : (पुन्हा संतापून) आप कौन होते है उनको रोकनेवाले? आपकी ये हिंमत?

**कृष्णाजी** : हुजूर माफी चाहता हूँ। मगर हम हिंदू है और हमारे देव देवताओंके मूर्तीयोंकी तोडफोड करना हमें अच्छा नहीं लगा।

**अफझलखान** : चूप, तुम्हें क्या अच्छा लगता है और क्या नहीं ये हम सुनना नहीं चाहते। मगर याद रखो, हम तुम्हारे नहीं; तुम हमारे नौकर हो। अपनी औकात में रहो. अगर काफरोंके खिलाफ कुछ भी बुरा किया जाये, कुछ भी, तो हमें मंजूर है। आइन्दा फिर कभी हमें या हमारे किसी भी आदमी को ऐसा करने से रोका तो वो हमें बिल्कुल मंजूर नहीं होगा।

**कृष्णाजी** : माफ कीजिये हुजूर। आगे ऐसा नहीं होगा।

**अफझलखान** : हाँ, ठीक है, ठीक है। (किंचित थांबून) मगर कृष्णाजी, आपके कहने पर हमने सब लोगोंको तंग करने में कुछ भी कमी नहीं बर्ती फिर भी अभी तक सिवाजी नहीं आया। लगता है आपका ये अंदाज गलत निकला।

**कृष्णाजी** : हाँ, मेरी भी समझ में कुछ नहीं आ रहा। मेरे अंदाज के मुताबिक शिवाजी महाराज को इधर आना ही था लेकिन ..... (एवढ्यात एक मुसलमान पहारेकरी प्रवेश करतो)

**पहारेकरी** : हुजूर, बाहर शत्रू की तरफ से कोई वकील आया है। आपकी मुलाकात चाहता है।

**अफझलखान** : (आश्चर्याने) क्या? वकील? ..... और वो भी सिवाजी की तरफ से?

**पहारेकरी** : जी हुजूर। उसका कहना है की वो सिवाजी की तरफ से आया है। और

आपकी मुलाकात चाहता है। (सर्वजण एकमेकांकडे प्रश्नार्थक पहातात.)

**अफझलखान :** कृष्णाजी ये क्या है? क्यूँ आया होगा वो? क्या पैगाम लाया होगा उसने? आपकी सलाह क्या है? अब हमें क्या करना होगा?

**कृष्णाजी :** हुजूर, सिवाजी की तरफ से वकील आया है। इसका मतलब मुझे लगता है, की महाराज ने उसे सुलह के लिये ही भेजा होगा। वैसे भी अबतक हमारे सैनिकोंने दुष्मनोंको बहोत तंग किया है। शायद अब उन्हें और सहा नहीं जाता। हमें उनकी बात सुन लेनी चाहिये।

**अफझलखान :** हाँ, ये बिलकुल ठीक कहा आपने। सिपाही, भेज दो उसे अंदर। (पहारेकरी बाहेर जातो. थोड्याच वेळांत गोपिनाथपंत मौल्यवान नजराणा घेऊन प्रवेश करतात)

**गोपिनाथपंत :** (वाकून) मुजरा हुजूर! हम शिवाजी महाराज की तरफ से उनका संदेश लेके आये हैं। महाराज ने आपके लिये ये नजराना पेश किया है। (नजराणा पेश करतात. खान नजराण्यावरची चादर बाजूला करतो व नजराणा पहातो. त्याचे डोळे चकाकतात.)

**अफझलखान :** हाँ, ठीक है। ठीक है। कहो कैसै आना हुआ? क्या पैमाना भेजा है उस पहाड के चूहे ने?

**गोपिनाथपंत :** क्षमा हुजूर। लेकिन आप अच्छे शब्दोंका प्रयोग करे तो अच्छा होगा।

**अफझलखान :** चूप, तेरी ये हिंमत? हमें सिखाने आये हो तुम? जो कुछ कहना है कहो, नहीं तो जाओ इधरसे। हमने नहीं बुलाया आपको, समझे? पागल कहीं का।

**गोपिनाथपंत :** क्षमा हुजूर। लगता है, आपको केवल संदेश देकर जानाही उचित है।

**अफझलखान :** हाँ, हाँ, जल्द से कहो। हमारे पास वक्त नहीं हैं।

**गोपिनाथपंत :** हुजूर, शिवाजी महाराज आपसे सुलह करना चाहते हैं। इसलिये वे आपको मिलना चाहते हैं।(सर्वांच्याच चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव उमटतात)

**अफझलखान :** (अविश्वसनीयपणे) क्या? हमें मिलना चाहता है सिवाजी? ये कैसा मुमकीन है?

**गोपिनाथपंत :** जी हुजूर, ये सच है। महाराज आपसे मिलना चाहते हैं। लेकिन वो चाहते है की आप खुद उन्हें मिलने आ जाये।

**अफझलखान :** क्या? हम खुद? उस सिवा को मिलने उधर आयें? समझता है कौन सिवाजी अपने आप को? हम नहीं आयेंगे। अगर मिलना है तो उसे यहाँ आकर मिलना पडेगा। समझे?

**गोपिनाथपंत :** हुजूर, महाराज इधर नहीं आ सकते।

**अफझलखान :** क्यूँ नहीं?

**गोपिनाथपंत :** क्यूँ की ...... !

**अफझलखान :** क्यूँ की क्या? आगे बोलो।

**गोपिनाथपंत :** क्यूँ की .......!

**अफझलखान :** आगे बोलोगे भी या....... (तलवारीला हात घालण्याचा आविर्भाव करतो)

**गोपिनाथपंत :** (घाबरल्याचे भासवत, घाईघाईने बोलतात) क्यूँ की महाराज आप को डरते हैं।

**अफझलखान :** क्या? क्या कहा तुमने? सिवाजी डरता है हमें? (सर्वजण गालातल्या गालांत हसतात)

**गोपिनाथपंत :** हाँ, महाराज डरते हैं आपको इधर आके मिलने से।

**अफझलखान :** सिवाजी डरता है हमें मिलने को? (हुरळून जात) सिवाजी डरता है .... हा..... हा..... हा.....! (मोठमोठ्याने हसतो, दाढीवरुन हात फिरवतो) सिवाजी हमें डरता है (पुन्हा हसतो) हा..... हा....... हा.....!!
(सर्वजण त्याच्या हसण्यात सहभागी होतात. अफझलखान स्वतःला सावरुन, संशयाने) वकीलजी, क्या ये सच है? सच में वो हमसे डरता है?

**गोपिनाथपंत :** जी हुजूर। आपके पराक्रम के चर्चे दूर दूर तक फैले है। महाराज ने भी वो सुने है। उनका कहना है, की आप इतने अर्जमन्द है, की आपके सामने वे कुछ भी नहीं।

**अफझलखान :** क्या सचमुच ऐसा कहा है सिवाजी ने?

**गोपिनाथपंत :** जी हुजूर।

**अफझलखान :** कहीं सिवाजी की ये कोई चाल तो नहीं?

**गोपिनाथपंत :** जी नहीं हुजूर, वो सचमुच आपसे डरते हैं। (सर्वजण पुन्हा गालातल्या गालांत हसतात.)

**अफझलखान :** अच्छा ठीक है। तो क्या कहा सिवाजी ने, फिर से बोलो...

**गोपिनाथपंत :** महाराज ने कहा है की वे आपसे सुलह करना चाहते हैं, और इसके लिये वे खुद आपसे मिलना चाहते हैं। उन्होंने आपको प्रतापगड आने का न्योता दिया है।

**अफझलखान :** प्रतापगड? .... याने वाई के पास? ..... लेकिन प्रतापगड क्यूँ? वो सिवाजी इधर क्यों नहीं आता?

**गोपिनाथपंत :** हुजूर, हमने तो आपको पहलेही बताया है की वे आपसे डरते हैं। वे यहाँ आकर नहीं मिल सकते।

| | | |
|---|---|---|
| **अफझलखान** | : | लेकिन हमें तो खबर थी की सिवाजी पूना के निकट राजगड पे हैं। तो वो प्रतापगड कब चला गया? (कृष्णाजी भास्करांना उद्देशून शंकास्पदपणे) कृष्णाजी, क्या हमारी खबर झूठ थी? आपने ही तो कहा था की सिवाजी राजगडपे हैं। और हमारे जासूसोंने भी बताया था की वो उधरही है। कहीं कोई गल्लत तो नहीं है ना? |
| **कृष्णाजी** | : | नहीं हुजूर। खबर एकदम पक्की थी। कुछ भी गल्लत नहीं थी ..... |
| **गोपिनाथपंत** | : | (कृष्णाजी भास्करांचे बोलणे तोडत) हुजूर बीच में बोलने की माफी चाहता हूँ मगर .... |
| **अफझलखान** | : | ... मगर क्या? |
| **गोपिनाथपंत** | : | हुजूर, हम ये कहना चाहते हैं की आपकी खबर ठीक थी। मगर अभी अभी महाराज राजगडसे प्रतापगड गये हैं। ....... आपके डर की वजह से। |
| **अफझलखान** | : | क्या कहा? हमारी डर की वजह से? (पुन्हां हुरळून जातो व आपल्या दाढीवरुन हात फिरवतो) अच्छा! याने की वो सचमुचही हमें डरता है। बहोत खूब, बहोत खूब। कृष्णाजी, आपका क्या विचार है? आपको क्या लगता है? अब हमें क्या करना चाहिये? |
| **कृष्णाजी** | : | हुजूर, हमें लगता है की इस बात पर थोडा और समय लेके हमें सोचना चाहिये। |
| **अफझलखान** | : | हाँ, आप ठीक कहते है। हमें सोचना चाहिये। |
| **कृष्णाजी** | : | (गोपिनाथपंतांना उद्देशून) आप विश्राम कक्ष में जाकर बैठिये। थोडी देर बाद हम आपको हमारा फैसला बतायेंगे। |
| **गोपिनाथपंत** | : | ठीक है। मुजरा हुजूर! (बाहेर जातात) |
| **अफझलखान** | : | कृष्णाजी, सिवाजी की इसमें कोई चाल तो नहीं होगी? |
| **कृष्णाजी** | : | हुजूर, मुझे लगता है की महाराज सचमुच डर गये हैं इसिलिये तो इनको भेजा है। अगर ऐसा नहीं होता, तो अपने लोगोंको बचाने के लिये वो खुद आते। |
| **अफझलखान** | : | आपने तो कहा था की मुल्क के लोगोंको तंग किये जाने पर वो खुद आयेगा। लेकिन वो तो घबरा गया। अब? |
| **कृष्णाजी** | : | हुजूर, मेरा अनुमान गलत निकला ये मैं कबूल करता हूँ। लेकिन जो बात अब हो गई है, वो भी तो हमारे फायदे की ही है। आखीर हमारा मकसद सिवाजी को पायबंद करना था। अगर अपने आप वे हमें सुलह के लिये बुलाते हैं तो इसमें जीत हमारी ही है। लढाई में होनेवाला खर्चा और हमारे सैनिकोंका नाश अगर टल सकता है, तो हमें ये सुलह जरुर करना चाहिये। |

**अफझलखान :** हाँ. ये भी तो ठीक है। हमें भी अब ऐसाही लगता है। वो हमें डर गया है इसिलिये तो वाई इलाकेमें, जंगलोंसे घिरे हुये प्रतापगड गया है। अगर डरा नहीं होता तो सामने आता। हूँ ..... डरपोक कहीं का। (किंचित थांबून) याकूत, सय्यद, मुसा आपका क्या कहना है इस बारे में ?

**सय्यदबंडा :** हुजूर, अगर सिवाजी हमें इतना घबरा गया है तो अच्छा है। आपका पराक्रम, आपकी ताकत सब जानते है। बडे बडे सरदार आपका केवल नाम सुनते ही डरते हैं। अगर सिवाजी डर गया है तो ये आपके लिये फक्र की बात है।

**याकूतखान :** जी हुजूर। हमें भी ऐसाही लगता है।

**मुसाखान :** हुजूर, अगर सिवाजी सुलह करना चाहता है तो इसका मतलब है की हमारी जीत ही हुई है। आजतक हमने जो कुछ किया उसका फल हमें मिल गया लगता है।

**फाझलखान :** हुजूर, हमें लगता है की सिवाजी आपको घबराया है तो बहोत अच्छा है। हमें उसके इस घबराने का लाभ उठाना चाहिये और सुलह में जितना हो सके उतना फायदा उठाना चाहिये।

**अफझलखान :** हाँ, ये बिल्कुल ठीक कहा आपने। याने के आप सब लोगोंका कहना है की हमें सुलह के लिये हाँ कहना चाहिये।

**कृष्णाजी :** जी। ..मगर हुजूर,आपका क्या विचार है ? आप भी ऐसा ही सोचते हैं ना ?

**अफझलखान :** हाँ। मगर कृष्णाजी, उसके वकिल को अब वापस भेज दो। हफ्ते दो हफ्ते बाद आप खुद वहाँ जाकर सुलह के बारेमें वासिक तरीके से कोई बातें तय करके आईये।

**कृष्णाजी :** जी हुजूर।

**अफझलखान :** तो फिर आप उस वकिल को कहिये की हम सुलह के लिये तैयार है। मगर इस बारेंमें बाकी बातें हम बाद में करेंगे। वो अब जा सकता है।

**कृष्णाजी :** जी हुजूर।

**अफझलखान :** अब आप सब जा सकते हैं। हमें अकेलें में कुछ सोचना है। (सर्वजण जी हुजूर म्हणून बाहेर जातात.अफझलखान पाठीमागे हात बांधून येरझाऱ्या घालत विचारचक्रांत गुंततो.....पडदा पडतो)

**✻ अंक दुसरा ✻**

**✻ प्रवेश पहिला समाप्त ✻**

-❖❖❖-

# अंक दुसरा
# (प्रवेश दुसरा)

(प्रतापगडावरील दरबार. शिवाजी महाराज उच्चासनावर बसले आहेत. शेजारी मोरोपंत, नेताजी पालकर उभे आहेत.)

**शिवाजी** : पंत, प्रतापगडीं येऊन आम्हांस आठवडा होत आला पण अजून अफझलखानांकडे गेलेल्या गोपिनाथपंतांची काही खबर आली नाही. काय झाले असेल तिकडे? खान तयार होईल भेटीला?

**मोरोपंत** : नक्की सांगता येत नाही. पण आपण गोपिनाथपंतांना पाठविले आहे. ते मुत्सद्दी आहेत, मुरब्बी आहेत. कसेही करुन पटवतील खानाला.

**शिवाजी** : हो. आम्हांसही तसाच भरवसा वाटतो. (नेताजी पालकरांना उद्देशून) नेताजी, आपली काय खबर? खानाने इकडे यायचे मान्य केले तर त्यावेळी आपले सैन्य तयार पाहिजे. झाली का तयारी?

**नेताजी** : जी महाराज. इतरत्र असलेल्या आपल्या सैन्यदलात शक्य तेथे कपात करुन सैन्याची जुळवाजुळव केलेली आहे. मात्र या सैनिकांना अत्यंत अल्प काळासाठी विश्रांती देण्यात आली असून लवकरच ते सर्व पुन्हा रुजू होतील. मात्र आणिबाणीचीच परिस्थिती आली तर लगेच हजर होण्याच्या सूचना त्यांना देण्यात आलेल्या आहेत.

**शिवाजी** : वा, नेताजीराव, वा. हे आपण ठीक केलंत.
(एवढ्यात एक पहारेकरी प्रवेश करतो.)

**शिवाजी** : मुजरा महाराज. (मुजरा करतो)

**शिवाजी** : काय खबर आहे.

**पहारेकरी** : महाराज, बाहेर कान्होजीराव जेधे आले आहेत. आपली भेट मागताहेत.

**शिवाजी** : ठीक आहे. त्यांना आंत पाठवून दे.
(पहारेकरी बाहेर जातो. कान्होजीराव जेधे प्रवेश करतात.)

**कान्होजी** : मुजरा महाराज (मुजरा करतात)

**शिवाजी** : या कान्होजीराव, या. सर्व काही ठीक आहे ना? काय म्हणतात आमचे वतनदार, देशमुख?

**कान्होजी** : महाराज, आम्ही मुलुखांतील देशमुख वतनदारांची भेट घेऊन खानाविरुद्ध लढण्यासाठी साहाय्य करण्याची मागणी केली. पुष्कळांनी विनंतीला मान देऊन होकार भरला आहे. गरज लागली की सूचना करा, सैन्यासह हजेरी लावू असे आश्वासनही दिले आहे.

**शिवाजी** : वा. हे फार छान केलेत आपण. आपल्या शब्दाला फार वजन आहे इलाख्यात. ही जबाबदारी आपण सहजतेने पार पाडाल याची आम्हांला पूर्ण खात्री होती.

**कान्होजी** : महाराज, आम्ही आमच्यापरीने खूप प्रयत्न केले, पण तरीही काही वतनदारांनी आम्हाला प्रतिसाद दिला नाही.

**शिवाजी** : अस्सं ? कोण कोण आहेत ते ?

**कान्होजी** : मसूरचे जगदाळे, उत्रोळीचे खोपडे आदी. अफझलखानाच्या सततच्या धमक्यांना घाबरुन त्यांनी खानाशी सख्य बांधले आहे. शिवाय भोरचे देशमुख खंडोजी खोपडे, ते तर कायमच आमच्या आणि आपल्या विरोधात कारस्थाने करीत असतात. त्यांनी तर खानासाठी पायघड्या घालायच्या तेवढ्याच शिल्लक ठेवल्या आहेत.

**शिवाजी** : हुं. या खंडोजी खोपड्यांचे प्रताप हल्ली खूपच वाढू लागले आहेत. खूपच मग्रूरीने वागताहेत ते. एकदां या खानाच्या उच्छादापासून मुक्ति मिळू दे मग पाहू आम्ही त्यांच्याकडे. पण कान्होजीराव, तुम्ही तर आपली जबाबदारी चोख बजावली आहे. आम्हांस आपला खूप आधार वाटतो.

**कान्होजी** : महाराज, आम्ही कायम आपल्या पाठीमागे राहू असा शब्द आम्ही थोरल्या महाराजांना दिला आहे. आमचा शब्द आम्ही कायम राखू. या शब्दांपायीच तर आमच्या वतनदारीवर पाणी सोडून दिले आहे आम्ही.

**शिवाजी** : होय कान्होजीराव, आम्हांस जाणीव आहे त्याची. खंडोजी खोपड्यां-सारखे नतद्रष्ट वारंवार त्रास देत असतानाही केवळ आपल्यासारखी त्यागी माणसं आहेत म्हणूनच हा स्वराज्याचा प्रपंच मांडताना खूप आधार वाटतो, बळ येतं आम्हांला. (मोरोपंतांना उद्देशून) पंत, आमचा कयास खरा ठरला तर अफझलखान येथे येणार हे नक्की. तसे झाले तर आपणांस गडावरील लहान सहान गोष्टींकडे लक्ष द्यायला मग वेळ मिळणार नाही. तेव्हां गडावरच्या कारभाराची जातीने दखल घ्या. काही रसद वगैरे हवी असेल तर मागवून घ्या. गडाच्या सुरक्षेच्या दृष्टीने कांही खबरदारी घेणे आवश्यक असल्यास त्वरीत कामे हाती घ्या. खानांस आमंत्रण देऊन आम्ही बोलावतो आहोत ..... तेव्हां सुरक्षेच्या बाबतीत गडाची चोख व्यवस्था असू द्या.

**मोरोपंत** : जी महाराज. सर्व कारभारावर आम्ही जातीने लक्ष ठेवून आहोत. काही लागलेच तर सांगू आपणांस.

**शिवाजी** : ठीक आहे. (एवढ्यांत गोपिनाथपंत प्रवेश करतात)

**गोपिनाथपंत** : (मुजरा करतात) मुजरा महाराज.

**शिवाजी** : (उत्सुकतेने) कोण, गोपिनाथपंत? या, या. आम्ही आपलीच वाट पहात होतो. बोला, काय खबर आहे?

**गोपिनाथपंत** : महाराज, आम्ही भेट घेऊन आलो खानाची.

**शिवाजी** : वा, छान! काय म्हणतो आहे खान?

**गोपिनाथपंत** : महाराज, आपण दिलेली जबाबदारी आम्ही पुरेपूर निभावली आहे. ....

**शिवाजी** : (उमेदीने) म्हणजे? अफझलखान तयार झाला आमच्या भेटीस?

**गोपिनाथपंत** : होय महाराज. आपली अटकळ खरी ठरली. खान आपल्या भेटीस यावयास तयार आहे.

**शिवाजी** : वा, फारच उत्तम. खरे तर खान असा सहजासहजी तयार होणाऱ्यातला नाही. खूप संशयी आहे तो. तरी देखील आपण त्याला भेटीसाठी तयार केलेत म्हणजे मुत्सद्देगिरीची कमालच म्हणावी लागेल.

**गोपिनाथपंत** : महाराज यात कमाल कसली? खरं तर तिथे जाऊन नक्की काय करायचे ते आपणच सांगितले होते, त्यामुळे सर्व श्रेय आपल्यालाच आहे. मी फक्त आपल्या सांगण्यानुसार कृती केली एवढेच.

**शिवाजी** : नाही पंत. आपण म्हणताहात ते केवळ विनयाने, हे जाणतो आम्ही. पण कितीही सांगितले, आम्ही कितीही सूचना केल्या तरी खानाला पटविणे हे सोपे काम नाही. मुळांतच खान फार संशयी आहे, आणि अशा माणसाला कोणतीही गोष्ट समजावण्याचा प्रयत्न करणे देखील फार जिकिरीचे असते; त्यामुळे खानाला इथे येण्यासाठी भाग पाडून तुम्ही तुमच्या मुत्सद्दीपणाची कमालच केली आहे. खरे श्रेय तुमचेच आहे यात अजिबात दुमत नाही.

**गोपिनाथपंत** : (स्तुतिमुळे ओशाळल्या स्वरांत) महाराज . . . .!

**शिवाजी** : ठीक ठीक. पण गोपिनाथपंत, आपल्याला काही त्रास तर नाही ना झाला प्रवासांत?

**गोपिनाथपंत** : छे छे महाराज. आमचा जाता येता प्रवास अगदी व्यवस्थित झाला. खानालाही आम्ही व्यवस्थित पटविले. मात्र एका गोष्टीसाठी आम्ही आपली माफी मागतो. . .

**शिवाजी** : ..... माफी? आणि ती कशाबद्दल?

**गोपिनाथपंत** : महाराज, आम्ही खानांस येथे येण्यासाठी प्रवृत्त केले हे खरेच, पण त्यासाठी आम्हांला आमच्याही मनाविरुद्ध खोटे बोलावे लागले. आपणासंबंधी ज्या गोष्टीचा आम्ही विचारही करु शकत नाही असे आम्ही बोललो त्या बद्दल क्षमा मागतो महाराज.

**शिवाजी** : असे काय बोललात आपण?

**गोपिनाथपंत** : महाराज, खानांस पटविण्यासाठी आपण खानाला घाबरल्याचे आम्हांस त्यास खोटेच सांगावे लागले म्हणून वाईट वाटते. खरेतर असे बोलतांना आम्हांस अतिशय यातना होत होत्या. पण काय करणार,आणखी इलाजच नव्हता. खानाला घाबरुन आपण इथे प्रतापगडावर आला आहात असे आम्हांस सांगावे लागले म्हणून माफी असावी महाराज. (सर्वजण एकमेकांकडे प्रश्नार्थकपणे पहातात. कान्होजीराव आणि नेताजी पालकर यांचा हात नकळत आपल्या तलवारींवर जातो)

**शिवाजी** : एवढेच ना? मग त्यात काय एवढे? (सर्वजण पुन्हा गोंधळून एकमेकांकडे पहातात. महाराज एवढे शांत कसे असा त्यांचा आविर्भाव आहे) आम्हीच तर सांगितले होते ना तुम्हांस तसे सांगावयास? मग त्यासाठी माफी काय मागता? (सर्वांच्याच चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव उमटतात. राजे काय बोलताहेत कुणालाच काही कळत नाही)

**गोपिनाथपंत** : महाराज, तसे नाही. आपण सांगणे वेगळे, आणि आम्ही आमच्या मुखाने ते बोलणे वेगळे. आमचे महाराज एवढे पराक्रमी असतांना त्यांच्याबद्दल आम्ही असे बोलणे ठी क नव्हे. म्हणून माफी मागतो महाराज.

**शिवाजी** : पंत, एवढे नका मनाला लावून घेऊ. आपल्या मनात आमच्याबद्दल खूप आदर आहे हे माहित आहे आम्हांला. आपण मनापासून ते बोलला नाहीत तर केवळ एक वकिली डावपेच म्हणून तुम्ही तसे बोललात यांत गैर काहीच नाही. वकिली डावपेच वेगळे आणि भावना वेगळ्या. अंतिमतः आपला उद्देश सफल झाला हे महत्त्वाचे.

**नेताजी** : महाराज, मध्येच बोलतो; माफी असावी. पण नेमके काय चालले आहे तेच आम्हांस समजत नाही. गोपीनाथ पंत आपणांस उद्देशून भ्याड म्हणाले आणि तेही खानासमोर?

**कान्होजी** : महाराज, आम्हांस कळेल असे काय ते सांगा.

**शिवाजी** : हो, हो. सांगतो. जरा धीर तर धरा. नेताजी, कान्होजी, मोरोपंत आम्ही आतां काय सांगतो ते नीट ऐका. गोपिनाथपंतांना आम्ही वकिलीसाठी अफझलखानाकडे पाठविले होते. आम्ही खानांस घाबरुन प्रतापगडावर आलो आहोत असे त्याला खोटेच सांगायचे. अफझलखानाशी तह करण्याचा प्रस्ताव मांडायचा. मात्र तहाची बोलणी करण्यासाठी खुद्द खानाने आमच्या भेटीस यावयाची अट घालावयाची असे ठरले होते. आम्ही घाबरल्याचे खानांस सांगावे लागल्याने गोपिनाथपंत माफी मागत होते. मात्र आमच्या सांगण्यानुसारच हे घडल्याने माफीचा प्रश्नच नाही.

| | | |
|---|---|---|
| **नेताजी** | : | (किंचित रागाने) महाराज, स्पष्टच विचारतो; माफी असावी. आपले सैन्यदळ खानाला पाणी पाजण्यास पुरेसे आहे. असे असताना मग अफझलखानाशी तह करण्याची गरजच काय? आपला आमच्यावरचा विश्वास ढळला की खानाच्या सैन्यावरचा विश्वास वाढला? |
| **शिवाजी** | : | नेताजी आपल्या प्रश्नाचा रोख रास्त आहे. मात्र आपणांस वाटणाऱ्या दोन्ही शंका निरर्थक आहेत. |
| **नेताजी** | : | म्हणजे? आम्ही समजलो नाही. |
| **शिवाजी** | : | नेताजी, आमचा आपल्यावरचा विश्वास ढळला नाही किंवा खानाच्या सैन्याबद्दलचा विश्वासही वाढला नाही. पण तरीही आम्ही खानाशी तहाचा प्रस्ताव मांडला तो केवळ बुद्धिबळातील एक डाव म्हणून! |
| **नेताजी** | : | बुद्धिबळातील डाव? ... म्हणजे? ... महाराज, आम्हांस समजेल असे काय ते सांगा. आम्ही साधी माणसं, आपण काय बोलता ते आम्हांस समजत नाही. |
| **शिवाजी** | : | नेताजी, कान्होजी, अफझलखानाला मात द्यायची असेल तर ती केवळ सैन्यदलाच्या योगे शक्य नाही. तेथे बुद्धिबळाचा वापरही करावाच लागेल. खानाचे सैन्य प्रचंड आहे हे नाकबूल करण्यात काहीच अर्थ नाही. आणि त्याचे सैन्य सपाट प्रदेशात आपल्याला भारी पडेल याकडे दुर्लक्षही करता येणार नाही. आणि म्हणूनच केवळ रणनीतीचा एक भाग म्हणून अफझलखानांस आम्ही कोणत्याही मार्गाने या इथे, या घनदाट जंगलमय भागांत खेचून आणू इच्छितो. एकदां का तो इकडे आला की मग आपण सर्व आहोतच खानाचा समाचार घ्यायला. नाही का ? |
| **नेताजी** | : | हो, हे खरे आहे; पण मग आपण घाबरत असल्याचे त्यास कां सांगायचे? |
| **शिवाजी** | : | नेताजी, आणखी कोणत्या मसलतीने खान येथे येण्यास कबूल झाला असता असे आपणांस वाटते? अफझलखान भयंकर खतरनाक आहे, संशयी आहे, क्रूर आहे; पण त्याचबरोबर त्याच्या ताकदीची स्तुती केल्यास तो फुशारून जाणारा आहे. त्याच्या नेमक्या याच अवगुणाचा लाभ उठवून त्याची जिरवायची असे आमचे मनसुबे आहेत. म्हणूनच आम्ही घाबरल्याचे भासवून, त्याला हुरळून जाण्यास भाग पाडून, इथे येण्यास भाग पाडणार आहोत; किंबहुना भाग पाडले आहे. अफझलखानाने आमचा हा प्रस्ताव आतां स्वीकारला आहे. त्यामुळे आमची बाजू आता भक्कम होणार आहे. (सर्वांना ही गोष्ट पटते व ते माना डोलावतात) |
| **मोरोपंत** | : | महाराज, आपल्या आडाख्याप्रमाणे खान आपणास भेटण्यास तयार |

झाला आहे. मग यापुढे नेमके काय करायचे आम्ही?

**शिवाजी** : हो. सांगतो आम्ही. यापुढे सर्वांनी आमच्या आदेशाप्रमाणे फक्त कृती करत जायची. कोणतेही प्रश्न न विचारतां फक्त आदेशाची अंमल बजावणी करायची. योग्यवेळी त्या कृतींमागचा हेतू आम्ही आपणासर्वांस सांगू.

**सर्वजण** : जी महाराज.

**शिवाजी** : (निर्णायक स्वरांत) मोरोपंत, थेट वाईपासून या प्रतापगडाच्या आसपासच्या भागांतील वाडा, पार इत्यादी गांवांपर्यंत नवे रस्ते करण्याची, रस्त्यांच्या बाजूला चर खोदण्याची कामे त्वरेने हाती घ्या. त्यासाठी नवीन माणसांची नेमणूक करा. नेताजी, सैन्यात थोड्या नव्या तरुणांची भरती हाती घ्या. या तरुणांना तलवारबाजी यायला हवीच; पण त्याहीपेक्षां, मोठमोठी झाडे कापण्याचा अनुभव असेल तर फारच उत्तम. (सर्वजण एकमेकांकडे काहींच अर्थबोध न होऊन बघतात. पण महाराज त्याची दखल घेत नाहीत. त्यांचे बोलणे सुरुच आहे.) कान्होजी, आमच्या मित्र पक्षांत वाढ होण्याच्या दृष्टीने आवश्यक ते प्रयत्न सुरुच ठेवा. थोडेसे वाढणारे बळ देखील आयत्यावेळी निर्णायक ठरु शकते. तसेच, यापूर्वी ज्यांचे साहाय्य मिळविले आहे त्यांच्या सतत संपर्कात रहा. संभाजी कोंढाळकर, सिध्दि इब्राहिम, काताजी इंगळे, कोंडाजी कंक, येसाजी कंक, कृष्णाजी गायकवाड, सूरजी काटके, संभाजी करवार, सिलीमकर, बांदल या सर्वांची भेट घेऊन त्यांना तयारीत रहाण्यास सांगा. (किंचित थांबतात... मग) आता दिलेल्या सूचनांचे व यापुढे देण्यात येणाऱ्या सूचनांचे तंतोतंत पालन करा. समजले?

**सर्वजण** : जी महाराज!

**शिवाजी** : आपण सर्व आतां जाऊ शकता. मात्र गोपिनाथपंत, तुम्ही थांबा जरा. आम्हांस तुमच्याशी काही बोलायचे आहे.

**गोपिनाथपंत** : जी महाराज. (गोपिनाथपंत सोडून इतर सर्वजण मुजरा करतात व निघून जातात. शिवाजी महाराज व गोपिनाथपंत बोलत बसतात. पडदा पडतो)

**अंक दुसरा**

**प्रवेश दुसरा समाप्त**

-❖❖❖-

# अंक दुसरा
## (प्रवेश तिसरा)

(प्रतापगडावरील दरबार.)
(शिवाजी महाराज व बहिर्जी बोलत बोलत प्रवेश करतात.)

**शिवाजी** : ..... म्हणजे बहिर्जी, तुमच्या म्हणण्यानुसार आमचे मेहुणे बजाजी निंबाळकर अफझलखानाला जाऊन मिळाले?

**बहिर्जी** : होय महाराज. अफझलखानाने आपल्या माळवदेच्या मुक्कामात त्यांच्यावर खूपच दबाव आणला. आपणांस सामील न झाल्यास ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे बजाजी निंबाळकर त्यांना सामील झाले. इतकेच नव्हे तर त्यांना धर्म बदलायला भाग पाडल्याने त्यांनी आतां मुसलमानी धर्मही स्वीकारला आहे.

**शिवाजी** : अरे! अरे!! काय ऐकतो आहोत आम्ही हे! खुद्द आमचे मेहुणे खानाला सामील झाले, आणि धर्म ही बदलला? हर! हर! (महाराज, थोडावेळ चिंतामग्न अवस्थेत भ्रूमध्याला चिमटीत धरतात. काही वेळाने) बहिर्जी, आमचे स्वकीयच जर आम्हांला सोडून असे शत्रूला जाऊन मिळायला लागले तर हे राज्य कसे आकार घेणार काहीं कळत नाही. कधी कधी वाटतं सोडून द्यावा हा स्वराज्याचा अट्टाहास! नकोच ते सारे!! पण क्षणभरच. .....फक्त क्षणभरच असं वाटतं अन् मग डोळ्यांसमोर उभी रहाते आपली ही यवनांच्या टाचेखाली भरडून निघालेली आपली रयत; ना कोणाचा आधार, ना कधी न्याय मिळण्याची उमेद शिल्लक. त्यांची उपासमार, त्यांची फरपट पाहवत नाही. आया-बहिणांच्या देहाची चाललेली विटंबना पाहून अंगार, अंगार होतो आमचा. अंतर्यामी पेटून उठतो आम्ही... आणि ...... आणि.. पुन्हा एकदां स्वराज्य स्थापण्याची स्वप्ने पाहू लागतो. ..... सर्वसामान्यांना दिलासा देणारं, त्यांना आधार देणारं, त्यांच्या स्वप्नांना फुलू देणारं, आया बहिणींना मानानं जगण्याची ग्वाही देणारं स्वराज्य! ..... पण हे स्वराज्य साकारायला आमची माणसं नकोत? आमच्यासारखीच स्वराज्याची आस लागलेली वेडी माणसे नकोत? ....... पण, इथे तर प्रत्येकाला स्वतःच्या स्वार्थाशीच देणं घेणं ! .....बाकी लोक असले काय, नसले काय! ....(हताशपणे सुस्कारा सोडतात. थोडावेळ थांबतात, स्वतःला सावरतात आणि निग्रहाने)

......बहिर्जी, जाऊ द्या गेले तर बजाजी. आम्हांस त्यांची तमा नाही. ज्यांना जायचे असेल त्यांना खुशाल जाऊ दे. आम्ही आमच्या हिंमतीवर हे स्वराज्य मिळवायला समर्थ आहोत. मात्र आम्हांला उमेद आहे ती तुमच्यासारख्या  एकनिष्ठ सोबत्यांची. आम्ही स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली ती आपल्यासारख्या प्रामाणिक सोबत्यांच्या भरवंशावर. त्यावेळीही आम्ही स्वकियांकडून अपेक्षा धरली नव्हती आणि आजही धरलेली नाही. .......बहिर्जी, तुम्ही तर साथ सोडणार नाही ना आमची ?

**बहिर्जी** : नाही महाराज. आपण घेत असलेले कष्ट पहातो आहोत आम्ही. आज ना उद्यां आपले हे स्वराज्याचे स्वप्न साकार होईल याची खात्री आहे आम्हांला. जीव गेला तरी बेहत्तर पण आम्ही आपली साथ सोडणार नाही.

**शिवाजी** : शाब्बास बहिर्जी. आपल्या सारख्यांचे हे बोल ऐकले की मग पुन्हा आम्हांला नवी उमेद येते आणि आमची आशा नव्याने पल्लवित होते.

**बहिर्जी** : महाराज माफी असावी, पण आपण ज्या कारणासाठी आम्हाला बोलावून घेतलंत ते अजून कळलं नाही.

**शिवाजी** : होय बहिर्जी. राहीलंच ते. आम्ही आपणांस कांही विशिष्ट उद्देशाने बोलावले होते. आम्ही नेताजींना सैन्यात तरुणांची थोडी नवी भरती घेण्याचा आदेश दिलेला आहे. आपल्या हेरखात्यांतली काही माणसे या भरतीत सहभागी होतील याची तरतूद करा. शिवाय या प्रतापगडाच्या आजूबाजूच्या परिसरांत नव्या रस्त्यांची कामे हाती घेण्यास आम्ही मोरोपंतांना सांगितले आहे. त्यासाठीही नव्या लोकांना कामावर घेण्याचे आम्ही त्यांना सुचविले आहे. या लोकांत देखील तुमची काही माणसे सहभागी होतील याची खात्री करुन घ्या. तूर्तास फक्त आम्ही सांगतो आहोत तसे करा. या संबंधाने आवश्यक असणाऱ्या इतर सूचना आम्ही मागाहून आपणांस देऊ.

**बहिर्जी** : ठीक आहे. जशी आज्ञा महाराज.

**शिवाजी** : बहिर्जी, खानाच्या संबंधाने काही विशेष माहिती हाती आली आहे का ?

**बहिर्जी** : जी महाराज. अफझलखानाच्या फौजेत मुसाखान, फाझलखान, याकूतखान, अंबरखान, रुस्तम खान, सिद्धि हिलाल या सारख्या मातब्बर सरदारांचा समावेश आहे. यांशिवाय मानोजी जगदाळे, सरदार पांढरे, पिलाजी मोहिते यांचीही त्याला साथ आहे. कोकण प्रांतातून सिद्धि जौहर त्याला साथ देतो आहे. ....'विजापूरच्या आदिलशहाच्या आज्ञेने आम्ही इकडे आलो आहोत तेव्हां मुकाट्याने शरण या, नाहीतर सर्वनाशास तयार

रहा' ... असा फतवाच खानाने जारी केला आहे. आणि त्याच्या दहशतीला घाबरुन स्थानिक देशमुख, वतनदार त्याच्या पायावर घालून घेत आहेत. खानाची आपल्या सैन्यासह आगेकूच सुरुच आहे. तुळजापूर, पंढरपूर येथिल देवस्थानांची मोडतोड करुन तो पुढे सरकला आहे. जेजुरी, शिखर शिंगणापूर येथिल देवस्थानांवरही त्याने हल्ले करुन तेथेही फार मोठी तोडफोड केलेली आहे. सर्व लोकांत त्याने दहशत माजवली आहे. लोक भयभीत झालेले आहेत. पुण्याच्या दिशेने जाण्याचा खानाचा विचार जाणवतो आहे.

**शिवाजी** : अरेरे! काय ही परिस्थिती? खानाच्या दहशतीला घाबरुन त्याला जाऊन मिळण्यापेक्षां, एकत्रित होऊन खानाचा मुकाबला करण्याची हिंमत का नाही दाखवत हे? किमानपक्षीं आम्हांला साथ देऊन खानाचा बिमोड करण्याला मदत तरी करायची? पण नाही, खानाला शरण जातील आणि आपला जीव शाबूत ठेवण्यासाठी धडपडतील. ....स्वराज्याच्या निर्मितीसाठी स्वकियांशीच लढावं लागणं या सारखं दुःख नाही, पण काय करणार? ... नाईलाज होतो आमचा. बहिर्जी, आमच्या श्रद्धास्थानांची नासधूस करुन खान लोकांना आणि आम्हाला पण भडकवतो आहे. केवळ नाईलाजाने आम्ही हे सोसतो आहोत, पण बहिर्जी, या खानाला जबरदस्त अद्दल घडविली नाही तर आम्हांस चैन लाभणार नाही. (बोलता बोलतां राजांच्या मुठी क्रोधाने आवळल्या जातात.) आमच्या देव देवतांच्या केलेल्या विटंबना करणाऱ्या या खानाला आम्ही पुरता धडा शिकवू. एकदां, फक्त एकदां त्याला इकडे येऊ द्या मग पाहूच आम्ही....!

**बहिर्जी** : महाराज, आपला होरा खरा ठरला तरच हे होणार आहे.

**शिवाजी** : हो. आमचा होरा खराच ठरणार. खान येणारच इकडे आणि मग ........ आणि मग ...!! (...कल्पनेत रमतात)

**बहिर्जी** : ... आणि मग काय राजे?

**शिवाजी** : हं. (किंचित हंसतात) कळेलच मग! तूर्तास आपण दिलेल्या सूचनेनुसार योजना आखा. शिवाय खानाच्या प्रत्येक हालचालींवर नजर ठेवा. काही संशयास्पद किंवा वेगळे वाटल्यास आम्हांस सूचीत करा. या आता तुम्ही.

**बहिर्जी** : जी महाराज. जशी आज्ञा. (मुजरा करतो आणि निघून जातो. महाराज विचारमग्नतेने येरझाऱ्या घालतात. थोड्या वेळाने मंचकावर बसतात. हळूहळू थोडे अस्वस्थ वाटतात. एवढ्यात मोरोपंत प्रवेश करतात पण महाराज विचारांतच मग्न आहेत.)

**मोरोपंत** : (आपल्या येण्याची चाहूल महाराजांना न लागल्याने मोठ्या आवाजात) महाराज, मुजरा करतो! (मुजरा करतात)

**शिवाजी** : (भानावर येत) अरे, पंत आपण? या, या.

**मोरोपंत** : महाराज, क्षमा असावी. आम्ही आपणांस व्यत्यय तर केला नाही ना?

**शिवाजी** : छे, छे. तसं काही नाही.

**मोरोपंत** : महाराज, आपण खूप चिंतेत दिसता. काही विशेष घडले आहे का?

**शिवाजी** : हं. पंत. आम्हांस थोडी अस्वस्थता वाटते आहे. थोडी अशुभाची चाहूल जाणवते आहे.

**मोरोपंत** : महाराज, असं कां म्हणता आपण? आतांच बहिर्जी येऊन गेले. त्यांच्याकडून काही विपरीत समजले आहे का?

**शिवाजी** : नाही पंत, तसे काहीच नाही, मात्र आमच्या मनासच काही वेगळी चाहूल लागते आहे आज.

**मोरोपंत** : महाराज. राग नसावा. पण आपण स्पष्टपणे काही बोललात तर आपल्यालाही थोडं मोकळं वाटेल.

**शिवाजी** : पंत, आपण जाणती माणसं. काय लपवणार आपल्यापासून? (किंचित थांबून) .. पंत, राणीसाहेबांची याद येते. त्यांची प्रकृती तर ठीक असेल ना? आम्हांस काही भलतंच जाणवतं आहे. उगाच नको नको ते विचार मनांत येताहेत. आम्ही राजगडावरुन इकडे येण्यासाठी निघालो तेव्हांच राणीसाहेबांची प्रकृती ठीक नव्हती. या राजकारणामुळे आम्ही त्यांच्या सन्निध राहू शकत नाही. इकडे आल्यापासून आम्ही अधून मधून त्यांची खबर घेत आहोत. पण आज... आज आम्हांस खूपच चलबिचल वाटतं आहे. सईराणींच्या जीवाचं काही बरं वाईट तर झालं नसेल ना? आम्हांस खूप काळजी वाटते. (बोलतां बोलतां महाराजांच्या डोळ्यांत अश्रू दाटतात)

**मोरोपंत** : (समजूत घालीत) छे, छे महाराज! असे विपरीत नाही घडणार कांही. राणीसाहेब सुखरुप असतील. उगाच भलते सलते विचार मनांत आणू नयेत आपण. ... अस्वस्थता वाटत असेल तर विश्रांती घ्यावी थोडी. (एवढ्यांत बाहेरुन एक पहारेकरी खलिता घेऊन प्रवेशतो)

**पहारेकरी** : (मुजरा करतो) मुजरा महाराज.

**मोरोपंत** : (पहारेकऱ्यास उद्देशून) काय आहे?

**पहारेकरी** : (हातांतील खलिता पंतांच्या हातांत देत) राजगडावरुन सांडणीस्वार हा खलिता घेऊन आला आहे. (खलिता देतो व पुन्हा मुजरा करुन निघून जातो)

**शिवाजी** : राजगडावरुन खलिता? पंत, काय असेल या खलित्यात? कांही विपरीत .... पंत, वाचा तुम्ही. (मोरोपंत खलिता उलगडतात मनातल्या मनांत वाचतात. वाचता वाचतां ते अस्वस्थ होतात.) ..... पंत, काय आहे त्या खलित्यात?

**मोरोपंत** : महाराज ..... महाराज..... (खाली मान घालून रहातात. कांही बोलत नाहीत.)

**शिवाजी** : पंत आपण बोलत कां नाहीत. द्या इकडे तो खलिता, आम्हीच वाचतो. (पंत महाराजांच्या हातात खाल मानेनेच खलिता देतात. महाराज खलिता वाचतात. वाचतां वाचतां त्यांचा धीर सुटतो. ते गलितगात्रपणे मंचकावर बसतात. थोड्यावेळाने किंचित सावरतात. एक दीर्घ श्वास घेऊन सोडतात..) शेवटी आमची भीती खरी ठरली. राणीसाहेब आम्हांस सोडून गेल्या. आमच्या बाळ शंभूराजांस पोरके करुन गेल्या. राणीसाहेब.....! राणीसाहेब ....!! (दुःखाने कपाळास हात लावतात.) (पडदा पडतो)

**अंक दुसरा**

**प्रवेश तिसरा समाप्त**

-❖❖❖-

# अंक दुसरा
## (प्रवेश चवथा)

(अफझलखानाची वाई येथील छावणी, खान हुक्का ओढत बसला आहे. सोबत मुसाखान, फाझलखान, सय्यदबंडा हजर आहेत.)

**अफझलखान :** कृष्णाजी, इधर वाई में आके हमें हप्ता हो गया है। लेकिन सिवा से अभी तक कोई पैगाम नहीं आया। लगता है अब हमेंही उन्हें खबर भिजवानी पडेगी। इतने नजदीक होते हुए भी नहीं आया। (दाढीवरुन हात फिरवीत) लगता है वो बहोत डरता है हमें। कृष्णाजी अब आपको ही उन्हें मिलना चाहिये।

**कृष्णाजी :** जी हुजूर. हमें उनसे मिलकर भेंट का दिन और समय तय करना चाहिये।

**मुसाखान :** जी हुजूर। और जितना हो सके उनसे ज्यादा से ज्यादा फायदा निकालना चाहिये।

**फाझलखान :** सिवाजी ने हमसे सुलह का प्रस्ताव रक्खा है, इसलिये हमें उसपे इतना दबाव डालना चाहिये की उसके हाथ में कुछ ज्यादा ना बचे।

**अफझलखान :** कृष्णाजी आप कल ही उस सिवा को मिलके आओ। अब हम ज्यादा वक्त गँवाना नहीं चाहते।

**मुसाखान :** हुजूर, जबसे हमने इस मुल्कमें प्रवेश किया है, ना तो आज तक सिवा हमारे सामने आया. ना ही उसके सैनिकोंने हमें ज्यादा प्रतिरोध किया है। लगता है सच में ही सिवा आपको डर गया है।

**अफझलखान :** सिवाजी डर गया। हा... हा..... हा..... (जोराने हसतो) सिवाजी हमें डर गया और किले पे जाकर छुप गया। हा... हा..... हा....! (पुन्हा हसतो. हसणे थांबवून मग संशयाने) कृष्णाजी आपको क्या लगता है? सिवा सच में ही डर गया है? या ये उसकी कोई चाल है?

**कृष्णाजी :** नहीं हुजूर। मुझे नहीं लगता की ये उनकी कोई चाल है। क्यूँकी अगर किसी भी तरह से उनके मनमें प्रतिकार करने की सोच होती तो वे अपने मुल्कमें इतने अंदर तक हमें आने ना देते। शायद आपकी डर की वजहसे ही वे आपके सामने आना नहीं चाहते। अगर ऐसा नहीं होता, तो जब हमने उनके बहनोई बजाजी निंबालकरजी को गिरफ्तार किया था तभी वो हमपर आक्रमण करते। गोपिनाथपंतजी ने ठीक ही कहा था, की महाराज आपसे डरते हैं और सुलह करना चाहते हैं।

| | | |
|---|---|---|
| **अफझलखान** | : | बहोत अच्छे! बहोत अच्छे! लेकिन हम सबको होशियारी बरतनी चाहिये। उस सिवा का कोई भरोसा नहीं। सुना है, वो किधर से भी आता है और किधर भी जाता है। कहीं ऐसा ना हो की हम आराम से उसके आने का इंतजार करते रहे और वो हमारी नाक कटवाकर चला भी गया हो। |
| **सय्यदबंडा** | : | हुजूर, ऐसा कभी भी नहीं हो सकता। हम सब पुरी तरह से होशियार है। कोई परींदा भी पर नहीं मार सकता। |
| **मुसाखान** | : | गुस्ताखी माफ हो हुजूर, मगर एक बात कहूँ? |
| **अफझलखान** | : | हाँ, हाँ. बोलिये मुसाखानजी, बोलिये। |
| **मुसाखान** | : | हम इधर वाई तक पहुँचे ये बहोत अच्छी बात है। मगर हम सब सरदारोंमें थोडी नाराजगी है। |
| **अफझलखान** | : | नाराजगी? ... सब सरदारोंमें? ... और वो किसलिये? |
| **मुसाखान** | : | वो इसलिये हुजूर, की विजापूरसे हम इधर तक पहुँचे हैं; मगर हमें बीच में सिवाजी से या उसकी फौजसे कोई जादा प्रतिरोध नहीं किया गया। अगर जंग होती तो हमें अपनी बहादुरी दिखाने का कुछ तो अवसर मिलता। लेकिन ऐसा मौका हमें अभी तक नहीं मिला। और अब शायद मिलेगा भी नहीं। |
| **अफझलखान** | : | हाँ, हाँ। आप सब सरदारोंको जंग लढने का इतना जोश है, ये ते बहोत अच्छी बात है। मगर आप सब लोगोंको पुरे इलाकेमें मनचाहा बर्ताव करने का, औरतोंको नादिम करने का, सब लोगोंको लूटने का, तबाही करने का मौका भी दिया था, ये भी तो सच है? |
| **सय्यदबंडा** | : | जी हुजूर, मगर जंग में जो मजा है वो ऐसी बातोंमें नहीं! |
| **अफझलखान** | : | मगर सय्यद, क्या तुम्हें पता नहीं, की किसी भी तरह से शत्रू को परास्त करना युद्धनीति है? चाहे वो जंग में हो, या फिर सुलह में? |
| **सय्यदबंडा** | : | मतलब? |
| **अफझलखान** | : | मतलब? क्या आप सब ये नहीं जानते की हम क्या सौगंध लेकर इधर आये हैं? सिवाजी को जिंदा या फिर मूर्दा पकड लानेकी कसम ले रक्खी है हमने। हा... हा.... हा....(कुटीलपणे हसतो.) |
| **कृष्णाजी** | : | मगर हुजूर, अब तो ये संभव नहीं है। |
| **अफझलखान** | : | (संतापून) कौन कहता है की ये नामुमकीन है? क्या आपको हम पर शक है? |
| **कृष्णाजी** | : | माफी हुजूर, लेकिन मेरे कहने का ये मतलब नहीं था। शिवाजी महाराज ने गोपिनाथपंतजी के साथ सुलह का प्रस्ताव भेजकर बातचित के लिये |

|  |  |
|---|---|
|  | आपको प्रतापगढ बुलाया है। सुलह के मकसद से ही  हम इधर तक आयें हैं ना? |
| **अफझलखान :** | हा... हा.... हा..... हा.... (कपटीपणाने मोठ्याने हसतो) कृष्णाजी, क्या आपको भी ऐसा ही लगता है? (काहीच अर्थबोध न झाल्याने सर्वजण एकमेकांकडे प्रश्नार्थक पहातात.) |
| **कृष्णाजी :** | माफ करें हुजूर, मगर हम कुछ समझे नहीं। |
| **अफझलखान :** | आपकी समझ में आयेगा भी नहीं। छोड दिजिये। |
| **मुसाखान :** | (डोकं खाजवत) हुजूर, मगर हमारे भी समझमें कुछ नहीं आ रहा है। |
| **सय्यदबंडा :** | हुजूर, अगर सिवा के साथ सुलह किया गया तो आपकी कसम कैसी पूरी होगी? |
| **अफझलखान :** | हा... हा.... हा..... (मोठ्याने हसतो) आप सब एक बात पुरी तरह से ध्यान में रखो हम इधर आये हैं, सिवा को जिंदा या मूर्दा पकडने की कसम लेकर। और हम वो पूरी करके ही इधरसे जायेंगे। हा... हा....हा... हा... हा.... (पुन्हा एकदां हसतो) जबसे हम विजापूरसे निकलें है, हमारा एक ही मकसद है; सिवा की मौत.... सिवा की मौत! हमें लगा था, की वो हमें प्रतिरोध करेगा और हम जंगमें उसे खत्म कर डालेंगे। मगर वो चूहा डर गया। मुल्क के लोगोंपर हमने इतना सारा जुलूम ढाया, खेती बाडी उजाड दी, मंदिरोंको तोड दिया, फिर भी वो हमारे सामने नहीं आया। ....उलटा हमारे सामने सुलह का प्रस्ताव रखा। और वो सुलह भी उस जगह, जिधर वो बुलाता है। हुँ... क्या समझता है वो अपने आप को? हमारा नाम अफझलखान है, अफझलखान। हम कोई कुत्ते नहीं, जिधर वो बुलाये हम दुम हिलाते जाएँ। उसका सुलह का सुझाव हमने इसलिये नहीं मंजूर किया, की हम समझौता करना चाहते हैं। बल्कि ये हमने इसलिये कुबूल किया है, की इस बहाने वो हमारे नजदिक आये, करीब आये... बिलकुल करीब। और फिर, और फिर ... हा.... हा.... हा.... हा..... (क्रूरपणे, भेसूरपणे हसतो. हसणे थांबल्यावर कपटपणाने) ....... हमारा मकसद बहोत नजदिकीसे अंजाम तक ले जानेका हम सोच रहें हैं। |
| **मुसाखान :** | याने की काम तमाम! (अफझलखानाच्या या बोलण्याने कृष्णाजी सोडून सर्वजण आनंदून जातात, कृष्णाजींना मात्र ही गोष्ट फारशी रुचलेली नाही) |
| **सय्यदबंडा :** | मतलब, आपकी कसम पुरी? |
| **अफझलखान :** | हा.... हा.....हा .... (कुटीलपणे हसतो) |
| **कृष्णाजी :** | माफी हुजूर, लेकिन ये बात हमें पसंद नहीं आई। सुलह का प्रस्ताव हमने |

स्वीकार किया है, तो फिर ये सब ठीक नहीं लगता।

**अफझलखान :** (संतापून) कृष्णाजी, तुम हमारे सेवक हो। तुम्हारा काम सिर्फ हुक्म की तामिली करना है। हम जो चाहे, जैसा चाहे, वैसा करेंगे। तुम्हे क्या अच्छा लगता है या क्या बुरा, इससे हमको कुछ फर्क नहीं पडता; और ना हीं हमने इस बारेमें तुमसे कोई सलाह माँगी है। समझे?

**कृष्णाजी :** (खाली मान घालून) जी हुजूर।

**अफझलखान :** अभी हम जैसै कहते हैं वैसा करो, और ठीक उसी तरह सिवाके साथ बात करो। हम नहीं चाहते की आपसे कोई भी भूल हो। हम ये मौका गँवाना नहीं चाहते, समझे?

**कृष्णाजी :** जी हुजूर।

**अफझलखान :** (स्वगत) बस, अब केवल इस मुलाकात का इंतजार है.... एक बार सिवा को मेरे करीब आने दो, सिर्फ एक बार.... बस। फिर.... फिर सिवाजी खतम! खल्लास!! हम मुर्दा सिवाजी को ले जायेंगे बिजापूर!!!

(रंगमंचावर अंधार पसरतो. पडदा पडतो)

**अंक दुसरा**

**प्रवेश चवथा समाप्त**

-❖❖❖-

# अंक दुसरा
## (प्रवेश पाचवा)

(प्रतापगडावरील एक महाल. शिवाजी महाराज व मोरोपंत बोलत बसले आहेत)

**शिवाजी** : पंत, तयारी कशी काय चालली आहे? आम्ही दिलेल्या सर्व सूचनांनुसार काम सुरु आहे ना?

**मोरोपंत** : होय महाराज. सर्व काही नीट सुरु आहे. आपण निश्चिंत असावे.

**शिवाजी** : ठीक आहे. पंत, आम्ही आपणांस त्या भिवा लोहारास बोलावणे धाडण्यास सांगितले होते. त्याचे काय झाले?

**मोरोपंत** : महाराज, आम्ही त्यास सांगावा धाडला आहे. आज येईल तो. पण महाराज, भिवा लोहाराशी आपले कोणते काम आहे ते आम्हांस सांगितले असतेत तर आम्ही स्वतःच ते काम करुन घेतले असते.

**शिवाजी** : आम्हांस ठाऊक आहे ते पंत. पण कामच असे आहे की ते आम्हाला व्यक्तिशःच त्यास सांगावे लागेल.

**मोरोपंत** : (थोडेसे भीत भीत, पण महाराजांच्या मनांतील उद्देश जाणून घेण्याच्या प्रयत्न करीत) ....असे कोणते काम आहे महत्वाचे? आणि तेही भिवा लोहाराकडे?

**शिवाजी** : (जरब युक्त आवाजांत) ....... मोरोपंत....!

**मोरोपंत** : (घाबरुन) क्षमा असावी महाराज. चुकले आमचे.

**शिवाजी** : (समजावणीच्या स्वरांत) पंत, नेमून दिलेली कामे आपण व्यवस्थित करता हे ठाऊक आहे आम्हांस; आणि त्याचा अभिमानही आहे. पण जे काम आपले नसेल तिथे दखल न घेणेच योग्य. नाही का?

**मोरोपंत** : होय महाराज! क्षमा असावी. आम्ही येतो आतां. पहातो भिवा येतो का ते. मुजरा करतात व बाहेर जातात, पण लगेच परततात.) महाराज, भिवा आला आहे बाहेर. पाठवून देऊ का आत?

**शिवाजी** : हो. पाठवा त्यास आंत. (मोरोपंत बाहेर जातात. कांही वेळांत भिवा लोहार काहीसा अवघडल्याप्रमाणे प्रवेश करतो.)

**भिवा लोहार** : मुजरा महाराज. (मुजरा करतो)

**शिवाजी** : या भिवाजी, या. कसे आहात? शस्त्रांच्या कारखान्यातील काम व्यवस्थित सुरु आहे ना?

| | | |
|---|---|---|
| **भिवा लोहार** | **:** | हो महाराज. आम्ही ठीक आहोत आणि कारखान्यातील शस्त्र निर्मितीही चोख सुरु आहे. पण महाराज, आमच्या हातून काही चूक झाली आहे का? |
| **शिवाजी** | **:** | नाही भिवाजी, तसं काही नाही. पण एका महत्वाच्या कामासाठी आम्ही बोलावलं आहे तुम्हाला. |
| **भिवा लोहार** | **:** | जी महाराज. आम्ही साधी माणसं. आपल्या कृपेने शस्त्र कारखान्याची अखत्यारी सांभाळतो. आम्ही कसलं करणार आपलं काम? |
| **शिवाजी** | **:** | भिवा, आमचं काम तुमच्याच कामाशी संबंधीत आहे म्हणूनच बोलावलं आहे तुम्हाला. |
| **भिवा लोहार** | **:** | सांगा महाराज, काय काम आहे? |
| **शिवाजी** | **:** | सांगतो आम्ही. पण लक्षांत ठेवा, हे काम थोडेसें गुप्त स्वरुपाचे आहे. या संबंधी कोणासही खबर कळता कामा नये. म्हणूनच केवळ एकांतात भेटीसाठी बोलावले आहे तुम्हांस. |
| **भिवा लोहार** | **:** | जी महाराज. आपण निर्धास्त असावे. आपण सांगाल ते काम आम्ही चोख करुं. |
| **शिवाजी** | **:** | त्याची खात्री आहे आम्हाला. भिवाजी, आजपर्यंत आपण खूप प्रकारची शस्त्रे तयार केलीत, चिलखतेही बनविलीत. पण आज आम्हांस काही विशिष्ट प्रकारे ती बनवून पाहिजेत. |
| **भिवा लोहार** | **:** | आपण आज्ञा करा महाराज. आपणांस हवी तशीं शस्त्रें करुन देऊ. |
| **शिवाजी** | **:** | भिवाजी, आजपर्यंत आपण जी चिलखते बनविलीत ती पेहरावावरुन परिधान करण्याची. पण आम्हांस असे चिलखत व असा जिरेटोप हवा आहे, जो वजनाने हलका असून तो धारण केल्यावर मग वेष परिधान करता यावा. असे करणे शक्य आहे तुम्हांस? |
| **भिवा लोहार** | **:** | जी महाराज. थोडेसे श्रम घेतले तर ते शक्य आहे. |
| **शिवाजी** | **:** | वा, छान! शिवाय आणखी पण एक काम आहे. |
| **भिवा लोहार** | **:** | जी महाराज. |
| **शिवाजी** | **:** | आपण वाघनखें पाहिली असतीलच. आम्हांस तशाच स्वरुपाची वाघनखें बनवून पाहिजेत; जीं कोणाच्याही नजरेत न भरता आमच्या हातात आम्ही अंगठ्यांप्रमाणे धारण करु शकू. |
| **भिवा लोहार** | **:** | ठीक आहे महाराज. आणखीन काही? |
| **शिवाजी** | **:** | बस एवढेंच, पण यातील एकही गोष्ट इतरांना समजता नये याची याद राखा. |
| **भिवा लोहार** | **:** | जी महाराज. |

**शिवाजी** : हे सर्व करण्यास आपणांस किती अवधी लागेल ?

**भिवा लोहार** : फक्त एक आठवडा. एका आठवड्यात आम्ही हे काम पूर्ण करु.

**शिवाजी** : ठीक आहे. या आता तुम्ही. पण एक लक्षांत ठेवा. हे काम करुन घेऊन येतेवेळी अगोदर वेळ ठरवून या. तुम्ही काय घेऊन आला आहात ते आमच्याशिवाय कुणासही कळता कामा नये याची खबरदारी घ्या.

**भिवा लोहार** : जी महाराज, येतो आम्ही. (मुजरा करतो व निघून जातो. महाराज येरझाऱ्या घालत विचारांत रमतात. इतक्यात पडदा पडतो)

## अंक दुसरा
## प्रवेश पाचवा समाप्त

-❖❖❖-

# अंक दुसरा
## (प्रवेश सहावा)

(प्रतापगडावरील दरबार. शिवाजी महाराज उच्चासनावर बसले आहेत. गोपीनाथ पंत, नेताजी पालकर, कान्होजी जेधे उपस्थित आहेत व आसनांवर बसले आहेत.)

**शिवाजी** : पंत, खानसाहेब वाईत येऊन पोहोचले पण अजून त्यांच्याकडून काही संपर्क नाही.

**गोपिनाथपंत** : जी महाराज. आपल्या आडाख्यानुसार अफझलखान इथपर्यंत तर आला आहे. एव्हाना त्यांच्याकडून कुणीतरी यायला हवं होतं. ... पण मग आता काय करायचं आपण?

**शिवाजी** : हं. .. काय करायचं? ..... थोडं थांबा पंत, एकदा कां खानसाहेबांकडून संपर्क झाला की मग ठरवू.

**नेताजी** : महाराज, आपल्या सूचनेनुसार आतापर्यंत आम्ही खानास जास्त अवरोध केलेला नाही; पण आता तो इथपर्यंत आला आहे त्यामुळे गप्प बसून चालणार नाही.

**शिवाजी** : हो नेताजी, खरं आहे तुमचं; पण आम्ही खानास येथे बोलावला आहे तो त्याच्याशी तह करण्यासाठी. त्यामुळे तहाच्या वाटाघाटी सुरु होईतोपर्यंत तरी धीर धरायला हवा.

**कान्होजी** : पण महाराज, आपण खानांस घाबरत असल्याचे खोटेच सांगून, त्याला तहाच्या निमित्ताने येथे येण्यास भाग पाडायचे व मग त्याचा समाचार घ्यायचा असे ठरले होते. तह करणे हा मूळ उद्देशच नव्हता. मग आता ही तहाची बोलणी कशासाठी?

**शिवाजी** : होय कान्होजीराव, असेच ठरले होते अन् तसेच घडणारही आहे; पण त्यासाठी काहीतरी निमित्त नको का? तहाची बोलणी सुरु होतील, देण्याघेण्याचे काय ते ठरवले जाईल .....म्हणजे तसा प्रयत्न होईल अन् अटी मान्य न झाल्याने तह नामंजूर होईल. मग खान आणि आपण परस्परांविरुद्ध लढाईसाठी आमनेसामने येऊ. मग खान आहे आणि आपण आहोत. ........ काय? चालेल ना?

**कान्होजी** : (राजांची चाल ओळखून मान डोलावत) हं. आता येतं आहे हळूहळू ध्यानात!

(एवढ्यात बाहेरून एक पहारेकरी प्रवेश करतो. महाराजांना मुजरा करतो)

**पहारेकरी** : मुजरा महाराज. बाहेर खानसाहेबांकडून वकील आले आहेत. आपली भेट मागताहेत.

**शिवाजी** : त्यांना आंत पाठवून दे. (पहारेकरी मुजरा करुन बाहेर जातो. महाराज इतरांकडे पाहून..) पाहिलंत, खानसाहेबांकडून वकील आला; म्हणजे आतां खानाला भेटण्याची संधी जवळ आली म्हणायची. (एवढ्यात बाहेरून कृष्णाजी भास्कर प्रवेश करतात.)

**कृष्णाजी** : मुजरा महाराज (मुजरा करतात) मी खानसाहेबांचा सेवक कृष्णाजी भास्कर. खानसाहेबांच्या आज्ञेवरुन आपल्या भेटीसाठी आलो आहे.

**शिवाजी** : या कृष्णाजी भास्कर, आपले स्वागत आहे. काय खबर आहे? काय निरोप आणला आहात आमच्यासाठी?

**कृष्णाजी** : महाराज, तह करण्याचा प्रस्ताव घेऊन आपण गोपिनाथपंतांना खान-साहेबांच्या भेटीसाठी पाठविले होते. मात्र तह करण्यासाठी इकडे येण्याचा प्रस्ताव आपण ठेवला होता. त्यानुसार खानसाहेब इकडे वाई मुक्कामी आले आहेत.

**शिवाजी** : हो. ती खबर पोचली आमच्यापर्यंत. मग आता पुढे कसे काय?

**कृष्णाजी** : खानसाहेबांचा हुकूम आहे की आपण वाई मुक्कामी येऊन त्यांची भेट घ्यावी.

**गोपिनाथपंत** : (मधेच बोलतात) छे, छे! ते कसं शक्य आहे? महाराज आणि खानसाहेब यांची भेट प्रतापगडावरच होईल असा प्रस्ताव आम्ही ठेवला होता. त्यामुळे भेट गडावरच होईल.

**कृष्णाजी** : महाराजांची भेट घेण्याकरीतां खानसाहेब एवढ्या दूरपर्यंत आले आहेत तेव्हां महाराजांनी वाईपर्यंत यायला काहीच हरकत असू नये.

**शिवाजी** : आपण यावर मध्यम मार्ग काढू. खानसाहेबांनी गडाच्या पायथ्याशी यावं. आम्ही गड उतरुन तिथपर्यंत येऊ. खानसाहेबांसाठी आम्ही खास शामियाना उभारु. या शामियानात ही भेट होऊ द्या.

**कृष्णाजी** : ठीक आहे, जशी आपली इच्छा! मात्र या भेटी संदर्भांत काही गोष्टी आमच्या मर्जीनुसारच व्हायला हव्यात. आमच्या काही अटी आहेत. त्या मान्य व्हायला हव्यात.

**शिवाजी** : हं. ठीक आहे. बोला, काय अटी आहेत तुमच्या?

**कृष्णाजी** : या भेटीच्यावेळी शामियान्यात फक्त खानसाहेब, व त्यांचा एक अंगरक्षक हजर असेल. महाराजांनाही आपल्यासोबत फक्त एकच अंगरक्षक घेऊन

येता येईल. शामियान्याच्या बाहेर दोन्हीं बाजूंचे मिळून फक्त दोन पहारेकरी असतील. दोन्हीं बाजूंचे इतर निवडक शिपाई शामियान्यापासून फर्लांगभर अंतरावर रहातील. खानसाहेब शामियान्यात आल्यावर आपणांस खबर दिली जाईल, त्यानंतरच महाराजांनी तिथे यायचे आहे. उभयतांच्या भेटीत तहासंदर्भांत संपूर्ण बोलणे होईल व नंतरच त्यावर शिक्कामोर्तब केला जाईल.

**गोपिनाथपंत** : या अटी का म्हणून?

**कृष्णाजी** : कारण या अटी खुद्द खानसाहेबांनीच घालण्यास सांगितल्या आहेत...

**शिवाजी** : (मधेच ) ठीक आहे. या सर्व अटी आम्हांस मंजूर आहेत.

**कृष्णाजी** : (आश्चर्याने) सर्व अटी मंजूर आहेत?

**शिवाजी** : हो. कां? आपणांस काही शंका आहे का?

**कृष्णाजी** : नाही, काही शंका नाही. पण एकदम सहजी आपण हे मान्य कराल असे वाटले नव्हते.

**शिवाजी** : त्यांत अमान्य करण्यासारखे काय आहे? .... आपला काही छुपा उद्देश तर नाही ना या अटींमागे?

**कृष्णाजी** : (किंचित गडबडतात, पण सावरत) छे, छे, छुपा उद्देश कसला असणार?

**शिवाजी** : तर मग ठीक आहे. येत्या सप्ताहाच्या मध्यास, मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीच्या दिवशी ही भेट होऊ द्या.

**कृष्णाजी** : मंजूर आहे. मी हा सर्व तपशील खानसाहेबांना कळवतो.

**गोपिनाथपंत** : आम्ही पण तयारीला लागतो.

**शिवाजी** : गोपिनाथपंत, नेताजी, कान्होजी आपण सर्व या आतां. आम्हांस कृष्णाजीपंतांसोबत थोडे खाजगीत बोलायचे आहे. (तिघेही 'जी महाराज' म्हणतात व महाराजांना मुजरा करुन बाहेर जातात)

**कृष्णाजी** : महाराज, काय बोलायचे आहे आमच्याशी?

**शिवाजी** : कृष्णाजीपंत, आपली काही हरकत नसेल तर आम्ही आपणांस काही विचारु इच्छितो.

**कृष्णाजी** : हां जरुर. आमची काही हरकत नाही.

**शिवाजी** : आपल्या मुत्सद्देगिरी संदर्भात आम्ही खूप ऐकले आहे. आपली स्वामी निष्ठाही वाखाणण्याजोगी आहे. पण खरे सांगा, आपण खूश आहात या यवनांच्या चाकरीत?

**कृष्णाजी** : हो, निश्चितच. पण आपण हे असं कां विचारता आहात?

**शिवाजी** : नाही, आपण ब्राह्मण. उच्चकुळीचे! असे असताना आपणांस मानवतात हे

म्लेंछ रीतीरिवाज? काही गैरसोय नाही होत आपली?

**कृष्णाजी** : गैरसोय? आणि ती कशाबद्दल? आम्ही यवनांच्या चाकरीत असलो तरी आमचे संपूर्ण दैनंदिन कार्यक्रम सुरळीत चालतात. स्नान. संध्या, देवपूजा इतर आन्हिक वगैरे. ...आम्हांस पूर्ण मोकळीक आहे त्यासाठी.

**शिवाजी** : वा! फारच उत्तम. ....पण पंत, आपण आदिलशाही सेवेत रुजू आहात म्हणूनच आपणांस ही मोकळीक आहे ना? सर्वसामान्यांना आहे ही अशी मोकळीक?

**कृष्णाजी** : (ओशाळून) नाही, इतरांना नाही मिळत ही अशी सवलत. (किंचित थांबून) पण महाराजांचा काय संबंध याच्याशी?

**शिवाजी** : नाही. आमचा काहीही संबंध नाही याच्याशी. पण सर्वांना समान वागणूक मिळावी असे नाही वाटत आपल्याला? (कृष्णाजी भास्कर मान खाली घालतात. महाराज किंचित थांबतात. नंतर) पंत, आमच्या या स्वराज्यासंदर्भात आपले काय मत आहे?

**कृष्णाजी** : म्हणजे? आपणांस नेमके काय जाणून घ्यायचे आहे?

**शिवाजी** : आम्ही हे सहजपणे विचारतो आहोत. जाचक, अन्यायी अशा मुस्लिम अंमलापासून प्रजेला आसरा देण्यासाठी, सर्व सामान्यांना आपलेसे वाटावे, सर्वांना समान न्याय मिळावा यासाठी हे स्वराज्याचे स्वप्न आम्ही पाहतो आहोत. हिंदवी धर्म टिकवून ठेवण्यासाठी, गो, ब्राह्मणांच्या रक्षणासाठी आम्ही हे सर्व करतो आहोत; मात्र ते योग्य की अयोग्य तेच आम्हांस कळेनासे झाले आहे.

**कृष्णाजी** : यांत विचार करण्यासारखे काय आहे? आपले कार्य योग्यच आहे. आपल्यामुळेच हा हिंदूधर्म टिकून रहाणार आहे.

**शिवाजी** : खरेच आपणांस असे वाटते?

**कृष्णाजी** : हो. निश्चितच!

**शिवाजी** : जर आपणांस हे योग्य वाटत असेल तर आपण आम्हांस येऊन सामील का नाही होत? आपल्यासारख्या मुत्सद्यांची आम्हांस या कार्यात खूप मदत होईल. आपण आम्हांस येऊन मिळावेत अशी आमची खूप इच्छा आहे.

**कृष्णाजी** : (तडफदारपणे) महाराज, क्षमा असावी. पण हे कदापी होणे नाही. आम्ही खाल्या अन्नाला जागणारे आहोत आणि आम्हांला याचा खूप अभिमान आहे. आमच्या आदिलशाहीशी असलेल्या निष्ठेविषयी कोणतेही गैरसमज नसावेत. आम्ही आमच्या स्वामींशी पूर्णपणे प्रामाणिक आहोत आणि प्रामाणिकच राहू. आदिलशाही तख्ताच्या हुकूमानुसार, आम्ही

अफझलखानासंगे त्यांचे सेवक म्हणून रुजू आहोत आणि प्रसंगी त्यांच्यासाठी जीव देण्याची वेळ आली तरी देखील आम्ही अजिबात मागे हटणार नाही. आपले कार्य योग्य आहे या बद्दल अजिबात दुमत नाही. परंतु म्हणून, आम्ही आपणांस सामील होऊ या भ्रमांत आपण राहू नये.

**शिवाजी** : ठीक आहे. जशी आपली इच्छा! पण ज्या ब्राह्मण्याचा आपण अभिमान बाळगता, देवपूजा करता; त्याच देवतांच्या मंदिरांवर आपल्याच सैनिकांकडून होणारे हल्ले, मूर्तीभंजन उघड्या डोळ्यांनी पहाता? कित्येक शतकांची परंपरा असलेल्या तुळजापूरची भवानी, पंढरपूरचा विठोबा, जेजूरीचा खंडोबा आणि शिखर शिंगणापूरच्या महादेवाच्या मंदिराचीही तोडफोड मुकाट्याने सहन करता? काहींच वाटत नाही आपणांस? .. एक ब्राह्मण असूनही आपण हे सहन करता, मग यवनांनी तसे केले तर ते गैर कसे मानावे?

**कृष्णाजी** : या मंदिर तोडफोडींशी व्यक्तिशः माझा काहीही संबंध नाही. खरंतर मी स्वतः याला आक्षेप घेतला होता आणि आमच्या सैन्यास तसे करण्यापासून रोखण्याचा प्रयत्नही केला होता. शत्रूवर दबाव आणण्यासाठी नासधूस करावी लागणे हे युद्धांत क्षम्यच मानावे लागेल. पण प्रार्थना स्थळांना, मंदिरांना त्याचा उपसर्ग होता नये म्हणून मी स्वतः खूप प्रयत्न केले, पण मनांत नसले तरी देखील वरिष्ठांचे आदेश हे पाळावेच लागतात. सैनिकी शिस्तीचा तो एक भाग आहे. त्यामुळे या झालेल्या तोडफोडीबद्दल मी स्वतःला दोषी समजत नाही.

**शिवाजी** : तर मग ठीक आहे. आणखीन काय बोलणार आम्ही. आम्हांस वाटले होते आपण ब्राह्मण, देवभक्त; तेव्हां धर्मबुद्धीने आणि न्यायबुद्धीने सारासार विचार करुन आम्हांस सामील व्हाल. पण तुम्हांस ते शक्य नाही. तेव्हां आता आमच्याकडून जमेल तेवढे करु. बाकी सर्व श्रींची इच्छा...... ! (किंचित थांबून) आपण आतां येऊ शकता. खानसाहेबांना सांगा ठरल्याप्रमाणे भेट होईल. आम्हीही त्यांची भेट घेण्यास फार उत्सुक आहोत.

**कृष्णाजी** : (किंचित अपराधीपणाच्या जाणीवेने) ठीक आहे. महाराज, येतो आम्ही. (मुजरा करतात व बाहेर जातात. महाराज किंचित विचारांत गुंततात एवढ्यात कृष्णाजी भास्कर पुन्हा प्रवेशतात व महाराजांना मुजरा करतात)

**कृष्णाजी** : मुजरा महाराज.

**शिवाजी** : अरे, हे काय पंत, तुम्ही पुन्हा का परतलात?

**कृष्णाजी** : महाराज एक सांगावेसे वाटते ....

**शिवाजी** : हां, हां, बोला पंत...!

**कृष्णाजी** : महाराज, भेट ठरल्याप्रमाणेच होईल. मात्र आपण सावधतेने असावे. येतो आम्ही. (एवढे बोलून तडक बाहेर जातात. महाराज आश्चर्याने त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे एकटक पहात रहातात. ...... पडदा पडतो.)

**अंक दुसरा**

**प्रवेश सहावा समाप्त**

-❖❖❖-

# अंक दुसरा
# प्रवेश सातवा

(प्रतापगडावरील एक दालन)
(शिवाजी महाराज व भिवा लोहार बोलत बोलत प्रवेशतात. भिवाजीच्या डोक्यावर एक पेटारा आहे.)

**शिवाजी** : मग, काय म्हणता भिवाजी. आम्ही तुमच्यावर सोपविलेल्या जबाबदारीचं काय झालं? कुठपर्यंत आलंय? आणि हे डोक्यावर काय आहे तुमच्या?

**भिवा लोहार** : महाराज, तेच तर घेऊन आलोय मी. हे काय... (डोक्यावरचा पेटारा उतरवतो आणि त्याला घातलेला कडी कोयंडा काढतो. पेटारा उघडा करुन त्यातून शिरस्त्राण आणि चिलखत काढून दाखवत) आपल्या सूचनेबर हुकूम सर्व काही आहे यात. जिरेटोपाखाली घालण्याचं शिरस्त्राण आणि पोषाखाच्या आंत घालण्याचं चिलखत. महाराज, वजनाने हलके असूनही हे शिरस्त्राण व चिलखत एकदम मजबूत आहे. कितीही मोठा आघात ती झेलू शकतात.

**शिवाजी** : (महाराज जिरेटोप व चिलखत हाताळून पहातात, खूश होत) वा भिवाजी, वा! हे काम मात्र आपण चोख केलंत. आम्ही खूश आहोत आपल्यावर. पण आणखीन एक गोष्ट आणायची विसरलात की काय?

**भिवा लोहार** : (आपल्या सदऱ्याच्या आतींल बाजूस असलेल्या खिशांत हात घालून एका छोट्याशा पेटींतून वाघनखे बाहेर काढत) छे, छे, महाराज. विसरणार कसं? हे काय.. (महाराजांच्या हातात वाघनखे देतो)

**शिवाजी** : (वाघनखें हातांत घेऊन तीं डाव्या हाताच्या बोटांत घालतात व दोनचार वेळां हाताच्या मुठीची उघडझाप करुन तीं सोयीस्कर असल्याची खात्री करुन घेतात. हाताच्या बोटांत वाघनखे घालुन मूठ झाकल्यावर बाहेरील बाजूने अंगठ्या घातल्यासारखे दिसावे) भिवाजी आपण तर आमच्या अपेक्षेपेक्षांही सुंदर काम केलेत. खरोखरच आम्ही खूप खुश आहोत तुमच्यावर. बोला काय बक्षिसी पाहिजे आपणांस?

**भिवा लोहार** : महाराज, काही नको आम्हांला. आपल्या चाकरीत ठेवून घेतलं आहे हेच खूप आहे आमच्यासाठी.

**शिवाजी** : भिवाजी त्यांत एवढे विशेष काय? इतरांप्रमाणेच आपणही सेवेत आहात एवढेच. पण करायचे म्हणून नाही तर मनापासून काम केलेत तुम्ही, मग

बक्षिसी नको द्यायला? (हातातील सोन्याचे कडे काढून भिवाजीला देत) हे घ्या. ठेवा तुम्हाला.

**भिवा लोहार** : महाराज, हे कशासाठी?

**शिवाजी** : अहो ठेवा, बक्षिसी आहे ती.

**भिवा लोहार** : आज खूप बरं वाटतं आहे आम्हाला. बक्षिसी मिळाली म्हणून नव्हे तर आपल्या मनाप्रमाणे काम करुन देऊ शकलो म्हणून.

**शिवाजी** : (आपल्या हातातील वाघनखांकडे पहात) होय भिवाजी, खरंच आवडलें आम्हांस तुमचे काम. आता या तुम्ही. मात्र जाण्याअगोदर हा सामग्रीचा पेटारा आंतल्या खान्यात ठेवून चला.

**भिवा लोहार** : जी महाराज. (पेटारा उचलून आतल्या बाजूस ठेवून पुन्हा लगेच बाहेर येतो) येतो महाराज. (मुजरा करतो व निघून जातो. महाराज वाघनखें घातलेल्या हाताकडे पहात पुन्हा एक-दोनदां डाव्या हाताची उघडझाप करुन पहातात. स्वतःशीच खुश होत मनोमन हसतात.)

(रंगमंचावर हळूहळू अंधार होतो. ....... पडदा पडतो.)

## अंक दुसरा
## प्रवेश सातवा समाप्त

-❖❖❖-

# अंक दुसरा
# प्रवेश आठवा

(प्रतापगडावरील दरबार. शिवाजी महाराज उच्चासनावर बसले आहेत. गोपिनाथपंत, नेताजी पालकर, मोरोपंत, कान्होजी जेधे, संभाजी कावजी, जीवा महाला उपस्थित आहेत.)

**शिवाजी** : पंत, खानाशी भेट घेण्याचा दिवस जवळ आला आहे. आम्ही दिलेल्या सर्व सूचना व्यवस्थित लक्षात आहेत ना आपल्या?

**मोरोपंत** : होय महाराज. सर्व काही नीट लक्षांत आहे. आपल्या सूचनेनुसार गडाच्या पायथ्याशी एक शोभिवंत शामियाना उभारण्याची चोख व्यवस्था केलेली आहे.

**शिवाजी** : शामियाना उभारल्यावर तो खानाच्या अधिकाऱ्यांच्या हाती सोपवा व आपल्या लोकांना तेथून दूर करा.

**मोरोपंत** : पण महाराज, आपली माणसे तिथे असली तर काय हरकत आहे?

**शिवाजी** : नको. आम्ही सांगतो तसेच करा.

**मोरोपंत** : ठीक आहे महाराज.

**शिवाजी** : पंत, नेताजीराव, कान्होजीराव, आतां आम्ही काय सांगतो ते सर्व नीट ऐका. कांही दिवसांपूर्वी आम्ही आपणा सर्वांना काही सूचना दिल्या होत्या, मात्र त्या मागची कारणे सांगितली नव्हती. आतां आम्ही तो सर्व खुलासा करणार आहोत. त्याचबरोबर खानाला कसा कोंडीत पकडायचा तेही सांगणार आहोत. मात्र एक लक्षांत असूद्या, आम्ही आतां जे काही सांगतो आहोत ते फक्त तुमच्या पुरतीच मर्यादीत ठेवा. इतर कुणासही योग्य वेळ येईपर्यंत यांतील कांहीच कळता उपयोगी नाही. तसे झाल्यास ते घातक होईल व खान सावध होईल.

**सर्वजण** : जी महाराज.

**शिवाजी** : पंत, काही दिवसांपूर्वी आम्ही आपणांस वाई व आसपासच्या भागांत तसेच गडाच्या आजूबाजूच्या भागांत नवीन कामे हाती घेण्यास सांगितली होती ती कामे सुरु आहेत ना?

**मोरोपंत** : हो महाराज, सर्व कामे सुरळीत सुरु आहेत.

**शिवाजी** : आतां या कामगारांपैकी कांही निवडक लोकांना विश्वासांत घेऊन याच परिसरातल्या कांही मोक्याच्या ठिकाणी खंदक तसेच भूयारें बांधून तयार

ठेवा. खान येथे प्रतापगडापाशी भेटीसाठी येईल त्यावेळी वाईच्या तळावरील एकूण सैनिकांपैकी निम्म्याहून कमी सैनिकांना घेऊन तो इकडे येईल असा आमचा कयास आहे. हे सैन्य प्रतापगडाच्या आजूबाजूच्या पार व जावळी परिसरांत असेल. लढाईला सुरुवात होताच त्या सैनिकांना खानाच्या मदतीस पोचण्यापूर्वीच मधल्यामधे खतम करायचे आहे.

**नेताजी** : ठीक आहे महाराज.

**शिवाजी** : नेताजीराव, मागे आम्हीं आपणांस झाडे कापण्याचा अनुभव असलेल्या सैनिकांची नेमणूक करण्यास सांगितले होते.

**नेताजी** : होय महाराज. ते कामावर रुजू आहेत.

**शिवाजी** : त्या सैनिकांना विश्वासांत घेऊन वाईपर्यंतच्या परिसरातील रस्त्यालगतची किंवा पायवाटांनजीकची मोठमोठी झाडे, वृक्ष, अर्धवट पद्धतीने कापून ठेवण्यास सांगा. तसेंच छुप्या रितीने त्यांना दोरही बांधून ठेवा. हीं झाडें दिसावयास व्यवस्थितच असावीत पण ज्यावेळी ऐन रणधमुाळी माजेल त्यावेळेस दोरांचा हिसका मिळताच हीं झाडें खाली कोसळून सर्व वाटा बंद व्हायला हव्यात, म्हणजे वाईच्या छावणीतील शत्रूचे सैन्य इथपर्यंत पोचणारच नाही. शिवाय त्यांचे हत्ती, उंट अशा वेळीं निष्प्रभ होतील. त्यांच्या तोफखान्याला पुढे सरकणे कठीण होईल व शत्रूची दमछाक होईल. मात्र आपल्या सर्व सैनिकांना याची किंचित अगोदर पूर्वकल्पना देण्यात यावी म्हणजे ते सावध रहातील. या सर्व गोष्टी करतांना कोणालाच संशय येऊ नये म्हणूनच रस्त्यांच्या बाजूला चर खोदण्याचे व नवीन रस्ते करण्याचे काम आम्ही अगोदरपासूनच हाती घेतलेले आहे. या कामानिमित्त वावरत असलेल्या मजूरांत आपले सैनिक सहजतेने मिसळून हे कार्य करु शकतील. मात्र हे सर्व काम करीत असतांना ते सैनिक मजूरांच्याच वेशांत असतील याची काळजी घ्या. जंगलांत इतरत्र आपले सैनिक आतापासूनच पेरुन ठेवा. तयार केलेल्या भूयारांत आवश्यक ती शस्त्रसामुग्री गुप्तपणाने पोचती करुन साठवून ठेवा. हल्ला करण्याची सूचना मिळताच शत्रूवर तुटून पडा. शत्रूच्या सैनिकांना केवळ जखमी करुन सोडून देऊ नका तर शक्य तेवढी कापाकापी करा. लक्षांत ठेवा, खानाचे सैन्य अफाट आहे. त्यांना जिवंत ठेवाल तर पस्तवाल. मग मात्र आपल्या या स्वराज्याला कुणीही वाचवू शकणार नाही.

**नेताजी** : जी महाराज.

**शिवाजी** : कान्होजीराव, आपण अनुभवी आहात, या कामी आपली आम्हाला खूप

मदत होणार आहे तेव्हां, या प्रतापगडाच्या परिसरांतील लष्करी कारवाईसाठीची सर्व जबाबदारी आम्ही आपल्यावर सोपवत आहोत. कोणत्याही परिस्थितीत शत्रू या प्रतापगडावरही येता कामा नये किंवा या परिसरांतून माघारीही जाता कामा नये.

**कान्होजी** : जी महाराज. आपल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन केले जाईल. शत्रू सुखासुखी इथून जाऊ शकणार नाही याची खात्री असावी.

**शिवाजी** : ठीक. नेताजी, सेनापती या नात्याने तुम्हाला हे सर्व हाताळायचेच आहे पण तुम्ही स्वतः वाई व महाबळेश्वर यांना जोडणाऱ्या तायघाट परिसरांत रहा. म्हणजे शत्रूचे सैन्य वाईतून निघतांच त्यांना पुढे येणेच कठीण व्हायला हवे. शिवाय राजगडावर आऊसाहेब आहेत. यदाकदाचित शत्रूने त्या दिशेने मोर्चा वळविला तर तुम्हांस लगेच त्यांच्या मदतीस जाणे सोयीस्कर होईल. आणखीन एक, अफझलखानाने आतापर्यंत स्वराज्यातील जी जी ठाणी, गढ्या किंवा किल्ले आपल्या ताब्यात घेतली आहेत त्यापरिसरांत आपले शिपाई तैनात करुन ठेवा. एकदां लढाईस सुरुवात झाली की ताबडतोब शत्रूवर हल्ला करुन ती ती ठिकाणे आपल्या ताब्यात घ्या. खुद्द अफझलखान आमच्या भेटीस येणार असल्याने त्यांचे सैनिक बेसावध असतील त्याचा फायदा उठवा. शिरवळचा किल्ला खानाच्या हाती पडला आहे, राजगड तेथून जवळच आहे. एखाद्या अनुभवी सरदाराला तिथेच जवळपास तयारीत रहाण्यास सांगा. त्यामुळे येथे लढाईला सुरुवात झाली की त्याचदिवशी तेथल्या किल्ल्यावर आमच्या सैनिकांनी हल्ला करुन तो ताब्यात घ्यायचा आहे. कारण लढाई सुरु झाल्यावर हारजीत कुणाची होईल सांगता येत नाही पण राजधानीच्या जवळ शत्रूच्या हातात आपले ठिकाण असणे घातक ठरेल.

**नेताजी** : जी महाराज.

**शिवाजी** : मोरोपंत, या गडाच्या पश्चिमेस आपण तयारीत रहायचे आहे. आपल्या साथीला कृष्णाजी पवार सुपेकरांना घ्या.

**मोरोपंत** : जी महाराज.

**शिवाजी** : संभाजी कावजी, जीवाजी आपण आहात ना तयार?

**कावजी** : जी महाराज. आम्ही तर कधी एकदां लढाई सुरु होते त्याच प्रतीक्षेत आहोत.

**जीवा महाला** : होय महाराज. शत्रूवर हल्ला करण्यासाठी हात शिवशिवताहेत आमचे.

**शिवाजी** : छान. आम्ही तशीच महत्वाची जबाबदारी सोपविणार आहोत तुम्हा

दोघांवर.

**कावजी** : महाराज, आपण कोणतीही जबाबदारी द्या .....

**जिवा महाला** : ....... प्राणपणाला लावून आम्ही ती पुरी करु.

**शिवाजी** : होय आम्हांस माहित आहे ते, आणि म्हणूनच आपल्यासारख्या धाडसी लढवय्यांना आम्ही आमच्या सोबत ठेवणार आहोत.

**जिवा महाला** : काय ? म्हणजे आम्ही खुद्द आपल्यासोबत असणार ?

**शिवाजी** : होय. अफझलखानाच्या भेटीस जातेवेळी आमचे शरीररक्षक म्हणून आम्ही तुम्हां दोघांस बरोबर घेणार आहोत.

**कावजी** : ठीक आहे तर मग. आतां त्या खानाची काही खैर नाही.

**जीवा महाला** : महाराज, अगदी डोळ्यांत तेल घालून आम्ही आपली राखण करु. आपल्यावर कुणी हल्ला करण्याचा प्रयत्न जरी केला तरी त्याचे हात आम्ही तेथेच कलम करु.

**शिवाजी** : आता सर्वांसाठी एक महत्वाची सूचना. खानाशी आमची भेट ठरली आहे त्याच दिवशी आपल्याला हे आक्रमण करायचे आहे. इशारा म्हणून गडावरुन तोफगोळ्यांचे पाच बार काढले जातील. ते झाले की वेळ न दवडतां शत्रूवर तुटून पडा.

**सर्वजण** : ठीक आहे महाराज.

**शिवाजी** : आपण सर्व या आतां. दिलेल्या सूचनांबर हुकूम कामास लागा.

**सर्वजण** : जी महाराज. येतो आम्ही. (सर्वजण मुजरा करतात व निघून जातात. महाराज विचारांत मग्न आहेत. एवढ्यात गोपिनाथपंत व बहिर्जी प्रवेशतात)

**गोपि / बहिर्जी** : (मुजरा करतात) मुजरा महाराज

**शिवाजी** : या पंत, या बहिर्जी. आम्ही आतां तुमचाच विचार करत होतो.

**गोपिनाथपंत** : काही विशेष आहे का ?

**शिवाजी** : सध्या जे चालू आहे ते सर्व विशेषच आहे, नाही का ? (हलकेच हसतात)

**गोपिनाथपंत** : म्हणजे, आम्ही नाही समजलो.

**शिवाजी** : त्यांत न समजण्यासारखे काय आहे? अहो, खानाच्या भेटीचा दिवस जवळ येतो आहे म्हणजे विशेषच नाही का ?

**गोपिनाथपंत** : महाराज, क्षमा असावी. पण अफझलखान एवढा दाराशी येऊन ठेपला तरी आपण अजून निर्धास्त कसे तेच समजत नाही. खानाने भेटीचा प्रस्ताव स्वीकारला असला तरी ती भेट सहजपणे होईल असे आम्हांस अजिबात वाटत नाही. तो काहीतरी दगा-फटका करेल असं राहून राहून वाटतं.

**बहिर्जी** : होय महाराज. आमच्याही गुप्त हेरांकडून अशाच खबरा येताहेत आणि म्हणूनच त्या आपल्या कानावर घालण्यासाठी आम्ही आलो आलोत. आपण सावध असावे राजे.

**शिवाजी** : हो. आम्ही सावध राहू. पण तुम्हीही काळजी घ्या. ज्या दिवशी ही भेट आहे त्या दिवशी पूर्णपणे नेताजींच्या संपर्कात रहा. ते देतील त्या सूचना लगेच अंमलात आणा. कोणतीही कसूर ठेवू नका.

**बहिर्जी** : जी महाराज.

**शिवाजी** : बहिर्जी, आपल्या गुप्त हेरांकरवी आमच्या सर्व ठिकाणच्या सैनिकी तळांच्या प्रमुखाशी संपर्क साधा. त्या सर्वांना सैनिकी कारवाईसाठी पूर्णपणे तयार रहावयास सांगा. खानाशी ठरलेल्या भेटीच्या दिवशी नेताजीराव ज्या सूचना करतील त्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याचा आमचा आदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवा.

**बहिर्जी** : जी महाराज.

**शिवाजी** : आणखीन एक. मागे आम्ही आपणांस आपल्या हेरखात्याची माणसे रस्ते दुरुस्तीच्या कामांत घुसविण्यास सांगितले होते. त्यांच्यामार्फत खानाच्या वाईपासून इथपर्यंतच्या प्रवासांत ज्या काही विशेष गोष्टी घडतील त्यांचा मागोवा घ्या. शिवाय खानाला भेटण्यास कोणकोण येतात त्यांची बित्तंबातमी आमच्यापर्यंत पोचवा. आपल्यातले कुणी फितूर असतील तर त्यांचीही खबर आम्हांस कळू द्या.

**बहिर्जी** : जी महाराज. आपल्याला सर्व घडामोडींची खबर पोचवू आम्ही.

**शिवाजी** : ठीक आहे. या तुम्ही आतां.

**बहिर्जी** : जी महाराज (मुजरा करतो व निघण्यासाठी वळतो तेवढ्यात...)

**शिवाजी** : .... बहिर्जी, जरा थांबा.

**बहिर्जी** : काय झालं महाराज?

**शिवाजी** : आपणा दोघांनाही एक सांगायचं राहूनच गेलं.

**गोपि/बहिर्जी** : काय महाराज?

**शिवाजी** : आज पहाटे आम्ही भवानी मातेसमोर ध्यानस्थ बसलो होतो. तेवढ्यात देवीनं आम्हाला दृष्टांत दिला. तिनं आम्हाला एक लखलखीत तलवार भेट दिली आणि युद्धांत विजयी होण्याचा आशीर्वादही दिला.

**बहिर्जी** : (दोघेही आश्चर्यचकीत होतात) काय सांगता काय महाराज?

**गोपिनाथपंत** : साक्षात भवानीमातेनं दृष्टांत दिला?

**शिवाजी** : होय खरे आहे ते. (बहिर्जी व पंत मान वर करुन आकाशाच्या दिशेने

पहातात व देवाला श्रद्धेने हात जोडतात) खानाबरोबरच्या या लढाईत आतां आम्हीच विजयी होणार याची पक्की खूणगाठ बांधा. बहिर्जी, आपल्या हेरांकरवी ही खबर राज्यभर पसरवा. तसेच आमच्या सैनिकांपर्यंतही ही खबर लगोलग पोहोचवा.

**बहिर्जी** : (एकदम उत्साहीत होऊन) जी महाराज. येतो आम्ही.

**शिवाजी** : हं, या तुम्ही. (बहिर्जी जातो)

**गोपिनाथपंत** : महाराज, खरंच देवीनं दृष्टांत दिला आपल्याला ?

**शिवाजी** : कां ? खरं वाटत नाही तुम्हांस ?

**गोपिनाथपंत** : तसं नव्हे पण ....! जाऊद्या महाराज, सहज म्हणून विचारलं.

**शिवाजी** : (किंचित हसतात) पंत .....!

**गोपिनाथपंत** : (विषय बदलत. चिंतेने ) महाराज, खानाशी आपली भेट ठरल्यापासून आम्ही खूप बेचैन आहोत.

**शिवाजी** : (सहजतेने) म्हणजे पंत, तुमच्या मनांत देखील आमच्या कर्तृत्त्वाबद्दल शंका आहे की काय ?

**गोपिनाथपंत** : छे, छे. महाराज, भलतंच काय ? अहो, खान कपटी आहे, कावेबाज आहे हे सर्व जवळून पाहिले आहे आम्ही. म्हणूनच काळजी वाटते.

**शिवाजी** : हो, हे मात्र खरे आहे. पण एक लक्षांत असू द्या पंत, तो शेर असला तरी आम्ही देखील सव्वाशेर आहोत. आणि म्हणूनच फार मोठे धाडस करायचे ठरविले आहे आम्ही .

**गोपिनाथपंत** : ..... धाडस ? ... आणि ते कसले महाराज ?

**शिवाजी** : (किंचित हसतात) कळेलंच ते नंतर. ...पण म्हणूनच या धाडसावेळी आपल्यावर महत्त्वाची जबाबदारी देणार आहोत आम्ही.

**गोपिनाथपंत** : महाराज, आपण सांगाल ती कामगिरी नेमकेपणाने पार पाडू आम्ही.

**शिवाजी** : पंत, एक विचारतो आम्ही. मात्र त्याबद्दल आपले नेमके मत काय ते स्पष्ट शब्दांत सांगाल आम्हांस ?

**गोपिनाथपंत** : निश्चितच. आजपर्यंत नेहमीच स्पष्ट बोलत आलो आहोत आम्ही आपणाशी.

**शिवाजी** : (काहीसे गंभीर होत) तर मग पंत, एक सांगा. अफझलखानाशी आमच्या ठरलेल्या भेटीवेळीं खानाकडून आम्हांस काही दगा-फटका झाला तर आपण काय कराल ?

**गोपिनाथपंत** : छे, छे महाराज. हे काय भलतंच अभद्र बोलता आपण ? असं काहीही होणार नाही.

**शिवाजी** : पंत, आपण खात्रीने सांगू शकाल की खान काही दगा-फटका करणारच

नाही ?

**गोपिनाथपंत** : तसं नव्हे महाराज, पण..... आम्हांस वाटते की असे काही घडणार नाही. .... म्हणजे असले विपरीत काही घडू नये...!

**शिवाजी** : पंत, तुम्हांस काय वाटते किंवा आम्हांस काय वाटते यावर गोष्टी ठरत नसतात. विपरीत घडू नये असे वाटणे हे स्वाभाविकच आहे; पण राज्यकर्त्याला तसं वाटून उपयोगी नाही. घडावे असे वाटते ते घडणारच नाही आणि विपरीत तेच घडेल याची पूर्ण जाणीव ठेवूनच राज्यकर्त्याला निर्णय घ्यावे लागतात.

**गोपिनाथपंत** : महाराज, आपणांस नेमके काय सूचवायचे आहे ?

**शिवाजी** : पंत, विजापूरपासून वाईपर्यंत आम्ही खानास सुखासुखी येऊ दिला तो त्यास सहज रितीने माघारी जाऊ देण्यासाठी नक्कींच नाही; आणि खान पण आमचे निमंत्रण स्वीकारुन इकडे आला आहे ते पण उगाच नसणारच. त्याच्याही मनांत काहीतरी बेत असेलच. अशावेळी त्याने आम्हांला जीवें मारलेच तर मग आपण नेमके काय कराल ?

**गोपिनाथपंत** : (कल्पनेनेही घाबरत) ....महाराज, ....महाराज असं कसं काय बोलू शकता आपण स्वतःबद्दल ? आम्हांस तर आपले हे बोल ऐकणेही सहन नाही होत.

**शिवाजी** : ....पंत, आम्हांस नेमका जबाब द्या.

**गोपिनाथपंत** : महाराज, खरे सांगायचे तर आम्ही काहीच करु शकणार नाही. आम्ही गलितगात्र होऊन जाऊ.

**शिवाजी** : ....तर मग आतां आम्ही काय सांगतो ते ऐका. अफझलखानाच्या रुपाने स्वराज्यावर हा काळानेच घाला घातलेला आहे. त्याचे सैन्यबळही अफाट आहे. खानाशी होणारी तहाची बोलणी यशस्वी ठरली तर त्याच्या जाचक अटींमुळे; आणि बोलणी अयशस्वी ठरली तर आपल्या सैन्याच्या बळावर तो उभा महाराष्ट्र बेचिराख करुन टाकेल. त्यामुळे खानाचे सैन्य इथून परत न जाणेच स्वराज्याच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणूनच आम्ही आमच्या सेनापतींना लढाईची सिद्धता ठेवण्याची सूचना केली आहे. खानाशी होणाऱ्या भेटीच्या दिवशी गडावरुन तोफगोळ्यांचे पाच बार काढले जाताच शत्रूवर तुटून पडण्याचे आदेश दिले आहेत. मात्र या संदर्भात आम्ही आपल्यावर एक जबाबदारी देऊ इच्छितो.

**गोपिनाथपंत** : जी महाराज.

**शिवाजी** : आम्ही खानाच्या भेटीसाठी गेल्यापासून दोन घटीकांत आम्ही परतलो

नाही किंवा आमच्याकडून कोणतीही सूचना आली नाही तर वेळ न दवडतां तोफखान्याच्या प्रमुखांस तोफांचे पाच बार काढण्याचे आदेश द्या. आपल्या आदेशांचे पालन करण्याच्या सूचना आम्ही तोफखाना प्रमुखांस देऊन ठेवू. तोफांचे बार होताच आपले सैन्य खानाच्या सैन्यावर तुटून पडेल. एकदां का खानाचे सैन्य गारद झाले की आपल्या या स्वराज्याचा धोका कमी होईल. (किंचित थांबतात) अफझलखाना बरोबरच्या भेटींत खरोखरच खानाने काही दगाबाजी केली व यदाकदाचित आमच्या जीवाचे काही बरेवाईट झाले तर लगोलग राजगडावर जाऊन आऊसाहेबांना भेटा व त्यांच्या सल्ल्यानुसार पुढची कार्यवाही करा. एक ध्यानांत असूद्या, खानाला या इथे आणण्यासाठी तुम्ही, आम्ही खूप कष्ट घेतले आहेत. आमचा जीव गेला तरी चालेल, पण इथपर्यंत खेचून आणलेल्या खानाच्या सैन्याला मात्र माघारी जाऊ देऊ नका.

**गोपिनाथपंत** : ठीक आहे महाराज, आपल्या या आदेशाचे आम्ही पूर्णपणे पालन करु.

**शिवाजी** : पंत, निघा आतां. पुढच्या कामास लागा.

**गोपिनाथपंत** : जी महाराज. (मुजरा करुन पंत जाण्यासाठी वळतात एवढ्यांत)

**शिवाजी** : ...पंत, मगाशी आम्ही देवीनं आम्हाला दिलेल्या दृष्टांताविषयी सांगत होतो, तुमचा विश्वास आहे ना यावर ?

**गोपिनाथपंत** : ज .. ज ... जी महाराज.

**शिवाजी** : पंत, तुम्ही आमच्या खास विश्वासातले म्हणून एक गोष्ट सांगतो. मात्र हे गुपित फक्त तुमच्यात व आमच्यातच रहावयास हवे. आहे कबूल ?

**गोपिनाथपंत** : जी महाराज. आम्ही कबूल आहोत.

**शिवाजी** : तर मग ऐका पंत, आम्ही देवीसमोर ध्यानासाठीं बसलो होतो हे खरे आहे. पण आम्हांस असा कोणताही दृष्टांत झालेला नाही.

**गोपिनाथपंत** : (आश्चर्याने व अविश्वासाने) काय ? काय म्हणालात आपण महाराज ?

**शिवाजी** : होय पंत, आम्ही खरे तेच सांगतो आहोत; आम्हाला असा कोणताही दृष्टांत झालेला नाही.

**गोपिनाथपंत** : पण मग महाराज, मगाशी बहिर्जींना आपण तसं सांगितलंत, एवढंच नव्हे तर ही गोष्ट आपल्या प्रजेच्या, आपल्या सैनिकांच्या कानी पोचवायची सूचनाही केलीत.

**शिवाजी** : (किंचित हसतात) ... पंत, तुम्हीही विश्वास ठेवलात यावर ?

**गोपिनाथपंत** : महाराज, खुद्द आपणच हे सांगितल्यावर विश्वास ठेवावाच लागणार ना ?

**शिवाजी** : पंत, एवढे मोठे प्रचंड सैन्य घेऊन अफझलखान इकडे आला आहे.

त्याच्याशी लढावयाचे तर सैनिकांत मानसिक बळही असायला हवे. मानसिक बळ म्हणजेच आत्मविश्वास. एकदां का हा आत्मविश्वास जागृत झाला की बाकीचे सर्व कार्य मग सोपे होऊन जाते. खानाच्या आक्रमणामुळे प्रजाही भरडली गेलेली आहे. प्रजेच्या मनांतही आत्मविश्वास निर्माण होण्याची गरज आहे. गरीबीमुळे, परिस्थितीमुळे रंजलेल्या, गांजलेल्या प्रजेला मानसिक आधाराची गरज असते आणि म्हणूनच हे लोक देव-देवस्कीच्या मागे लागून आत्मविश्वास जागवायचा प्रयत्न करतात. देवीने आम्हांला दृष्टांत देऊन तलवारही दिलेली आहे हे ऐकतांच त्यांचही मानसिक बळ वाढेल आणि या खानाच्या संकटापासून आता आम्ही त्यांना नक्की वाचवू याची खात्री पटेल. केवळ सैनिकांचे आणि प्रजेचे मनोधैर्य वाढावे एवढाच आमचा एकमात्र उद्देश आहे. बाकी काही नाही! आणि म्हणूनच केवळ हा दृष्टांत झाल्याचा बहाणा; समजले आपणांस?

**गोपिनाथपंत** : (भारावून जात) महाराज, किती दूरवरचा अन् खोल विचार करता आपण प्रजेचा आणि सैनिकांचा?

**शिवाजी** : गोपिनाथपंत, अहो राज्यकर्ते आहोत आम्ही; आणि राज्य करायचे म्हणजे केवळ शस्त्रेच चालविता येऊन चालत नाही तर प्रजेच्या मानसिकतेचा वेध घेण्याची क्षमताही असावी लागते राज्यकर्त्याला. ... देवकृपेने आमच्यांत ती आहे एवढेच!

**गोपिनाथपंत** : महाराज, असा राजा आम्हाला लाभणे हे भाग्यच आहे आमचे.

**शिवाजी** : ...आणि आपल्यासारखे विश्वासू आणि निष्ठावंत सहकारी असणे हे आमचे भाग्य. नाही का? (दोघेही मनापासून हसताहेत एवढ्यांत रंगमंचावर हळूहळू काळोख पसरतो. पडदा पडतो.)

**अंक दुसरा**

**प्रवेश आठवा समाप्त**

-❖❖❖-

# अंक दुसरा
## (प्रवेश नववा, दृष्य-पहिले)

(खानाच्या भेटीस जाण्याचा दिवस. सकाळचा प्रसन्न प्रहर. प्रतापगडावरील एक अंतर्महाल. एका बाजूस देवघर. श्री देवी भवानीची मूर्ती. शिवाजी महाराज वेषभूषा करताहेत. इतर पोशाख केलेला आहे. मात्र चिलखत घालून त्यावर बाराबंदी घालणे, शिरस्त्राण चढवून त्यावर जिरेटोप चढविणे व डाव्या हातांच्या बोटांत वाघनखें घालणे चालू आहे. पोशाख करुन तयार होताच, कमरेला तलवार बांधून राजे श्री देवी भवानी समोर वीरासनात बसतात व देवीला नमस्कार करतात. महाराज तयार होऊन निघतांच तुताऱ्या, शिंगे फुंकण्याचे आवाज ऐकू येतात. हे सर्व दृष्य जाळीच्या पडद्याआड किंवा पांढऱ्या पडद्यावर छायारुपांत दाखविणे.)

**(पडदा पडतो)**

**प्रवेश नववा, दृष्य पहिले समाप्त**

-❖❖❖-

# अंक दुसरा
# (प्रवेश नववा, दृष्य-दुसरे)

(प्रतापगडाच्या पायथ्याशी उभारलेला व सजवलेला शामियाना. अफझलखान उच्चासनावर बसला आहे. खानाच्या कमरेस तलवार आहे व त्याच्या कमरपट्ट्यात खंजीर खोचलेला आहे. त्याच्या पासून काही अंतर राखून सय्यदबंडा उभा आहे. शामियान्याच्या सजावटीने भारावून जात शिवाजीच्या संपत्तीचा लोभ होऊन तो खजिना गिळंकृत करण्याचा त्याचा मनोदय त्याच्या देहबोलीतून व्यक्त होतो. अफझलखान उभा राहून अस्वस्थपणे फेऱ्या मारु लागतो. महाराज अजूनपर्यंत न आल्याने तो बेचैन आहे. कधी एकदां शिवाजीला खतम करतो असं त्याला झालं आहे. एवढ्यात बाहेर तुताऱ्या, शिंगे फुंकण्याचे आवाज ऐकू येतात.''शिवाजी महाराज पधार रहे है'' असा पुकारा ऐकू येतो. खान सावध होतो. पुन्हा आसनावर बसतो. महाराजांची वाट पहातो.)

(एवढ्यात शिवाजी महाराज प्रवेश करतात. त्यांच्या कमरेस तलवार आहे. महाराजांचा वाघनखें घातलेला डावा हात तलवारीच्या म्यानावर आहे. सोबत जीवा महाला आहे.)

**अफझलखान :** ''आइये, आइये राजे। आपको मिलने के लिए हम नासबूर है। हम चाहते हैं की हम दोस्तोंकी तरह रुखसत हो, गले मिलकर रुखसत हो ; हमें गलें मिलिये। इसी पल के लिये ही तो हम बहोत बेताब थे।''

(अफझलखान उभा राहून शिवाजीशी गळाभेट घेण्याच्या निमित्ताने हात फैलावतो. शिवाजी महाराज फक्त हलकेच हसतात व आपणही हात फैलावून त्याच्या मिठीत जातात. खान त्यांना आलिंगन देतो आणि काही कळायच्या आंतच त्यांची मान आपल्या डाव्या बगलेत दाबतो व उजव्या हाताने कमरेचा खंजीर काढून महाराजांच्या पाठीवर वार करतो. खंजीर पोशाखातील चिलखतावर आदळतो आणि खण्ण असा आवाज होतो. महाराज चकीत होतात पण लगेच स्वतःला सावरुन ते खानाच्या डाव्या बाजूने पाठीमागे होत आपल्या डाव्या हातातील वाघनखे खानाच्या उजव्या कुशीत खोलवर खुपसतात व जबरदस्त ताकदीने डाव्या बाजूपर्यंत खेचतात. खानाचा कोथळा बाहेर येतो. खान 'दगा, दगा' ; 'मर गया, मर गया': 'खून, खून' असे ओरडत हाताने कोथळा सांभाळत बाहेर पळतो. एकच गलका माजतो. महाराज आपली तलवार म्यानाबाहेर काढतात. एवढ्यात या गलक्याने सावध होऊन सय्यदबंडा महाराजांवर वार करतो पण त्याच वेळी

सोबत असलेला जीवा महाला सय्यदबंडाचा वर घेतलेला हात तेथेच छाटतो. तेवढ्यात कृष्णाजी भास्कर महाराजांवर तलवार घेऊन चालून येतात. महाराज प्रतिसाद न देता चपळाईने बाहेर निसटतात. कृष्णाजी त्यांच्या मागोमाग बाहेर जातात. छावणीच्या बाहेरच्या बाजूस असलेल्या पालखीत बसून खान पळण्याचा तयारीत असतो एवढ्यात तेथे संभाजी कावजी येतो व पालखी उचलणाऱ्यांवर तलवारीने वार करतो. ते पालखी टाकून ओरडत दूर पळतात. संभाजी कावजी पालखीतून पडलेल्या अफझलखानाचे मुंडके आपल्या तलवारीने छाटतो व हातात घेऊन पळतो. त्याचवेळी तिथे पोहोचलेल्या महाराजांच्या मागावर असलेले कृष्णाजी भास्कर हातात तलवार घेऊन येतात व पुन्हा महाराजांवर वार करण्याचा प्रयत्न करतात पण यावेळीही राजे त्याला चकवा देऊन निघून जातात. एवढ्यात तिथे जीवा महाला येतो. कृष्णाजी व जीवा महाला यांच्यात लढाई सुरु होते. ही लढाई सुरु असतानाच सर्वत्र 'या अल्ला, या अल्ला' 'दगा, दगा' 'भागो, भागो' अशा आरोळ्या ऐकू येतात, मोठ्ठा कोलाहल माजतो आणि त्याचवेळी हळू हळू रंगमंचावर अंधार पसरत जातो. थोड्याच वेळांत पडद्यामागून तोफगोळ्यांचे पाच बार काढल्याचा मोठ्ठा आवाज ऐकू येतो. आणि मागच्या बाजूच्या पांढऱ्या पडद्यावर तुंबळ युद्धाला सुरुवात झाल्याचे दर्शविणाऱ्या आकृत्या छायांकित होतात. मराठा सैनिकांच्या 'हर हर महादेव' 'शिवाजी महाराज की जय' अशा गर्जना व मुसलमान सैनिकांच्या 'दीन, दीन' अशा गर्जना 'या अल्ला, या अल्ला', 'भागो, भागो' अशा आरोळ्या उमटत रहातात.)

**(पडदा पडतो)**

**दृष्य दुसरे समाप्त**

**प्रवेश नववा समाप्त**

-❖❖❖-

# अंक दुसरा
# (प्रवेश दहावा)

(राजगडावरील एक दालन.)
(जिजाबाई आसनावर बसल्या आहेत. बाजूस संभाजी कावजी व कान्होजीराव उभे आहेत. एवढ्यात शिवाजी महाराज प्रवेश करतात.)

**शिवाजी** : मुजरा आऊसाहेब! (आऊसाहेबांना मुजरा करतात.)

**जिजाबाई** : या राजे, या. सुखरुप आहात ना?

**शिवाजी** : होय आऊसाहेब. आम्ही ठीक आहोत.

**जिजाबाई** : राजे, आम्हांस अभिमान वाटतो तुमचा. अगदी सफाया केलात तुम्ही खानाचा. गेले चार पाच महिने आम्ही कसे काढले आम्हांसच ठाऊक. पण आता मात्र डोक्यावरचं ओझं एकदम उतरलं आहे.

**शिवाजी** : आऊसाहेब, फक्त आपलंच नव्हे, तर उभ्या महाराष्ट्रावरचं संकट टळल्यानं सर्वांचच ओझं उतरलं आहे.

**जिजाबाई** : होय, खरं आहे ते. पण याचं सर्व श्रेय तुम्हालाच आहे राजे.

**शिवाजी** : नाही आऊसाहेब, हे खरं नाही. याचं सर्व श्रेय आहे आमच्या निष्ठावंत सैनिकांना. आमच्या शब्दाखातर प्राणपणाला लावणाऱ्या नेताजी, कान्होजी, जीवा महाला यांच्या सारख्या मुरब्बी लढवय्यांना. या आमच्या संभाजी कावजींना, आमच्या प्रजेला, आमच्यावर विश्वासून रहाणाऱ्या सर्वांनाच. या सर्वांचे साहाय्य नसते तर आम्ही पण जीवें परतलो असतो की नाही कुणास ठाऊक!

**जिजाबाई** : राजे, त्या खानाला भेटण्याचे, अगदी त्याला कवेत घेण्याचे धाडस आपण कसे काय केलेत? कुठून आणलीत ही शक्ती?

**शिवाजी** : आऊसाहेब, आम्ही धाडसी आहोतच; पण या खानाला कवेत घेवून ठार करण्याची आंतरीक शक्ती आम्हाला लाभली ती, याच खानाने आमच्या भोळ्या भाबड्या प्रजेवर केलेल्या पाशवी अत्याचारामुळे आणि आम्ही जीवापाड मेहनत करुन लावलेल्या या स्वराज्याच्या रोपट्यावर गेलेल्या त्याच्या सैतानी दृष्टीमुळे!

**जिजाबाई** : राजे केवढे धाडस केलेत तुम्ही हे?

**शिवाजी** : आऊसाहेब, आमच्या प्रजेवर पुत्रवत् प्रेम करतो आम्ही. त्यांच्यावर गुदरणाऱ्या प्रत्येक संकटानं जीव कासावीस होतो आमचा. आणि याच

आमच्या भोळ्या प्रजेवर अनन्वित अत्याचार केले त्या खानाने. गेले चार-पाच महिने काळीज पिळवटून जात होतं आमचं; पण केवळ नाईलाजानं मुकाटपणे पहात बसलो होतो आम्ही ते केवळ याच योग्य संधीच्या शोधापायीं. ती संधी गवसली आणि मग त्या खानाबद्दलची सर्व चीड जागृत झाली आमची. आमच्या नजरेसमोर फक्त एकच ध्यास होता, स्वराज्याच्या मुक्तिचा. आई भवानीच्या कृपेनेच आम्ही साध्य करुं शकलो ते!

**जिजाबाई** : राजे, आम्हांला अभिमान वाटतो तुम्ही आमचे पुत्र असण्याचा!

**शिवाजी** : पण आऊसाहेब, खरं कौतुक तर करायला हवं या संभाजी कावजींचं. अफझलखानाचे शीर कापण्याचा पराक्रम केला आहे त्यांनी. खानाचे ते शीर घेऊन आम्हीच पाठविले होते त्यांना या राजगडावर.

**जिजाबाई** : होय, आम्ही पाहिले ते. सुरुवातीस आमचा विश्वासच बसेना यावर; पण मग सर्व वृत्तांत सांगितला या कावजींनी, तेव्हां कुठे विश्वास बसला आमचा.

**शिवाजी** : कान्होजीराव, खूप कष्ट दिले आम्ही तुम्हांस या खानापायीं.

**कान्होजी** : छे, छे महाराज, त्यांत कष्ट कसले? या बलाढ्य खानाच्या फौजेला गारद करण्यांत आमचाही हातभार लागला हे आमचे भाग्यच!

**शिवाजी** : नाही कान्होजीराव, एवढे सोपे नव्हते ते. आपण फार मोठा पराक्रम केलेला आहे. केवळ खानाच्या सैन्यासच नव्हे तर त्याच्या दोन पुत्रांस व मुसाखान आदि सरदारांस पकडण्याचे धाडस पण केलेले आहे आणि म्हणूनच, 'तलवारीच्या पहिल्या पानाचे मानकरी' हा किताब आम्ही तुम्हाला बहाल करतो आहोत.

**कान्होजी** : महाराज .... (गहींवरतात) केवढा मोठा सन्मान हा आमचा?

**शिवाजी** : कान्होजीराव, आपल्या सारखे शूरवीर आमच्या सोबत आहेत हा खरंतर आमचाच सन्मान आहे.

**कावजी** : महाराज, पुढे काय करायचं आपण?

**शिवाजी** : नेताजीराव आपल्या इतर बहाद्दर सरदार व शिपायांसह खानाच्या पळून जाणाऱ्या सैन्याच्या मागावर गेले आहेत. आपणा सर्वांस त्यांना साथ देण्यासाठी निघावयास हवे आणि म्हणूनच आऊसाहेबांचा निरोप घेण्यासाठीच आलो होतो आम्ही. फक्त जाण्यापूर्वी एक काम करावयाचे शिल्लक आहे.

**कान्होजी** : कोणते काम महाराज?

| | |
|---|---|
| **शिवाजी** | : अफझलखानाचा मृतदेह प्रतापगडाच्या पायथ्याशी मुसलमानी रिवाजा-प्रमाणे दफन केला जावा व त्यावर कबर उभारण्यात यावी असा आदेश देणे बाकी आहे. तो दिला की निघूच आपण. |
| **कावजी** | : (आश्चर्याने आणि गोंधळून) काय महाराज? काय म्हणालात आपण? |
| **शिवाजी** | : होय, आपण ऐकलंत ते खरं आहे, खानाची कबर उभारायची आहे. |
| **कान्होजी** | : . . .त्या खानाची कबर उभारायची? आणि ती कशासाठी? |
| **कावजी** | : . . . पण महाराज कशासाठी हे सर्व करायचे आपण? |
| **शिवाजी** | : '. . . .मरणान्तानी वैराणी' असं वचन आहे म्हणून! |
| **कावजी** | : पण महाराज, तो मुसलमान होता आणि आमचा शत्रू. तरीपण . . . |
| **शिवाजी** | : होय. तो मुसलमान होता हे खरे आहे. पण आम्हांस त्याच्या धर्माशी काही देणे घेणे नाही. शत्रूला जात नसते आणि धर्मही नसतो. आमच्या स्वराज्याकडे वाईट नजरेने पाहिल तो आमचा शत्रू. मग तो हिंदू असो वा मुसलमान. अफझलखानाची कबर बांधून आम्ही आमच्या तमाम शत्रूंना सावध करु इच्छितो की यापुढे आमच्या स्वराज्याकडे वाकड्या नजरेने बघाल तर तुमचीही अशीच हालत केली जाईल. या अफझलखानाने, आमच्या दैवतांच्या मूर्तींची, मंदिरांची तोडफोड करुन आमच्या रयतेच्या धर्मभावना दुखावल्या होत्या. अशा या अफझलखानासारख्या बलाढ्य शत्रूला देखील आम्ही धूळ चारली होती हा इतिहास कायम स्वरुपीं आमच्या महाराष्ट्रासमोर रहायला हवा; म्हणजे मग या हिंदवी स्वराज्याकडे डोळे वर करुन पहाण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही. सर्व धर्मांप्रति समान भाव आम्ही राखू इच्छितो. पण सर्व धर्म समभाव, म्हणजे इतर धर्मियांनी आमच्या धर्माची केलेली अवहेलना आम्ही मुकाटयाने सहन करु असे मात्र अजिबात नाही. आम्ही इतर धर्मियांचा मान राखू, त्यांना समान लेखूं; पण त्यांनीही आमच्याशी तसेच वागावे. याउप्पर काही कराल तर मग याद राखा असाच संदेश सर्वत्र जायला हवा आणि म्हणूनच ही कबर बांधणे आवश्यक आहे. |
| **जिजाबाई** | : राजे, किती दूरगामी विचार आहेत आपले. आज खरेंच धन्य झालो आहोत आम्ही! |
| **शिवाजी** | : आऊसाहेब, आम्ही आतां मोहिमेवर निघतो आहोत, नेताजींच्या साथीला निघायचे आहे. आशीर्वाद द्या आम्हाला. (जिजाबाईंसमोर वीरासन घालून पायाला हात लावून त्यांचे आशीर्वाद घेतात) |
| **जिजाबाई** | : ''देवी भवानीचा वरदहस्त कायम लाभो आपल्याला, विजयी भव!'' |

(शिवाजी महाराज, संभाजी कावजी, कान्होजीराव आपापल्या तलवारी म्यानाबाहेर काढतात व 'जय महाराष्ट्र', 'हर हर महादेव' म्हणून बाहेर जायला निघतात आणि ......... पडदा पडतो)

**प्रवेश दहावा**

**✻ अंक दुसरा समाप्त ✻**

-❖❖❖-